शब्द रुची ४८

एप्रिल २०२४ । मूल्य १० रु.। पृष्ठे ४४

# गंधर्वांचे देणे

● पं. कुमारजींशी संवाद

एका अभूतपूर्व मुलाखत-मैफलीच्या पुस्तकाचे प्रकाशन


पं. सुरेश तळवलकर


कुमार केतकर


अतुल देऊळगावकर


सिद्धार्थ देशपांडे


सुदेश हिंगलासपूरकर




पं. सत्यशील देशपांडे, पं. सुरेश तळवलकर, विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे, कुमार केतकर, लेखक अतुल देऊळगावकर यांच्या उपस्थितीत झालेल्या प्रकाशनसमयी हेमंत जोशी, सतीश भावसार, सिद्धार्थ देशपांडे, अरुण जोशी, राजीव श्रीखंडे, माधुरी पुरंदरे, चंद्रकांत काळे, श्रीहर्ष फेणे, सुदेश हिंगलासपूरकर आणि सूत्रसंचालक डॉ. मृण्मयी भजक

## प्रकाशन आणि मैफलीची क्षणचित्रे

# गंधर्वांचे देणे




विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे



शशिकांत शानभाग यांचा
सत्कार करताना
सुदेश हिंगलासपूरकर




पं. सत्यशील देशपांडे




भुवनेश कोमकली


सूत्रसंचालन



वंदना बोकील-कुलकर्णी



डॉ. मृण्मयी भजक




अभिवाचन करताना चंद्रकांत काळे आणि माधुरी पुरंदरे

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

शब्द रुची ४८

**एप्रिल २०२४, वर्ष दहावे**
**अंक बारावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

---

कार्यालयीन संपर्क

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
**shabdruchee24@gmail.com**

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**समीर कदम**

---

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

---

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

---

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी / ५**
मराठीचे वर्तमान, मराठी भाषा धोरण आणि अपेक्षा

**संजीवनी खेर / ८**
निर्वासितांचे दु:ख – सिंधी लेखिका पोपटी हिरानंदानी

**अनुराधा गांगल / १३**
आमची मैत्रीण, उत्साहमूर्ती – अरुणा साधू

**विजयालक्ष्मी मणेरीकर / १९**
बहुचर्चित नाटक 'गालिब'

**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी / २२**
सोसावे टाकीचे घाव : अभ्यासक्रम आणि मूल्यमापन

**शरद काळे / २५**
राख, रिठा, शिकेकाई, साबण आणि पर्यावरण

**नंदन जोशी / ३०**
जादुनगरी व्हेनिस

**किरण येले / ३३**
कवितेच्या कॉलसाठी थांबलेला कवी : आदित्य दवणे

वृत्तांत / पुस्तक परिचय व ग्रंथपाने / **३८ ते ४२**
**डॉ. निर्मोही फडके, चांगदेव काळे**

**'शब्द रुची'साठी shabdruchee24@gmail.com याच नवीन ईमेलवर संपर्क साधावा.**
'शब्द रुची' अंकाबाबत डिसेंबरमध्ये नव्याने विचार होणार आहे. अंकासाठी वर्गणी भरल्यास डिसेंबर २०२४पर्यंतचे अंक पोस्ट केले जातील. ज्यांची वर्गणी डिसेंबर २०२४च्या पुढची भरली असेल, त्यांना ती संपण्याच्या महिन्यांइतके वर्गणी जमा होण्याच्या तारखेपूर्वीचे अंक मिळतील. आता वर्गणी फक्त डिसेंबर २०२४ पर्यंतचीच स्वीकारली जाईल.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
विश्वस्त, संपादक

# संपादकीय...

ग्रंथाली पन्नासाव्या वर्षात पदार्पण करताना, १९८५मध्ये घडवलेल्या पं. कुमारगंधर्व यांच्या मुलाखतींचे 'गंधर्वांचे देणे' हे पुस्तक प्रसिद्ध होणे हा सुवर्णयोग आहे. त्याच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमाला ओसंडून वाहणारा प्रतिसाद मिळाला. दुर्दैवाने बऱ्याच रसिकांना त्यामुळे हा सोहळा अनुभवता आला नाही. कुमारगंधर्व यांच्या जन्मसिद्ध गायकीला दिलेली ही दाद आहे, तसाच ग्रंथाली तो घडवत आहे याबद्दलही असलेली आस्था आहे, हे दिसत होते. एनसीपीएच्या सहकार्याने एका मराठी पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या टाटा थिएटरमध्ये दिमाखदार कार्यक्रमात होणे हाही एक अपूर्व योग आहे.

अतुल देऊळगावकर यांनी संपादन केलेला हा अनमोल संगीतखजिना आहे. कुमारजींच्या पाच तासांहून अधिक गायनाचे चौपन्न क्यूआर कोड पुस्तकात आहेत. सहा दिवस चाललेल्या या मैफलीचे चाळीस वर्षांपूर्वीचे ध्वनिमुद्रण सुस्पष्ट करून क्यूआर कोड तयार करण्याचे महत्त्वाचे काम समीर कदम यांनी केले आहे. ग्रंथालीच्या दोन्ही यूट्यूब चॅनेलवर प्रसृत होणारे कार्यक्रम उत्तम प्रकारे निर्मिण्यातही समीर कदम यांचा मोठा वाटा आहे. ग्रंथालीच्या डिजिटल माध्यमाची धुरा ते आत्मीयतेने सांभाळत आहेत. पडद्यामागचे त्यांचे हे सहकार्य मोलाचे आहे. पुस्तकाच्या व कार्यक्रमाच्या नियोजनात अनेकांचा सहभाग होता. कुमार केतकर यांचा सक्रिय पुढाकार उत्साह वाढवणारा होता. अतुल देऊळगावकर यांची पुस्तकनिर्मिती आणि कार्यक्रम घडण्यातली अस्वस्थता प्रकाशनानंतर शांत झाली असावी. सुदेश हिंगलासपूरकर यांच्या ठाम निर्णयक्षमतेमुळे प्रश्न योग्य प्रकारे सुटत होते. श्रीहर्ष फेणे, शशिकांत शानभाग यांचा पाठिंबा बळ देणारा होता. एनसीपीएचे चेअरमन खुसरू संतुक, डॉ. सुवर्णलता राव, नयन काळे, सिद्धार्थ देशपांडे, ब्रुस ग्रथी, राजश्री शिंदे, ॲवाफ्रिन मिस्त्री यांचे सहकार्यही उत्स्फूर्त होते. आरंभी संगणकावर पुस्तकाची मांडणी करताना योगिता मोरे आणि कार्यक्रमाचे समन्वयन करताना धनश्री धारप यांचा सहभाग होता. अशा सर्वांच्या प्रयत्नातून हा सर्वदूर चर्चा होत असलेला सोहळा घडला.

आजकाल घडते तसे ठरावीक रसिकांना निमंत्रित करून केलेली मैफल असे त्याचे स्वरूप नव्हते. सामान्य रसिकांना हा आनंद अनुभवता यावा, यासाठी ही मैफल खुली होती. हेच तर गेली पन्नास वर्षे ग्रंथाली करत आली आहे. जीवनाच्या सर्वांगांना जाणून घेत, त्यातले उत्तम ते समाजाला द्यावे, समाज जाणीवसमृद्ध होऊन सौहार्द वाढावा, यासाठी सर्वच माध्यमांना ग्रंथालीने जवळ केले आहे. कलांना लोकाभिमुख करण्याचे धोरण ठेवून ते जगण्याला दृष्टी देणारे व अर्थपूर्ण करणारे व्हावे, असा प्रयास केला आहे.

ग्रंथालीच्या आरंभापासून ज्यांनी मागे राहून ग्रंथालीच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला त्यांपैकी एक, अरुणा साधू यांचे निधन जसे ग्रंथाली परिवारासाठी दुःखद आहे तसेच ते त्यांनी भाग घेतलेल्या स्त्री मुक्ती संघटनेच्या परिवाराला, त्यांच्याकडून योगाभ्यासाचे धडे घेणाऱ्यांना, आणि जे त्यांना प्रत्यक्ष भेटले आहेत, त्यांच्या सहृदयतेचा अनुभव घेतला आहे त्यांना चटका लावणारे आहे. अनुराधा गांगल, कमलताई, अरुणा साधू अशा मैत्रिणींचा ग्रूप ग्रंथालीच्या कामात जसा हातभार लावत होता तशा त्या आपल्या सांस्कृतिक परंपराही जोपासत होत्या. त्यांच्या मैत्रीचा गोफ, अरुणा साधूंच्या आठवणी अनुराधा गांगल यांनी अंकात जागवल्या आहेत.

राजीव श्रीखंडे यांचे 'ग्लोबल ग्रंथपरिचय' हे सदर या अंकात नाही. अन्य नियमित सदरे आहेत.

पुढील अंक मुलांच्या शालेय सुट्ट्या लक्षात घेऊन, बालसाहित्य अंक असणार आहे. प्रसिद्ध लेखक एकनाथ आव्हाड त्याचे अतिथी संपादक आहेत.

**– अरुण जोशी**



**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**


# मराठीचे वर्तमान, मराठी भाषा धोरण आणि अपेक्षा

'मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान' बृहद् ग्रंथ ग्रंथालीसाठी आम्ही संपादित केला, तो १ मे २०२२ रोजी प्रकाशित झाला.

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या हीरकमहोत्सवी वर्षात त्या निमित्ताने हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. त्याचे प्रकाशनदेखील मंत्रालयात, महाराष्ट्र सरकारचा मराठी भाषा विभाग, भारत सरकार आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने झाले. या देशाच्या स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आणि या राज्याच्या निर्मितीचे हीरकमहोत्सवी वर्ष यानिमित्ताने तत्कालीन मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते ह्या ग्रंथाचे प्रकाशन झाले.

या प्रकाशनाला हा शासकीय हातभार लाभला याचे अजून एक महत्त्वाचे पण योगायोगाचे कारण म्हणजे, या ग्रंथाच्या संपादकीयात म्हटल्याप्रमाणे हा ग्रंथ एका अर्थाने शासनाने न काढलेली पण या ग्रंथरूपाने साकारलेली मराठीची अशासकीय श्वेतपत्रिकाच झाला आहे.

मराठी भाषेच्या उपयोजनाच्या सर्व क्षेत्रांतील सद्य:स्थितीची एक श्वेतपत्रिका शासनाने प्रकाशित करावी अशी आमची मागणी सुमारे पंचवीस वर्षे जुनी होती. विदर्भ साहित्य संघातर्फे तेव्हा ती प्रस्तुत लेखकानेच केली होती. मात्र शासनाने त्याकडे नेहमीप्रमाणे डोळेझाकच केली. त्यानंतर विदर्भ साहित्य संघानेच ते काम करावे असे योजिले. परंतु आपल्या या साहित्य संस्था गेल्या काही दशकांपासून निव्वळ व्यासपीठीय, संमेलनग्रस्त व पुरस्कार वाटपग्रस्त, उत्सवी आणि करमणूकप्रधान व लोकानुनयी एवढ्याच प्रकारच्या कामात गुरफटलेल्या असल्याने त्यांना तर भाषेबाबत अशा पायाभूत महत्त्वाच्या कामांमध्ये काडीचीही रुची उरलेली नाही. कारण त्या अभ्यासक, संशोधक, तज्ज्ञ, लेखक यांच्या संस्थांच आता अपवादानेही उरलेल्या नाहीत. त्या फक्त धूर्तपणे स्वत:ला संस्थांमध्ये आयुष्यभर टिकवून ठेवून, त्याचे वैयक्तिक लाभार्थी राहू इच्छिणाऱ्या न-लेखकांच्या संस्था प्रामुख्याने झालेल्या आहेत.




त्यामुळे त्यांना भाषाकेंद्री, संस्कृतीकेंद्री असे काम करायचेच नाही आहे. त्या केवळ साहित्यकेंद्री आणि त्यातही फारच जुजबी स्वरूपाच्या साहित्यकेंद्री तेवढ्या उरल्या आहेत. भाषा, संस्कृतीबाबतचे काडीचेही काम गांभीर्याने त्यांना करायचेच नाही आहे, करतही नाहीत.

त्यामुळे केवळ शासनच तेवढे भाषा, साहित्य, संस्कृतीविषयक बाबतीत गंभीर नाही, उदासीन आहे असे नव्हे तर आपल्या या संस्थादेखील तशाच झाल्या आहेत.

त्यांना ना दिशादर्शक, द्रष्टे वाङ्मयीन नेतृत्व आहे ना तशा नेतृत्वाखाली त्या चालवणाऱ्यांना त्या चालू द्यायच्या आहेत. उलट अतिशय सुमार लोकांच्याच हाती त्या टिकवण्यासाठीचे हितसंबंधी लोक तिथे गोळा झाले आहेत. मराठीच्या आजच्या दूरवस्थेच्या कारणांमध्ये हेदेखील एक अतिशय महत्त्वाचे कारण आहे.

त्यामुळे मराठीची अपेक्षित श्वेतपत्रिका काढायचे काम विदर्भ साहित्य संघामार्फतही करून घेता आले नाही. पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळामार्फतदेखील ते करून बघण्याचा प्रयत्न करून बघितला, पण तिथेही ते होऊ शकले नाही. हे सगळे सांगायचे कारण असे की या प्रकारच्या कामाचे महत्त्व आणि मोल कळले ते केवळ ग्रंथालीला.

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या हीरक महोत्सवी वर्षात असा मराठीच्या श्वेतपत्रिकेसमान एखादा ग्रंथ प्रकाशित व्हावा असा जो मानस होता त्याचा प्रकल्प करून ग्रंथालीला दिला आणि ग्रंथालीतर्फे तो प्रकाशितही केला. मुख्य म्हणजे त्यासाठीचे

लेखन करणाऱ्या लेखकांनी, सर्व काही बंद असण्याच्या कोरोना काळात, अतिशय परिश्रम घेऊन लेखन केल्याने हा ऐतिहासिक मोलाचा संदर्भ ग्रंथ तयार होऊ शकला.

या ग्रंथामागची ही सगळी पार्श्वभूमी  या ग्रंथाची वैशिष्ट्ये ठरली आहे.

मराठी भाषा, वाङ्मयाच्या ३६ अतिशय महत्त्वाच्या, अभ्यासक, संशोधक, लेखकांनी मराठी भाषेच्या उपयोजनाच्या जवळपास सर्वच क्षेत्रातील विषयांची सद्य:स्थिती या ग्रंथातील त्यांच्या अतिशय अभ्यासपूर्ण अशा विवेचनातून मांडली आहे.

'मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान' हे या ग्रंथाचे शीर्षक त्यामुळेच खऱ्या अर्थाने सार्थ ठरले आहे.

हा ग्रंथ प्रकाशित होईस्तोवर शंभर वर्षांपासून मागणी असलेले, मराठी ही आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, विकाससंधी इत्यादीची भाषा व्हावी यासाठी पायाभूत सामग्री म्हणून सर्व विषयांचे सर्व ज्ञानशाखांतील, सर्व स्तरांवरील अध्ययन, अध्यापन मराठी माध्यमातून मागणारे अपारंपारिक मराठी विद्यापीठ स्थापनेच्या, आमच्या पाठपुराव्यामुळे सरकारकडून नुसत्या घोषणा तेवढ्या होत होत्या. त्यासाठीची अशासकीय तज्ज्ञांची समितीदेखील आश्वासन देऊनही स्थापली गेली नव्हती.

दहा वर्षांपूर्वीपासून तयार असलेले राज्याचे मराठी भाषा धोरणदेखील सरकार जाहीर करण्याचे टाळत होते. मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडल्या जात होत्या. त्यांचे इंग्रजीकरण होत होते. मराठी शाळांना अनुदानित केलेच जात नव्हते, ते अजूनही केले जात नाही.

इंग्रजी हीच एकमेव ज्ञानभाषा, विकासभाषा म्हणून टिकवून धरण्याच्या सरकारी धोरणांची मराठी ही बळी ठरली होती, आहे.

मराठीला अभिजात दर्जा देण्याचे केंद्र सरकार दहा वर्षे सातत्याने टाळत होते, टाळतेच आहे. भाषाविज्ञान शिकवलेच जात नाही. मुळात भाषाच शिकवली जात नाही.

शिकवले फक्त साहित्य जाते. साहित्य हा भाषेचा केवळ दहा टक्के व्यवहार आहे.

राजभाषा मराठी अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही स्वतंत्र यंत्रणा नाही, विभाग नाही. न्यायालयात मराठीचा वापर, संघर्ष करूनही पुरेसा होत नाही आहे.

मुंबई या राजधानीने मराठीपण गमावले आहे. वृत्तपत्रीय मराठीचे, माध्यमातील मराठीचे सामर्थ्यशाली रूप अस्तंगत होते आहे. समृद्ध अशा मराठीच्या बोलींची उपेक्षा होते आहे. सार्वजनिक ग्रंथालयाची दुरवस्था वाढती आहे. शासन स्वतंत्र ग्रंथालय धोरणाची मागणी पूर्ण करायला तयार नाही.

मराठीतला प्रकाशन आणि ग्रंथव्यवहार तोकडा पडतो आहे. मराठीतील समृद्ध अशी पुरवणी पत्रकारिता लयाला गेली आहे.

मराठीच्या साहित्यव्यवहारातले गांभीर्य संपून सवंगपणा तेवढा वाढला आहे. विभागीय साहित्य संस्था त्यामुळे निरर्थक ठरत आहेत.

तुलनेने संमेलनांची, पुरस्कारांची, व्यासपीठीय, सादरीकरणात्मक, करमणूकप्रधान अशीच संस्कृती तेवढी गंभीर साहित्य व्यवहाराच्या जागी बोकाळली, फोफावली आहे.

या व अशा मराठी राज्यातल्या मराठीच्या वर्तमानाचा समग्र आणि अभ्यासपूर्ण आढावा घेणारा हा 'मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान' हा आम्ही संपादित केलेला ग्रंथ झालेला आहे, हे त्याचे ऐतिहासिक संदर्भमूल्य आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या सुमारे दीड वर्षानंतर शासनाने एक तथाकथित मराठी विद्यापीठ स्थापले, परंतु जे कोणी मागितलेच नव्हते ते शासनाच्या कल्पनेतले स्थापले. ते केवळ मराठी भाषा, साहित्याचे, ज्याची काहीच गरज नाही.

या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या दोन वर्षे नंतर सरकारने नुकतेच दहा वर्षे प्रलंबित ठेवलेले राज्याचे मराठी भाषा धोरण आमच्या प्रदीर्घ पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर आता जाहीर केले आहे.

विशेषत: प्रस्तुत लेखक, संपादक हे धोरण सरकारला सादर करणाऱ्या राज्याच्या भाषा सल्लागार समितीचा सदस्य असतानाच्या काळातच हे धोरण सरकारने जाहीर केले आहे. या सर्व बाबींचे परस्परांशी नाते आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर हे जे वर्षानुवर्षे मराठीच्या संबंधात घडत नव्हते, ते वर्तमान बदलू लागले आहे. त्यामागे मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळीचे तसेच मराठीसाठी कार्यरत विविध संस्था, संघटना, समूह, कार्यकर्ते यांचे परिश्रम आहेत तसेच या ग्रंथात मांडले गेलेले मराठीचे वर्तमानदेखील उभे आहे हे लक्षात घेतले म्हणजे या ग्रंथाचे महत्त्व काय आहे ते लक्षात येते.

आता या मराठी राज्याच्या निर्मितीच्या त्रेसष्ट वर्षांच्या नंतर का होईना पण राज्याचे मराठी भाषा धोरण सरकारने जाहीर केले आहे.

ही घटना स्वागतार्हच आहे. मात्र धोरण जाहीर केले म्हणजे ते आपोआपच अमलात येत नसते.

धोरण ही तज्ज्ञांनी राज्याला त्या संबंधात दिलेली पुढची दिशा असते. परंतु त्या धोरणात केलेल्या शिफारशी, सुचवलेल्या योजना, उपाय हे सारे प्रत्यक्षात येण्यासाठी शासनाने त्यातल्या बाबी प्रत्यक्षात आणण्यासाठी आर्थिक तरतूद करावी लागते. त्यात सुचवलेल्या यंत्रणा, संस्था उभाराव्या लागतात. सुचवल्यानुसार आवश्यक ते कायदे करावे लागतात. या धोरणाबाबतही सरकार ते करते की नाही आणि या धोरणाची अंमलबजावणी कशी करते यावर राज्यातील मराठीचे अनिष्ट वर्तमान बदलते की नाही आणि इष्ट भविष्य साकारते की नाही

हे अवलंबून आहे.

शासनाचे सर्व विभाग या धोरणात सुचवलेल्या बाबींचे पालन करतात की नाही हेदेखील बघावे लागणार आहे.

महाराष्ट्र सरकारने चौदा वर्षांपूर्वी सांस्कृतिक धोरण जाहीर केले. त्याचे काय झाले? तर त्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने आजवर अंदाजपत्रकात एका पैशाचीही स्वतंत्र तरतूद केली नाही. अंमलबजावणीसाठी सुचवली गेलेली संस्थात्मक यंत्रणा, मंडळ, विभागीय मंडळे आम्ही सतत पाठपुरावा करत असूनही स्थापली नाहीत.

त्या धोरणाची अंमलबजावणीच झाली नाही. त्यामुळे ते धोरण जसे नुसते कागदावरच उरले तसेच मराठी भाषा धोरणाचे होणार नाही याची कोणतीही खात्री देता येत नाही.

त्याची चिन्हे सुरुवातीलाच दिसू लागली आहेत.

सरकारने केवळ १२ पानांचा एक शासन निर्णय सध्या काढला आहे. मात्र या २०१४ च्या याच धोरणाचा– जसे संपूर्ण धोरण संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसे– २०२३ चे आम्ही सरकारला करून दिलेले संपूर्ण मराठी भाषा धोरण अजून संकेतस्थळावर उपलब्ध व्हायचे आहे. लोक त्यामुळे त्या १२ पानांनाच संपूर्ण धोरण समजत आहेत. हा गैरसमज दूर व्हावा म्हणून संपूर्ण धोरण संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यायला संबंधितांना पत्र लिहून सांगितले आहे. ते कधी उपलब्ध होईल व होईल की नाही ते बघावे लागेल. मात्र जो शासननिर्णय १४ मार्च २०२४ रोजी निर्गमित झाला आहे त्यालाच सरकार संपूर्ण मराठी भाषा धोरण म्हणणार असेल तर ती सरकारने राज्याच्या भाषा सल्लागार समितीची व जनतेचीही केलेली फसवणूक तेवढी ठरेल.

तसे होऊ नये व संपूर्ण धोरण संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल अशी तूर्तास सचिवाने पत्रोत्तर देईस्तोवर आशा करू या. परंतु पत्रोत्तर देण्याची कार्यालयीन संस्कृती शासनाने कधीच निकालात काढली असल्याने पत्राचे उत्तर येण्याची आशाही नाही.

सरकारचा धोरणाबाबतचा पूर्वानुभव लक्षात घेता सरकार काय करेल व आवश्यक ते करेल की नाही याची लोकांना खात्री उरलेली नाही.

या मराठी भाषा धोरणामुळे आजवर चाललेला राज्याचा मराठीविषयक कारभार, जो केवळ शासन, प्रशासन यांना वाटेल तसा चालला होता व त्यालाच मराठी भाषा धोरण समजले जात होते तो कारभार यापुढे तज्ज्ञांनी दिलेल्या या मराठी भाषा धोरणाच्या चौकटीतच केला जावा असे अपेक्षित आहे.

तो तसा केला जातो की नाही हे बघण्यासाठी मराठीच्या कार्यकर्त्यांना यापुढेही अधिकच जागरूक राहावे लागणार आहे.

गेली शंभर वर्षे आपण मराठी ही आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, विकास, रोजगार, संधी इत्यादीची भाषा व्हावी व इंग्रजीची त्यासाठी गरजच पडू नये, यासाठी पायाभूत सामग्री म्हणून सर्व विषयांचे सर्व स्तरांवरील, सर्व शिक्षण, अध्ययन, अध्यापन हे मराठी माध्यमातून करायचे असणारे जे अपारंपरिक मराठी विद्यापीठ मागतो आहोत ते स्थापन व्हावे असे या संपूर्ण धोरणाच्या, १२ पानी शासन निर्णयात नव्हे, परिच्छेद ५.५ मध्ये सुचवण्यात आले आहे. तो परिच्छेद शासननिर्णयात काढून टाकण्यात आला आहे. मात्र भाषा सल्लागार समितीने शासनाला सादर केलेल्या संपूर्ण धोरणात तो आहे त्यामुळे ते आता शासनाने तातडीने स्थापले पाहिजे. कारण मराठीला ज्ञानभाषा करणारे ते पहिले पाऊल ठरणार आहे. सरकारला इंग्रजी हीच ज्ञानभाषा म्हणून टिकवायची असेल तर अर्थातच सरकार ते स्थापणार नाही.

या धोरणात सुचवल्याप्रमाणे मराठी विषय बारावीपर्यंत सक्तीचा करण्याचा कायदा केला पाहिजे. जो आमच्या मागणीनंतर केवळ १० वी पर्यंतचाच केला गेला आहे.

संपूर्ण धोरणात सुचवलेली 'मराठी भाषा विकास प्राधिकरण' ही अर्धन्यायिक यंत्रणा स्थापन करण्याचा कायदादेखील लवकर केला पाहिजे.

कारण त्याशिवाय धोरणात सुचवल्याप्रमाणे मराठीतून सारे होते वा नाही हे बघणारी यंत्रणाच अस्तित्वात येणार नाही.

या धोरणात सुचवलेली अनुवाद अकादमी स्थापन केली पाहिजे, बृहन्महाराष्ट्रातील मराठीच्या स्थितीत सुचवल्याप्रमाणे सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत

मराठी माध्यमाच्या शाळा जगवणारे, त्या अनुदानित करणारे, त्या बंद पडू न देणारे, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्यांच्या रोजगाराच्या, नोकरीतल्या संधी सुरक्षित करणारे सुचवलेले कायदे आता विलंब न लावता सरकारने केले पाहिजेत.

उच्च न्यायालयाने आपले निर्णय मराठीतून दिले पाहिजेत.

शासनाने आता या धोरणानुसार त्याला प्रत्यक्ष अंमल देणाऱ्या, धोरणात सुचवलेल्या यंत्रणा, संस्था उभाराव्या आणि मराठी विषयक निर्णय घेणाऱ्या सर्व कृती यापुढे या धोरणानुसारच कराव्यात व मराठी भाषा जतन, संवर्धनाप्रती आपली ठाम बांधिलकी आणि राजकीय इच्छाशक्ती पुढेही अशीच दाखवावी, अशी अपेक्षा आहे. मात्र जो शासननिर्णय १४ मार्च २०२४ रोजी निर्गमित झाला आहे त्यालाच सरकारने संपूर्ण मराठी भाषा धोरण म्हणण्याचे समजा ठरवले असेल तर मात्र ती निश्चितच फसवणूक ठरेल व यातले काहीच होणार नाही हेदेखील तेवढेच खरे.

**– डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

shripadbhalchandra@gmail.com



संजीवनी खेर

# निर्वासितांचे दुःख सिंधी लेखिका पोपटी हिरानंदांनी

ग्लोकल लेखिकाच्या ह्या सदरात आज आपण सिंधी भाषक लेखिकेबद्दल जाणून घेणार आहोत. आत्यंतिक त्रासातून गेलेला हा समाज सतत ताठ मानेने झगडला. कुठेही त्यांनी मदतीची हाक मारली नाही की दीनवाणे होऊन जगले नाहीत. सर्वस्व गमावून ते भारतात आले. मुंबईत बरेच लोक अत्यंत खडतर अवस्थेत राहिले. मुंबई, गुजरात, राजस्थान अशा अनेक ठिकाणी, सरकारने त्यांच्यासाठी धड व्यवस्था केली नव्हती तशा स्थितीतही राहताना ते डगमगले नाहीत. आज ते धनाढ्य बनले आहेत. अनेक शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल काढून अनेक धर्मादाय संस्थांच्या कामात मदत केली आहे. कालकालपर्यंत दूरदर्शनवर सिंधी भाषेतील कार्यक्रम होत असत.

आजवर आपण अनेक पंजाबी साहित्यिकांनी लिहिलेले वाचले असेल. पंजाबी, शीख स्त्री-पुरुषांनी अतोनात हाल सोसले हे आपण जाणतो, पण फाळणीत सिंधी लोकही विस्थापित झाले. पंजाबला निदान त्यांचा अर्धा पंजाब तरी मिळाला, पण सिंधी समाजाची तर संपूर्ण भूमीच त्यांच्या पायांखालून नाहीशी झाली. आता सिंध फक्त आपल्या राष्ट्रगीतातच राहिला आहे. देशभर ७,७६२९९ (१९५१च्या जनगणनेनुसार) विखुरले गेलेत. परंतु सिंधी लोकांच्या मते १२ लाख सिंधी लोकांनी सिंध सोडला होता, त्यांची नोंदच नाही. शक्यता अशी आहे की बरेच लोक विदेशांत आपल्या नातेवाईकांकडे गेले असावेत. भारताही राजस्थान, कच्छ, मध्यप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र अशा विविध प्रांतात स्थिरावले. मुंबईत, चेंबूर, उल्हासनगर अशा ठिकाणी अत्यंत हालाखीच्या स्थितीत स्थिरावले. वैभवांच्या शिखरावरचं जीवन सोडून फाळणीच्या निर्णयाने त्यांना अक्षरश: दीन केले. सर्वस्व गमावूनही ह्या लोकांनी स्वत्व सोडले नाही. इथल्या समाजानेही काही त्यांना फार सन्मानाने, आपुलकीने वा सहानुभूतीने वागवले नाही. वास्तविक हे संकट अनपेक्षित होते, अपरिहार्य राजकीय निर्णयाने ही कुटुंबे सैरभेर झालेली होती. परंतु आपण समाज म्हणून संवेदनशीलता दाखवली नाही. राजकीय स्तरावर जी काही जुजबी मदत मिळत होती त्यावरच त्या लोकांनी गुजराण केली. अगतिकता दाखवली नाही. लहानमोठ्यांनी कमीपणा न मानता कष्टाची कामे करून संपूर्ण समाज उन्नतावस्थेला आणला आहे. त्याचेच प्रतिबिंब सिंधी साहित्यात आपल्याला वाचायला मिळते. सिंधीयत नावाची त्यांची संस्था साहित्य, कला आणि बंधुभाव जागा ठेवत असते. साहित्य आणि कलाक्षेत्राही ही मंडळी आपले महत्त्व ठसवत आहेत.



पोपटी हिरानंदांनी

पोपटी हिरानंदानी हे एक झळाळते नाव आहे. तिच्या साहित्यात दिसते ते फाळणीपूर्व समृद्ध जीवन, एकत्र कुटुंबे, नातेवाईकांनी केलेली मदत आणि फसवणूक. तिच्या साहित्यातील फारच थोडे वाङ्मय मराठीत, इंग्रजीत वा हिंदीत उपलब्ध आहे. जे आहे ते आपल्याला एका मोठ्या भागातील वैभवशाली हिंदू समाजाचे चित्र दिसते. सिंधमध्ये मुस्लिम आणि

हिंदूंचे जगणे सांमजस्यपूर्ण होते. दोन्ही समाजांत कितीतरी गोष्टी सामायिक होत्या. भाषा, देश, मोहेनजोदारोसारख्या इतिहासाचे, संस्कृतीचे ते सहभागी होते. साथीदार होते. पण ब्रिटिशांच्या आणि आपल्या राजकारणाच्या निर्णयाने अक्षरश: सारे छिन्नभिन्न झाले. त्याची खंत दोन्ही धर्माच्या लोकांना आहे. मुख्यत: सिंधी भाषा, साहित्य, लिपी दोन्ही समुदायात एकच असल्याने ते समुदाय भावनिक जवळीक असलेले आहेत. एके काळी कराची हा बॉम्बे प्रेसिडेन्सीचा भाग होता. बरेच निर्वासित जहाजमार्गे मुंबई गेले. सिंधमधील हिंदूंच्या घरादारांची लुटालूट, जाळपोळ झाली, त्यांच्या इस्टेटी इतरांनी बळकावल्या. अंगावरल्या वस्त्रांनिशी सारे मागे सोडून जीव वाचवत त्यांना सीमापार यावे लागले.

पोपटीचा जन्म एका अमिल हिंदू कुटुंबात झाला. जिथे मुलींना इतर जातींपेक्षा अधिक सवलत आणि स्वातंत्र्य असे. तिचे वडील रामचंद्र हिरानंदानी फॉरेस्ट ऑफिसर होते त्यामुळे त्यांच्या बदल्या होत. त्यांना सात अपत्ये होती. पोपटी ही दुसऱ्या क्रमांकाची. तिचा जन्म १७ सप्टेंबर १९२४ सालचा हैदराबाद/पंजाबचा. देहांत १६ डिसेंबर २००५ रोजी मुंबईचा. सिंधी साहित्यातील एक महत्त्वाचे नाव आहे पोपटी हिरानंदानी. तिची ६० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात निबंध, कथा, कादंबऱ्या कविता, शिक्षणविषयक लेखन, स्त्रीवादी लेखन अनुस्यूत आहे. ह्या साऱ्याबरोबर एक प्रकारे प्रबोधन काळाची निर्मिती असल्याने, समाजाशी तिचे नाते घट्ट होते नि ती अन्यायाविरुद्ध सतत तिच्या लेखनातून आवाज उठवत होती. त्यावेळी कॉलेजमध्ये मुलींवर घरच्यांकडून घरकामाचा बोजा टाकून अभ्यासापासून दूर ठेवण्याचा प्रकार तिच्या लक्षात आला की ती सरळ त्यांच्या घरी जाऊन घरच्यांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व समजावत असे. हा प्रकार सिंधमध्ये असताना घरचे लोक सहजपणे स्वीकारत असत उलट मुलींचे काही चुकले तर तुम्ही त्यांना रागवा, आम्हाला सांगा असे सांगत असत. तिथे लोक एकमेकांना ओळखत असत, मुलांच्या हिताचेच शिक्षक करतील ह्याची खात्री असे. लोकांत एक जिव्हाळा असे. पाहता पाहता सारे बदलत गेले. मुला-मुलींना शिक्षकाने घरी आलेले पसंत पडेनासे झाले. 'आम्हाला सगळे समजते' असाही गर्व मुलांमध्ये आला. मुले दूरदूरहून शाळेत येत असत. त्यामुळे बाहेर खाणे गरजेचे असे. पूर्वी वेगळे काही घरात शिजले की आपल्या आवडत्या शिक्षकांसाठी डबा नेण्याची विद्यार्थांत चढाओढ असे, आता ती आपुलकी नाहीशी होत गेलेली जाणवू लागली होती.

अशा साऱ्या वातावरणाचा प्रभाव तिच्या लेखनात पडलेला आहे. त्या कुटुंबाच्या हैदराबाद आणि कराचीमधील वास्तव्यात आलेले अनुभव तिने आपल्या 'मेरे जीवन के सुनहले, रुपहले पन्ने' या आत्मकथेत नमूद केले आहेत. हेच तिच्याबद्दल आणि समाजजीवनाबद्दल जाणून घ्यायचे मोठे साधन आहे. हा एक मोठा साहित्यठेवा आहे. ही काहाणी जीवितराम सेतपाल यांनी हिंदीत अनुवादित केली आहे. सिंधीतून लेखन करणाऱ्या ह्या लेखिकेची बृहद आत्मकथा ज्योती पुनवानी यांनी इंग्रजीत अनुवादित केली आहे. ही आत्मकथा म्हणजे एक वेदनेची कहाणी आहे. सुखदु:खाचे, समाजजीवनातील अपेक्षा आणि धोकाधडीचे, वैभवाचे नि आर्थिक कमतरतेचे, नातलगांच्या प्रेमाचे नि वैराचे, सर्वात भीषण म्हणजे अक्षरश: पायाखालची जमीन हरवल्याचे अतोनात दु:ख संपूर्ण सिंधी समाजाला भोगावे लागणे, असा हा विशाल कालपट ह्या आत्मकथेत वाचायला मिळतो. होत्याचं नव्हतं एका राजकीय निर्णयाने कसे होते. भव्य वैभवशाली हवेल्या सोडून अंगावरील वस्त्रानीशी सारे सोडून जावे लागणे काय असते नि ते जीवन, तो प्रदेश पुन्हा पाहायलाही न मिळणे काय असते, हे लेखिकेने पोटतिडिकेने लिहिले आहे. सिंधी लोकांचे निष्कासन, हाल लोकांपर्यंत पोहोचलेले नाहीत. ही आत्मकथा ती उणीव अंशत: भरून काढते. त्यांना खटकते की आपल्या नेत्यांनी सिंधमधील आपल्या वाट्याचा छोटासा हिस्सा मिळावा याकरता राजकारण्यांनी वाद घातला नाही. ह्याच काळात पंजाब, बंगाल दुभंगले पण ते आपल्याच देशात राहिले, आपण मात्र स्वभूमी गमावली हे दु:ख सतत सलत राहिले. एका छोट्याशा कथेत ती नोंदवते की काही वर्षांनी पाकिस्तानमधून भेटायला आलेला बालपणाचा मित्र आता इथे प्रचंड धनाढ्य झालेल्या मित्राकडे येतो. त्याचे वैभव पाहून चक्रावतो. येताना त्याने मित्राच्या गायीच्या मोठ्या झालेल्या कालवडीच्या दुधाची मिठाई आणलेली असते; त्याहून बहुमूल्य भेट मित्राला वाटते ती तेथील पावसात भिजलेल्या मातीचा गोळा तो आपल्या शालीत बांधून आणलेला वहिनीला देतो. ह्या भेटवस्तूने त्यांचा अश्रूंचा बांध फुटतो. आपल्या देशाची माती हातात आल्याने भावुक होतात. त्या सिंधी लोकांच्या मनात देश हिरावला गेल्याची भावना तीव्र होती. त्यापुढे त्यांना दुसरे काही सुचतच नव्हते.

एक गमतीदार बाब लेखिका आपल्या पुस्तकात नोंदवते. सिंध-हैदराबादमध्ये काही लोकांना आमील हिंदू म्हटले जाते. ते इतर लोकांपेक्षा अधिक पुरोगामी असतात. त्यांच्या मुली नि बायकांना अधिक मोकळीक असते. हे कसे? कारण बाकी सर्व समाज रूढीग्रस्त नि मुलींना अजिबात मर्यादा ओलांडू न देणारा, असे कसे? तर हे लोक म्हणे युनानी-ग्रीक, अरब लोकांची पुढली संतान समजले जातात. त्यांचे दिसणे, नैसर्गिक गुण, कौशल्ये पाहिली की ते बरेचसे पटते. पण याला फारसे ठोस पुरावे दिले गेले नाहीत. सिंधमध्ये हिंदू समाज संख्येने कमी होता, मुस्लीम लोक अधिक होते. त्यातील काही कट्टर होते. खाजगीत एकमेकांची उणीदुणी आणि धडे शिकवणे चाले. यात पोपटीच्या एका काकाला शाळेतून उंटावर बसवून गुंडांनी

पळवून नेले आणि धर्मांतर करायला लावले. तो तिथून पळून आल्यावर त्याला हिंदू करून घ्यायला मात्र तिथल्या, हैदराबाद-सिंध पंचायतीने नकार दिला. त्यामुळे तो कुटुंबापासून कायमचा तुटला.

स्वत:च्या जीवनातला एकुलता एक हळुवार कोपरा, पुसटशी प्रेमकथा तिने आत्मकथेत दिली आहे. त्या अबोल प्रेमभंगानंतर तिने विवाहच केला नाही. त्याला आणखी एक कौटुंबिक कारण होते. वयाच्या दहाव्या वर्षी तिचे वडील अचानक गेले. त्या अगोदर त्यांनी तिला आणि तिच्या मोठ्या भावाला जवळ बोलावून सांगितले होते, 'मी आता जगत नाही. माझ्यानंतर सर्व धाकट्या भावंडांची जबाबदारी तुम्हा दोघांची आहे, खास करून पोपी तुझी आहे. कारण तुम्हा दोघांत तूच अधिक ठाम पणे काम करू शकशील. तो फार हळवा आहे.' वडिलांची शेवटची इच्छा शिरोधार्य मानून पोपटीने आपल्या सगळ्या भावंडांना मार्गी लावले. वडिलांनी त्यांच्या घरमालकाला उधार पैसे दिले होते. तोच एक नाद त्यांना होता. कुणाला गरज असेल तर ते लगेच पैसे काढून देत असत. त्यांच्या जाण्यानंतर सर्वच देणेकरांनी पोपटीच्या आईला पुरते फसवले.




वडिलांच्या राज्यात सात मुले आणि आईने वैभव उपभोगले. मोठे घर, कशाचीच कमतरता नव्हती. शेजारी म्हणजे एक विस्तारीत कुटुंबच असे. अगदी त्यांच्या घरातले कोळसे संपले तर खुशाल यांच्या दारातील कोळसे नेत असत. अडल्यानडल्याला हक्काने मदत देणेघेणे चालत असे. घरातील नोकरचाकर अत्यंत अदबीने मुलांशी वागत असत. त्यांना खांद्यावर बसवून शाळेत पोहोचवत असत. बाबा गेला नि सारेच आटून गेले. मुले सैरभैर झाली. आईचे वय ३२. जगाचा अनुभव शून्य. जवळच्या लोकांनी फसवले तेव्हा आजीकडे राहू लागले. वडिलांनी आपल्यावर आपल्या भावंडांची जबाबदारी टाकलीय ही जाणीव बालपणापासूनच पोपटीने मनात जपली होती. त्यांच्या आजीने आणि मामाने त्यांना आपल्याकडे नेले. आता कुटुंब १८ मुलांचे झाले. परंतु त्याची कुणाला फिकर नव्हती. मुले इतर भावंडांत मिसळून गेली. शाळा नि कुठे काही काम करता येईल का या चिंतेत पोपटी होती. आवाज चांगला होता म्हणून काही मुलींना गाणे शिकवायला जाऊ लागली. ती आयुष्यात अनेकदा मरणाच्या दारातून परतली आहे. आपल्या भावाबहिणींच्या अकाली जाण्याने ती हतबल झाली; पण सावरून घर संभाळले. ते लोक सक्कर गावी राहत असताना गच्चीवरून दोनदा खाली पडली होती. शिकारपूरला असताना कामवाल्या बाईंबरोबर बाजारात गेली नि हरवली होती. दोघा अनोळखी पुरुषांनी तिला खांद्यावर उचलले आणि भराभर जाऊ लागले. ही रडून गोंधळ घालत होती. हे काही विचित्र आहे हे जाणवून दोन सैनिकांनी त्यांना हटकले त्यांनी तिला उतरवले आणि ते बदमाश पळून गेले. दोघा सैनिकांनी तिला चणे दिले, शांत केले. रस्त्यावर ओरडू लागले 'ही कुणाची मुलगी आहे?' आई गच्चीवर काम करत होती ती धावत आली आणि तिला घेतले. असेच एकदा जीवघेण्या अपघातातून हातपाय तुटले, पण वाचली. आजीकडे मावशीची नऊ मुले, काकांची दोन नि ही सात असा माहोल होता. एकमेकांना धरून राहण्याचा काळ होता.

शेजारी साधू वासवाणींचा आश्रम होता. तेथील वातावरणाचा त्यांच्या कुटंबावर खूप खोल परिणाम होता. त्यांची प्रवचने हिंदू-मुस्लिम आणि इतर धर्मीय लोकांनादेखील आकर्षित करत. संगीत, धार्मिक प्रवचनं, गीतेच्या श्लोकांचा अर्थ ते इतक्या रसाळ वाणीने सांगत, की लेखिकेच्या मनावर 'उत्तीष्ट जाग्रत' हे शब्द कायमचे कोरले गेले. पहाटे उठून घराचे मोठे तिथे जात असत. ते संस्कृत, इंग्रजी अत्यंत सफाईने बोलत असत. लहानपणापासूनच या साऱ्याची गोडी तिला लागली होती.

वास्तविक तिने वयाच्या चौदाव्या वर्षापासून जे मिळेल ते काम करून पैसे कमावायला सुरुवात केली होती. फारसी भाषा घेऊन तिने मॅट्रिक केले पण ओढ होती संस्कृतची. बनारस विद्यापीठातून केले तेही बाहेरून अभ्यास करून. कॉलेजात अनेकदा प्राध्यापक आणि शिक्षकांवर अन्याय होई, पण सारे चुपचाप सहन करत ही मात्र आवाज उठवत असे. 'तूच एकटीच बोलतेस, तुला पटत नसेल तर तू कॉलेज सोड.' असेही ऐकावे लागे. परंतु परिणामी व्यवस्थापनात बदल होई. तिच्या एका मुलाखतीत ती म्हणते की आम्ही अमिल जातीचे असल्याने आमच्यात मुलींच्या शिक्षणाची परंपरा होती. मुलींना कॉलेजात पाठवले जाई उच्च शिक्षण प्राप्त करत असत. पर्शियन भाषा हा शाळेत अनिवार्य विषय होता.

तिथे शिकताना संगीताच्या आवडीने गझल आणि ठुमरीचे कार्यक्रम रेडिओवर ऐकत असे. घराच्या समारंभात गात असे. हिंदीबरोबरच इंग्रजी आणि सिंधी गाणी, कविता तिला तोंडपाठ होत्या. तेव्हापासूनच ती कविता करत असे. सिंधी भाषा देवनागरी आणी अरेबिक लिपीत लिहिली जाते. तिला ह्याच वयात एक प्रेमाचे वळण आले. ती मोकळेपणाने आपल्या मैत्रिणींसोबत कॉलेजात जात असे. तिथेच एक मुलगा तिची वाट पाहात उभा असे. नुसते एकमेकांकडे पाहण्यातच तेव्हा अधीरता वाटे, आकर्षण वाटे. एकमेकांकडे पाहून हसण्याचे

धैर्य यायलाही काही दिवस गेले. तो तरुण उंच नि देखणा होता; पण भित्रा. काही दिवसांनी तो इंजिनीयरिंग कॉलेजला कराचीला गेला. ही मात्र त्यांची स्वप्ने पाहत राहिली. त्याच्यात तिच्याशी बोलायचे, विचारायचे धैर्य नव्हते त्यामुळे ते प्रेम पुढे जाऊच शकले नाही. बऱ्याच वर्षांनी भेटला तेव्हा लठ्ठ झालेला होता, पोट सुटलेले होते. रस्त्यात तिला थांबवून म्हणाला, 'तुम्ही पोपटी ना? मी वाचतो तुमचे लेखन.' हिला काही सुचले नाही 'हं' म्हणून निघून गेली. तोवर मनातले सारेच कायमचेच विझले होते.

आयुष्य ठीकठाक चाललं होतं आणि संपूर्ण सिंधी समाजावर स्थलांतर करायची वेळ आली. त्यांच्या नेत्यांनी एक छोटा तरी हिस्सा सिंधी हिंदूंना द्या असा आग्रह केला पण राजकीय नेत्यांनी भारतात तुम्हाला इथल्या वाळवंटापेक्षा चांगला प्रदेश मिळेल असे आश्वासन दिले. इथे आल्यावर घोर निराशा झाली. स्थानिकांनी स्वीकारले तर नाहीच उलट हिडीसफिडीस केले. डुप्लिकेट माल बनवणारे, स्मगलर म्हणून हेटाळणी केली. सिंधी लोकांनी आपल्या व्यापार आणि इतर कौशल्याने आरंभी पापड-लोणची बनवून विकली, नाना तऱ्हेचे उद्योग केले. आज ह्यातील बहुसंख्य लोक उद्योग, चित्रपट व्यवसायापासून शिक्षण संस्था, आरोग्य संस्थांत उच्च पदावर काम करत आहेत. पैसेवाले झाले आहेत. इथे आलेले तुच्छतेचे अनुभव समाजाच्या जिव्हारी लागले होते. आज ७५ वर्षांनंतर जुन्या पिढीत अजून सलते आहे. सिंध प्रांतात लक्षाधीश असलेल्या आणि मोठमोठ्या इस्टेटी असलेल्या लोकांना इथे त्यानुसार इस्टेटी मिळायला हव्या होत्या. इथून गेलेल्या लोकांच्या इस्टेटीची देवाणघेवाण अधिकारी लोक नीट करत नव्हते. त्यांना नाडले गेले हे शल्य राहिलेच.

हळुवार कथा, कविता लिहिणाऱ्या पोपटीने फाळणीच्या ह्या निर्दयी आघातानंतर फक्त वेदनेच्या, संघर्षाच्या कथा, लेख, शोधनिबंध लिहिले आणि आपले नाव सिंधी साहित्यात अजरामर केले. तिला सर्वात जास्त राग येई तो पुरुष स्त्रीला, मग ती नोकरी करून स्वकमाई करणारी असो वा गृहिणी असो, कमी लेखत असे याचा. अगदी साहित्य संस्थांमध्येही लेखिकांबद्दल आदरभाव नसे. त्यामुळे तिने तिथे जाणेच सोडून दिले. प्रत्येक वेळी वाद घालणे तिला प्रशस्त वाटत नसे. तिने लग्न न करणे हा आज फार मोठा इश्यू नसला तरी त्याकाळी तो कुतूहलाचा नि विनाकारणच खोडसाळपणा करण्याचा नक्कीच होता. त्याला एक कारण होते म्हणजे तेव्हाची हुंडापद्धत, आजही आहे, पण तेव्हासारखी कडक नाही. या एका कारणाने तिने लग्नाला नकार दिला. हुंडा न घेणारे तरुण अगदीच फारशी कमाई न करणारे, बिनकामाचे होते साहजिकच तिने नाकारले पण आपल्यामुळे आपल्या धाकट्या बहिणीला मुलगा आवडल्यावर त्रास होऊ नये म्हणून तिच्या लग्नात मात्र तिच्यासाठी भरपूर हुंडा देऊन खर्चही केला.

आणखी एका मुद्दा तिला जवळचा होता तो म्हणजे तरुण सिंधी मुले सिंधी भाषा शिकत नाहीत. त्यातील वाङ्मय वाचत नाहीत हा. तो तर आज अनेकांना भारतीय भाषांबाबत टोचताना दिसतोय. सिंधी भाषेची लिपी ही देवनागरी, उर्दू, अरेबिक लिपीहून भिन्न आहे तरी काही गोष्टी समानही आहेत. सिंध, कराची हा ब्रिटिश काळात मुंबई रेसिडन्सीचा भाग होता. परीक्षा,पेपर्स इकडेच तपासायला यायचे. आमची मायभूमीच गेली असे नाही तर त्यामुळे आमची सिंधीयतही गेली. कारण लोक अनेक ठिकाणी विखुरले. तेथल्या भाषिक संस्कृतीत त्यांचे स्वत:चे साहित्य, कला, धार्मिक रीती, सिंधू नदीकिनाऱ्याच्या मोहेन्जोदारोपासूनच्या गंगाजमुनी संस्कृतीचा विसर पडू लागला. आताची पिढी तर इंग्रजीच्या मार्गावर जात आहे. अनेक सिंधी विदेशात स्थिरावले आहेत. त्यांच्याही मनात आपले खूप काही गमावल्याचं दु:ख साऱ्या समृद्धीतही खदखदत आहे.

तिच्या लेखनात हे दु:ख पाझरत आहेच. तिचे समीक्षक म्हणतात तिच्या बोलीतून बंदुकीच्या गोळीगत सटासट शब्द येतात जे समाजाला विद्ध करतात, खडसावतात. तिच्या ग्रंथसंग्रहातील एकेक व्यथा स्त्रीच्या त्रासाची आणि तिने घेतलेल्या बदल्यांची कथा सांगते. 'ब्रह्माची की भूल' कथेत एका स्त्रीला घरातलेच वेश्या व्यवसाय करायला भाग पाडतात. तिच्या साध्या इच्छा पुऱ्या होऊ शकत नाहीत. ह्यात तिची काय चूक? तिचा काकाच गिऱ्हाईक बनून तिचे शोषण करायला येऊ लागतो. पुढे तिच्या सुंदर, कोमल, निरागस मुलीच्या कपाळी वेश्येची मुलगी असा शिक्का बसतो! तिचे भावनिक जग तर उद्ध्वस्त होते. तिच्या मनात पुरुष जातीबद्दल तीव्र राग, चीड निर्माण होते. त्यानंतर ती त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारे सूड उगवू लागते. त्यांची घरे उद्ध्वस्त करू लागते. नवराबायकोत भांडणे लावते. एवढंच तिच्या हाती असते. 'काली गुलाबजी, सागर शराब जो, शहनाझ, सैलाब जिंदगी जो, दाग' ह्या तिच्या हळुवार कथा. ती स्त्रीहृदयच्या कोमलतेबरोबरच तिचा क्षुद्रपणा, हेवेदावे, बनेलपणा, अगतिकता ती शब्दांत अचूकपणे पकडते. त्यातही पुरुषप्रधान समाजाने, घरच्यांनी तिला दाबून ठेवलेले असते. भ्रमनिरास, खोटेपणा, छळ ह्या साऱ्याला तोंड देत ती आपली भूमी शोधत असते.

पोपटीची 'डाग' ही कथा मला खूपच रोचक वाटली. 'समकालीन' ह्या साहित्य अकादमीच्या १९९१ सालच्या सिंधी भाषा साहित्य विशेषांकात वाचायला मिळाली. कथानायिकेला नाव नाही. 'अरी ओ' आणि 'जेठाणीजी' असे संबोधन पुरेसे असते. एकदा ती रेल्वेने बहिणीकडे चाललेली असते. देवरानी आणि दीर तिला स्त्रियांच्या डब्यात बसवून देतात; पण त्या वर्गातील बायका मध्येच उतरून जाणार असतात, त्यामुळे मुंबईपर्यंत एकटी नको म्हणून पुरुषांच्या डब्यात ती बसते.

बाहेर देवरानीच्या ओळखीची कुणी भेटते. ती विचारते, 'तुझ्या जेठाणीला किती मुलं आहेत?' त्यावर 'कुठली आलीत मुलं? बारा वर्षं झालीत लग्नाला!' कुत्सितपणे मैत्रीण म्हणते, 'वांझोटी असेल तर कुठं होणार मुलं?' तिला ऐकायला जाईल असेच बोलत असतात. तिच्या जिव्हारी लागते कसेबसे अश्रू आवरते. नि गाडी सुटल्यावर डोळे गळू लागतात. गाडीत समोर एक वयस्क माणूस बसलेला असतो तो सारे पाहत असतो. सुटाबुटात असतो. तरतरीत नाक, रंग गोरा, उंचपुरा असतो. तिच्याकडे पाहत असतो, तिच्याकडे पाहून हसू की नको ह्या द्विधेत असतो. गाडी निघते. एका स्टेशनवर तो द्राक्षे घेतो. तिलाही आग्रह करतो 'घ्या की.' हो नाही करत ती थोडीशी घेते.

अलीकडे आपला नवरा आपल्याकडे पाहून धड हसत, बोलत नाही. सारखं म्हणतो 'मी तर आता कामच सोडून देणार आहे. कोण आहे माझ्यामागे की मी कष्ट करून कमवावं?' इतरांशी हसतो बोलतो, मी समोर गेले की एकदम स्वीच ऑफ व्हावा तसा गप्प बसतो. कारण आपल्याला मूल नाही. नाना प्रकारच्या डॉक्टरी चाचण्याही झाल्या. एका नामांकित इंग्रज डॉक्टरनेही तपासले नि म्हणाला 'मला तसा काही दोष दिसत नाही.' न जाणे खरं काय आहे?

माझ्या समोरच्याने आता कपडे बदलले आणि तो रात्रीसाठीचे सैलसर पांढरे स्वच्छ कपडे घालून आला. वरच्या बर्थवर दुसरा एक प्रवासी येऊन निजून गेला. तिनेही आपली निजायची तयारी केली थोडावेळ बाहेर बघत राहिली आणि आडवी झाली. तिला जाणवत होते की समोरच्याची नजर तिच्यावरून फिरत आहे. परंतु तिला भीती वाटली नाही. शांतपणे तिला झोप लागली. पहाट झाली असेल नसेल दुसरा प्रवासी उतरून गेला होता. ते दोघेच असावेत. तिने थंडी लागली म्हणून चादर वर ओढायचा प्रयत्न केला, पण वर होत नव्हती. तिने पाहिले तर तो तिच्या पायाशी बसलेला होता. तिने काही हरकत घेतली नाही. तो तिच्यावर झुकला. तिला कुठेतरी बरे वाटत होते. माझे काय लुटणार होता? तशीही वांझोटीच होते न? त्याने तिच्या पायांवरून चादर दूर केली. मला मूल हवंय, माझी काय चूक आहे? असे विचार येत होते. त्याने तिला हळुवार स्पर्श केला. तिला सारे हवहवेसे वाटत होते. तिच्या छातीत धडधड होत होती. आता बाहेर गडद अंधार होता. एवढ्यात स्टेशन आले. गाडीने शिटी दिली. आता ते दोघेच डब्यात होते खालच्या बर्थवर आपापल्या जागी होते. तिला जाग आली. तर त्याला गाढ झोप लागली होती. झोपेत त्याच्या दंडावरची चादर थोडी बाजूला झाली तर तिला एक चौकोनी आकाराचा तपकिरी रंगाचा डाग तिथे दिसला.

* * *

नर्स तिच्याजवळ आली आणि तिला मुलीला कसे पाजायचे ते दाखवू लागली होती. ती गोड, गोरी, नाजूक लांब बोटांची लेक पाहून ती हरखून गेली होती. आता नवरा आल्यावर काय रामायण होईल याची भीती तिला सतावत होती. तो कामासाठी बाहेरगावी गेला होता. मुलगी झाल्याचे ऐकून तो तडक विमानाने परत आला. छोटीच्या स्पर्शाने तिला अत्यानंद झाला होता. ही आपल्या पोटात होती? नर्स म्हणाली, 'खूप सुंदर आहे तुमची मुलगी. किती नाजूक आहे!' बाळीला पाजताना अंगातून शिरशिरी जात होती. आता आपण पूर्ण झालो. तिला पाहून तो काय म्हणेल? 'कुणाला भेटलीस? कुणाची पोर ही?' नर्सने बाळीला तिच्याहून दूर करून एका कुशीवर निजवले. तिने छानसा तृप्तीचा ढेकर दिला. ती एकदम चमकली. बाळीच्या दंडावर तसाच डाग होता, भुरकट रंगाचा! तेवढीच त्याची ओळख तिच्याजवळ होती. बापरे! आता काय काय ऐकावे लागेल? तिने बाळीला दूरच ठेवले. नर्स म्हणाली, 'काय झालं एकदम चेहऱ्याचा रंग उतरला?' ती म्हणाली, 'नाही ग एकदम थकवा आलाय.'

आई बनण्याची माझी मनीषा तर पूर्ण झाली. तो माझा हक्क होता, जो माझा पती मला देऊ शकत नव्हता. एवढेच नव्हे तर त्याने मला धोका दिलाय. वांझ म्हणून मलाच लाथाडले जात होते तेव्हा हा चूप होता. माझाच राग करत होता. आता तो हिला नाकारेल? शक्यच नाही! त्यामुळे त्यांचेच पितळ उघडे पडेल. तो आला त्याने लेकीला पाहिले, मनापासून खूश झाला. लेकीला कुठे ठेवू कुठे नको असे त्याला झाले होते. सारखा तिला न्याहाळत होता. 'कुठं होतीस ग तू इतके दिवस?' एकदा ती लेकीला पावडर लावताना तो डाग पुसत होती. तो म्हणाला, 'अग वेडे ती जन्मखूण आहे, अशी पुसून जाईल होय?' त्याने छोटीचे हात आपल्या गळ्याभोवती घेतले. 'माझी लाडली!' तिच्या हृदयाचे पाणी पाणी होत होते तो काही विचारेल म्हणून प्रत्येक वेळी तिला भीती ग्रासत असे. एके रात्री तिला जाग आली तर बाजूला छोटी नव्हती अन नवराही नव्हता. कुठे गेला हा तिला घेऊन ती गारठली. पलंगाजवळच कोसळली, खुळखुळा तिथेच होता, पाळणा रिकामा होता. गॅलरीतून आवाज आला, 'माझ्या फुला उमल जरा.' ऐकून तिच्या जिवात जीव आला. तिला घाबरलेली पाहून तो म्हणाला, 'अग काय झालं? पडलीस की काय? अग बेबीला खोकला येत होता, तुला जाग येऊ नये म्हणून जरा हवेसाठी बाहेर नेलं होतं. गार वाऱ्याने आणि मी थोपटल्याने तिचा खोकला थांबला नि ती गाढ निजलीय. बघा कसं पक्का बाबा झालोय न मी?'

समाधानाचा सुस्कारा टाकत तिने त्या दोघांना कवेत घेतले. इथं कथा संपते. ती वर अधिक काही बोलायची गरज नाहीय.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com



अनुराधा गांगल

# आमची मैत्रीण, उत्साहमूर्ती अरुणा साधू

अरुणा आता आम्हा मैत्रिणींत नाही ही कल्पनाच मनाला पटत नाही. कसा हा दैवदुर्विलास आहे!

अरुणा मूळ अमरावतीची. तिचे माहेरचे आडनाव सबनवीस. तिच्या घरी आई, बापूसाहेब, काका-काकू, आजी, आत्या अन् सर्वांची मुले असे एकत्रित, एकोप्याचे कुटुंब होते. अरुणाचे वडील शिक्षक होते. त्यामुळे घरात शिक्षणाला तसा 'वाव' होताच, तरीही वेळच्या वेळी घरातल्या सगळ्या गोष्टी, व्रतवैकल्ये, देवधर्म होणे याला प्राधान्य दिले जाई. अरुणासाठी योग्य वयात स्थळे पाहिली जाऊ लागली असणार. अरुण साधू हे परतवाड्याचे अन् अरुणा अमरावतीची. साधूंची बहीण अन् साधू रीतसर मुलगी पाहायला गेले. मुलगा वर्तमानपत्रात नोकरी करतो असे कळताच, स्वयंपाकघरात कुजबूज सुरू झाली; 'अगो बाई, मुलगा वर्तमानपत्रे टाकतो, वाटते!' स्वयंपाकघर असे दबलेले, बुजलेले होते. अरुणाचे लग्न झाल्यावर काही वर्षांतच, त्यांना वर्तमानपत्रातील 'साधू' ही कशी अन् किती मोठी 'चीज' आहेत हे कळून चुकले असेलच!

अरुणा मुंबईसारख्या मोठ्या शहरात, इतक्या लांब कशी काय राहणार? तिचे कसे होणार? या गोष्टींमुळे घरात काळजीचा 'सूर' असे. मात्र अरुणा काही वर्षांतच मुंबईच्या वातावरणात कशी सामील झाली ते कोणाला कळलेच नाही. थोड्या काळात ती पूर्ण मुंबईकर झाली. कुर्ल्यात 'नेहरूनगर'मध्ये बरेच पत्रकार मित्र राहत होते. त्यामुळे आमच्या सर्वांच्या छान 'गट्ट्या' जमल्या. साधू-गांगल-जैन हे तिघे मित्र असल्याने आम्हा तिघींचे- मी अन् अरुणा आणि अशोक जैन यांची बहीण कमल - एकमेकींकडे जाणे-येणे खूप होऊ लागले. अडीअडचणीला, नवीन संसाराच्या गोष्टींना आम्ही मौजमजेत सामोऱ्या जात होतो. संसार वाढत असताना अनेक अडचणी येत. अडचणी छोट्यामोठ्या असत, पण आम्ही एकमेकींना धरून मने मोकळी करत, हसतखेळत संसारात रममाण होत होतो. अशोक जैन यांची बहीण कमल ही तर



चित्र - विकास मुणगेकर

आम्हा दोन्ही कुटुंबांची पाठराखीणच होती!

आम्ही तिघी बऱ्याचदा एकत्रित जेवत असू. अरुणाकडे गेलो तर तिच्या जेवणात खास 'वऱ्हाडी' अशी एक गोष्ट असे. एका छोट्या कढल्यात 'फोडणी' केलेली असे. त्यात चमचा असे. कढीमध्ये, भातावर, कधी पीठ पेरलेल्या भाजीवर त्या फोडणीतून एक चमचा 'फोडणीचे तेल' आपल्याला हवे तसे घ्यायचे. हा तिचा खास वऱ्हाडी बेत असे.

अरुणाचा स्वतःचा ठसकाही वऱ्हाडी असे. बोलण्याचा, खाण्याचा, वागण्याचा. लग्न झाल्यावर एखादे वर्षभर त्या ठेक्यात, त्या ठसक्यात अरुणा बोलत असे. पुढे तिचे बोलणे खास 'मुंबईबाज' झाले. मात्र वडाभात, फोडणीची पद्धत, मस्त

चमचमीत तिखट खाणे हे तिला आवडत होतेच. थोड्याच वर्षांत सगळ्या गोष्टी बदलून अरुणा प्युअर मुंबईकर झाली. तिची आई राहायला आली की फार छान वाटत असे. खूप वेळ गप्पा मारून, 'आता निघते हं' असे म्हटले तरी अरुणाची आई म्हणे, 'काय गं अनुराधा, इतक्या लवकर काय गं जाऊन राहिलीस? बस की.' अशी ही वऱ्हाडी गोड बोली कानाला छान वाटत असे.

आम्हा दोघींना दोन-दोन मुली. मुली मोठ्या होत होत्या. नवरेबुवांचे काही ना काही मोठमोठे विचार, प्रकल्प, साहित्य समोर येत होते. आम्ही सगळ्या जणी संसारात थोड्याशा सुटवंग झालो होतो. काही ना काही चालू असायचे, पण खूप मोठे काही सापडत नसायचे. अरुणा खूप हौशी, आनंदी, चेष्टेखोर, सर्वांशी गप्पागोष्टी करणारी. मग हिचे केळवण कर, सर्वांना एकत्र बोलावून अंगतपंगत कर, भोंडला कर, मंगळागौरी कर, कोजागिरीचे जागरण म्हणजे नाच-गाणी-गप्पा कर, मग रात्री कॉफी पिऊन घरी जायचे... असे नाना प्रकार ती करत असे.

एकीकडे साधूंचे लिखाण चालू होते. त्यांचे पुस्तक 'मुंबई दिनांक' आले अन् त्यांच्या नावाला त्याच पुस्तकाने उंचीवर नेऊन ठेवले. ते इतके गाजले, की साधूंच्या लेखणीला छान 'धार' लागली. साधूंच्या एकेक पुस्तकाची 'शिग' वाढू लागली. प्रत्येक पुस्तक त्यांच्या ललाटरेषांचे भाग्योदय ठरले. साधू कंपनी वांद्र्याला राहायला गेली. पण आमची मैत्री वांद्रा-कुर्ला 'फेऱ्यां'मुळे विसरली मात्र गेली नाही.

आमचा मित्रपरिवार वाढत गेला- खूप मोठा झाला. आमच्या काही मैत्रिणींनी स्त्रीमुक्ती संघटनेची स्थापना केली. तिथेही उत्सुकतेने, त्यांच्या मीटिंगला आम्ही जाऊ लागलो. अरुणाचा स्वभाव हरहुन्नरी, दिलखुलास, विनोदी होता. ती झट्कन सर्वत्र 'रमून' जायची. स्त्रीमुक्ती संघटनेच्या अनेक योजनांत ती सामील होऊ लागली. 'मुलगी झाली हो' नाटकात ती आणि अन् 'हुंडा नको गं बाई' नाटकात सुवर्णा- तिची मुलगी चमकू लागल्या.

मग अरुणाने दादरला जाऊन योगासनांचा क्लास जॉईन केला. ती परीक्षा उत्तीर्ण झाली. एका मस्त जीवनाच्या सफलतेला वाव मिळाला. काही वर्षांतच तिने घरी योगासनांचे क्लास सुरू केले. उत्तम शिकवणे, उत्तम बोलणे, उत्तम चेष्टामस्करीत मित्र-मैत्रिणी जोडणे, अन् योग्य व्याधीवर योग्य आसन सांगणे... या सर्वांमुळे क्लासच्या वर्गाची हजेरी वाढू लागली. साहित्य सहवास, आर्टेक कॉलनी, गांधीनगर सर्वत्र 'साधू योगा क्लास'चा बोलबाला झाला. अनेक जण नियमित क्लासला येऊ लागले. त्यांच्या शरीरात बदल होऊ लागला, दुखणी-खुपणी कमी होऊ लागली.

एकदा साधूंकडे विलेपार्ले येथील महाबळ आले होते. त्यांनी 'आमचा वारीचापण एक ग्रूप आहे. आम्ही नियमित



**अनुराधा गांगल, अरुणा साधू आणि मेधा शेंडे**

'वारी'ला पंढरपूरला जातो' असे सांगताच अरुणाने त्यांच्याकडे सखोल चौकशी केली. तिच्या मनात कुठेतरी दडलेले होतेच, पायी पंढरपूर वारी करायची! अरुणाच्या माहेरचे वातावरण धार्मिक; पूजाअर्चा, व्रतवैकल्ये यांनी भारलेले असेच. तो लहानपणापासून धार्मिकतेचा, भावभक्तीचा एक धागा तिच्या मनाला भिडलेलाच होता. नवऱ्यामुळे पुढारलेले विज्ञानही कानावर पडत होते, पण भावभक्तीचा धागा सुटलेला नव्हता. सर्व विचारपूस करून कमल अन् अरुणा दोघी पायी चालत पंढरपूरला जाऊन आल्या. मनात दडलेली भक्ती होती, देवावरचा भाव होता तो मिळवण्यास जी निष्ठा लागते, जिद्द लागते ती अरुणाजवळ होती. विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवून ती सुखमय शांत झाली. एक मानाचा 'तुरा' खोवला गेला. योगाभ्यास करणे अन् दुसऱ्यांना त्याचा उपयोग करून देणे, तो उपयोग पटल्याने नियमित व्यायाम करणे ही गोष्ट तिला पटली होतीच, म्हणून दुसऱ्यांनाही त्याचा लाभ ती देत होती. हाही दुसरा झगमगता तुरा अरुणाच्या डोक्यात खोवला गेला. तरी अरुणा आमची साधीसुधी मैत्रीणच होती- मैत्रीणच राहिली.

त्याच भक्तिभावाची एक किनार म्हणजे शेगावचे श्री गजानन महाराज. गजानन महाराजांवर अरुणाची नितांत श्रद्धा होती, भक्ती होती. तिने काही वेळा शेगावला जाऊन सबंध पोथीवाचन तेथे केले आहे. मलाही ती एकदा शेगावला घेऊन गेली होती. त्यात इतका भाव, इतकी भक्ती की आता आजारी होती तरी जरासे बरे वाटले होते त्या काळात ती शेफालीला घेऊन शेगावला जाऊन पाया पडून आली. या तिच्या भावभक्तीपुढेही नतमस्तक व्हायला होई.

इकडे साधूंच्या पुस्तकांचा गठ्ठा इतका वाढला, की शिडी लावावी लागत असे. सर्व पुस्तके गाजत होती. शांत मनाचे साधू, शांतचित्ताने लिहीत असत. ते पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख होते. त्यांचे एकेक पाऊल धीमेपणाने पण मजबूत, कणखर पडत होते. त्यांची पुस्तके येत तर होतीच.



अरुणा साधू

अनेक विषयांवर भाषणेही होत होती. ते २००७ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. खूप खूप धन्य वाटले! आपल्यातलाच एक, एवढे मोठे पद भूषवत आहे हे पाहायला सर्व महाराष्ट्र उचंबळून, ओथंबल्या मनाने तेथे आला होता. मितभाषी, हुशार, साधू अध्यक्ष झाले होते. अरुणाचे आई-वडील, भाऊ-बहीण, काका-काकू सगळे सगळे अन् आम्ही सगळा मित्रपरिवार अन् सर्व महाराष्ट्राचा साहित्यिकवर्ग जमा झाला होता. साधूंना स्टेजवर नेले. नंतर अरुणालापण स्टेजवर बोलावले. तिचाही साधूंबरोबर सत्कार केला गेला! आमची मैत्रीण, साधीसुधी गृहिणी, पण एवढ्या प्रचंड समुदायापुढे स्टेजवर जाते. मानाने सत्कार घेते... हा तर किती मोठा मानाचा तुरा. लखलखता, चमचमता, झुळझुळता. मुकुटावरचा भरजरी तुरा!

अरुणा दीड दिवसाचा गणपती आणू लागली. गौरी (उभ्याच्या) बसवू लागली. गौरी-गणपतीची आरास जरी पाहिली तरी अचंबा वाटे. त्या गौरी, त्यांच्याकडे बघितले तरी या दोघी उभ्या असलेल्या गौरी या ज्येष्ठा अन् कनिष्ठा अशा दोघी बहिणींकडे पाहताना मनाचे भान हरपून जाई- मन भारावून जाई. आता तुम्ही काय म्हणता बरे? असे त्यांच्याकडे पाहताच म्हणावेसे वाटे, इतके त्यांच्या मुखांवर तेज चढे. ती त्यांची आरास, करंज्या, चकल्या, लाडू अशा गोष्टींनी भरलेला तो भावभक्तीचा समारंभ पाहताच त्यांच्या तोंडावर माहेरवाशीणीची खुशी दिसत असे. तृप्तीची भावना वाटे. ती असे भरजरी साड्या नेसायला अन् पुरणपोळी जेवायला, अरुणा तर पुरणपोळ्या अशा भरभर करत असे की बघता सोय नाही. गौरींना पुरणाबरोबर आंबीलचा नैवेद्य केला जाई. एकीकडे संमेलनाच्या अध्यक्षीणबाई अन् एकीकडे ही भावभक्तीने भरलेली, आपुलकीने, मायेने गौरींना साग्रसंगीत तृप्त करणारी, आसुसलेली भक्तीणबाई. कमालच होती तिच्या या दोन्ही गोष्टींच्या मिलाफाची.

अरुण साधूंचे आजारपण आणि त्यांचे निधन हा धक्का अरुणाला महाप्रचंड, जबरदस्त होता. त्या धक्क्यातून ती सावरणे खूप खूप कठीण होते. परंतु घरात विचार करकरून ती थकली नाही. साधूंच्या नावाचा पुरस्कार, एखाद्या हुशार, कर्तृत्ववान पत्रकाराला पाठ्यवृत्ती देण्याचे मुलींनी व तिने ठरवले. साधूंच्या कर्तृत्वाला साजेसे आपण काही करतोय, यामुळे तिच्या मनाला थोडासा तरी दिलासा मिळाला. मग तिने स्वत:ला अनेक विषयांत दंग करून घेतले. गुतूंन घेतले.

माणसांचे वयोमान खूप वाढत आहे. माणसे दीर्घायुष्य आनंदात व्यतीत करतात. आमची अरुणा फक्त ७३ वर्षांची. ७४ वे लागले असेल, लहानच होती.

जीवनात तिने अनेक गोष्टी हसतमुखाने केल्या, यापुढील वाटचालीची आपल्याला कल्पना नसते. ती तिची वाटचालही सुखी व्हावी हीच इच्छा!

**– अनुराधा गांगल**

भ्रमणध्वनी : ७७३८२९८५१७

ग्रंथाली

# आणि मी रस्ता ओलांडला

**श्रीकांत बोजेवार**





ऋतुरंगमधील लेखकाच्या सहा लेखांचे हे छोटेखानी पुस्तक. 'ऋतुरंग'चे विषय अनेकदा स्वानुभवाशी निगडित असतात त्यामुळे यातील बहुतांश लेखांचे स्वरूप थोडे आत्मचरित्रात्मक आहे.

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

||ग्रंथाली||

# गंधर्वांचे देणे पं. कुमारजींशी संवाद

संपादन- अतुल देऊळगावकर




**एका अभूतपूर्व मुलाखतमैफलीचे पुस्तक**
**सोबत ५४ क्यूआर कोड ज्यात ५ तासांचे गायन**

ग्रंथालीने १९८५ मध्ये प्रतिभावान गायक-रागरचनाकार पं. कुमारगंधर्व यांची गायनासह रागदारी उलगडून दाखवणारी सलग सहा दिवस मुलाखतमैफल आयोजित केली होती, त्यातील त्यांच्या संगीतविचारांचे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. यात आहे त्यावेळी त्यांनी गायलेल्या बंदिशी/चिजांचे चौपन्न क्यूआर कोड पुस्तकात असणार आहेत.
अतुल देऊळगावकर यांनी संपादन केलेल्या या पुस्तकाला पं. सुरेश तळवलकर यांची प्रस्तावना लाभली आहे. वाचावे, संग्रही ठेवावे, भेट द्यावे असे हे गंधर्वांचे देणे!

**मुल्य ८०० रु.**
**सवलतीत ५००रु.**

घरपोच हवे असल्यास
पाठणावळ खर्च वेगळा
संपर्क - ९२२३४६६८६०


# गंधर्वांचे देणे – एक भावगर्भ आणि संपन्न अनुभव!

ग्रंथाली आणि एनसीपीए आयोजित 'गंधर्वांचे देणे' या पुस्तकाच्या प्रकाशनाचा आणि मैफलीचा अविस्मरणीय सोहळा एनसीपीएच्या टाटा थिएटरमध्ये ४ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी संपन्न झाला. १९८५ साली ग्रंथालीने प्रतिभावान गायक, रचनाकार पं. कुमारगंधर्व यांची गायनासह रागदारी उलगडून दाखवणारी सलग सहा दिवसांची मुलाखतमैफल आयोजित केली होती. कुमारगंधर्व यांच्या जन्मशताब्दीवर्षाच्या सांगतेचे औचित्य साधून त्या मुलाखत-मैफलींचा अनमोल ठेवा अतुल देऊळगावकर यांनी कुमारजींनी गायलेल्या बंदिशी / चिजांच्या ५४ क्यूआर कोडसह 'गंधर्वांचे देणे' या पुस्तकात संपादित केला आहे, ज्याला पं. सुरेश तळवलकर यांची प्रस्तावना लाभली आहे. या पुस्तकाच्या प्रकाशसोहळ्याच्या निमित्ताने कुमारजींना अभिवादन करणारी यादगार मैफल पं. सत्यशील देशपांडे, अश्विनी भिडे-देशपांडे, कुमारजींचे नातू भुवनेश कोमकली यांनी कुमारजींच्या हृद्य आठवणींचा शेला गुंफत सादर केली. चंद्रकांत काळे आणि माधुरी पुरंदरे यांच्या 'गंधर्वांचे देणे' या पुस्तकातील उताऱ्यांच्या सहजसुंदर अभिवाचनाने सोहळ्याची सुरुवात झाली. ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून ग्रंथालीच्या विविध उपक्रमांचा आढावा घेत ग्रंथालीची भूमिका विशद केली.

''कुमारजींना न बोलता जे सांगायचं होतं ते मला पाहायला मिळालं. इतका मी भाग्यवान आहे. कुमारजी नेहमी म्हणायचे'' मी कोण आहे हे विसरण्यासाठी संगीत आहे, अशी आठवण पंडित सुरेश तळवलकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली. ते आपल्या मनोगतात म्हणाले, ''नवनवीन प्रयोग करायला मी कुमारजींकडून शिकलो.ज्यामुळे मी जोड-ताल ही संकल्पना मांडू शकलो. कुमारजी तबल्याबद्दल खूप सुंदर म्हणायचे. ते म्हणायचे की गायक गात असताना मागे दोन तानपुरे असतात, तसं तबला वाद्याला कसं पाहायचं तर तबला हा लयीचा तानपुरा म्हणून सिद्ध झाला पाहिजे.'' समृद्ध करणारे अनेक विचार या सोहळ्याच्या निमित्ताने श्रोत्यांना ऐकायला मिळाले. ज्येष्ठ संपादक ग्रंथालीचे संस्थापक-सदस्य कुमार केतकर आपल्या मनोगतात म्हणाले की ''ग्रंथालीचे सर्वे सर्वा दिनकर गांगल यांनी संस्कृतिकारण व आपदधर्म असे दोन शब्द वापरले होते. नेहरूनगरमधील गांगलांच्या घरातच खरं तर ग्रंथालीची सुरुवात झाली. पुस्तकं तर आपल्याला लोकांपर्यंत पोचवायची आहेतच, त्याबरोबरच संस्कृतिकारणाची माध्यमं वाढवली पाहिजेत असा विचार गांगलांच्या घरी होणाऱ्या

चर्चेतून आला. त्यादृष्टीने पाच कलांना एकत्र आणणारे मासिकही आम्ही चालवलं होतं. अरुण मुझुमदार आणि वासंती मुझुमदार यांच्या घरी रंगलेल्या अनौपचारिक गप्पांमधून कुमारगंधर्वांच्या मुलाखतमैफलीचा विषय पुढे आला व त्यातून १९८५ साली हा कार्यक्रम संपन्न झाला,'' अशा शब्दांत कुमार केतकर यांनी ग्रंथालीच्या प्रवासातील सुवर्णक्षण अधोरेखित केले.

'गंधर्वांचे देणे' या पुस्तकाचे संपादक अतुल देऊळगावकर आपल्या मनोगतात म्हणाले, ''कुमारजींची ग्रंथालीनं जी सहा दिवसांची मैफल आयोजित केली होती, त्याला ४० वर्षं पूर्ण झाली. ४० वर्षांनंतर या मैफलीचे पुस्तक करणं यामागचं प्रयोजन काय व आजच्या काळात याचं औचित्य काय असा प्रश्न अनेकांना पडला असेल. मीही पहिल्यांदा हा प्रश्न स्वतःला विचारला नि त्याचं सापडलेलं उत्तर असं की अभिजात कलांना आपल्याला वारंवार भेटी द्याव्या लागतात, त्यांच्या सहवासात अधिक काळ राहिल्यावरच त्यातील अनेक बाबी आपल्याला कळतात, तो काळ आपल्याला कळतो. जीवनदृष्टीही मिळते. हे पुस्तक करण्यामागे आमची हीच भावना होती. या पुस्तकात आपल्याला कुमारजींच्या संगीतविचारांबरोबरच क्यूआर कोडच्या माध्यमातून कुमारजींचं तानपुऱ्यावरचं ठेका न घेतलेलं गाणंही ऐकता येईल.'' कुमारजींच्या विचारांचा दाखला देत ते म्हणाले, की कुमारजी म्हणायचे धृपद गायकी नष्ट झाली ती त्या गायकीला कोणी मागे ढकलले म्हणून नाही. तर रागसंगीत जीवनाबरोबर बदलत गेले म्हणून ते पुढे गेले. या अनुषंगाने







**'गंधर्वांचे देणे'**
**पुस्तकप्रकाशनानिमित्त**
**१९८५ मध्ये प्रसिद्ध केलेली पुस्तिका**
**आणि**
**१९८४ च्या डिसेंबरमध्ये प्रसिद्ध केलेल्या**
**संगीतविषयक अंकाची**
**स्मृती जागृत करणाऱ्या काही प्रती**
**वितरीत करण्यात आल्या.**

४० वर्षांत संगीत आणि सर्व कला जीवनानुसार बदलल्या का, त्यात काय बदल झाले याचा शोध आपण घेतला पाहिजे, ज्यातून आपल्याला नव्या वाटाही गवसतील आणि तीच कुमारजींना खरी श्रद्धांजली ठरेल.

एका मराठी पुस्तकाचे प्रकाशन आणि मराठीतून कार्यक्रम असा दुर्मिळ योग एनसीपीएच्या सहकार्याने घडून आला. पुढेही असे उपक्रम होतील अशी आशा निर्माण झाली.

यावेळी बोलताना एनसीपीएचे सिद्धार्थ देशपांडे म्हणाले, की एनसीपीए आणि ग्रंथालीचे नाते जुने आहे. श्रीहर्ष फेणे यांच्यामुळे ते अधिक दृढ झाले. त्यांच्या पुढाकारामुळे आज टाटा थिएटरमध्ये हा कार्यक्रम संपन्न होत आहे, असा आवर्जून उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी एनसीपीएच्या संपूर्ण टीमने घेतलेल्या मेहनतीबद्दलही त्यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या आयोजनात सहकार्य केल्याबद्दल शशिकांत शानभाग यांचा सन्मान करण्यात आला.

या पुस्तकाच्या संपादनात आणि कार्यक्रमाच्या आखणीत अरुण जोशी यांचा प्रथमपासून सहभाग राहिला. प्रत्यक्ष कार्यक्रमावेळी कार्यकर्त्याची भूमिका पार पाडणारे रवी देवधर, मोहन काळे, डॉ. निर्मोही फडके, शिल्पा अग्निहोत्री, प्रमोद नारायणे, राजू कदम आदींनी उत्स्फूर्त वेळ दिला.

कलादिग्दर्शक हेमंत जोशी यांची मंचावरील सजावट अभिजात संगीतसोहळ्याला शोभेल अशी कलात्मक केली होती. चंद्रकांत काळे यांच्या अभिवाचनावेळी कुमारजींच्या गायनाची जी झलक मध्ये मध्ये ऐकवली गेली, त्या क्लिप तयार करण्याचे काम समीर कदम यांनी मेहनतीने पार पाडले. त्याचे कौतुक खुद्द काळे यांनी केले आहे. क्यूआर कोडच्याच माध्यमातून हे कुमारजींचे पाच तासांहून अधिक गायन पुस्तकात ऐकायला मिळणार आहे, ते सुस्पष्ट करण्याची किमया समीर कदम यांची आहे. कार्यक्रमाच्या आखणीत आणि घडवण्यात अनेकांचे योगदान आहे. श्रीहर्ष फेणे, शशिकांत शानभाग यांचे कार्यक्रमाच्या आयोजनातील सक्रिय सहकार्य, ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांचे सहकार्य मोलाचे होते.

प्रस्तुत सोहळ्याचे नेटके व सुंदर सूत्रसंचालन डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी व डॉ. मृण्मयी भजक यांनी केले.

**– अश्विनी भोईर**


## ग्रंथालीची संगीत कलावंतांवरील पुस्तके



हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी
मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.



अमीरबाई कर्नाटकी
मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.



रानभुलीचे प्रदेश
मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.


एक घोट... मृगजळाचा!
मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.



लाजवाब
संगीतकार रवी दाते यांचा अफलातून जीवनप्रवास
मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.


शरदाचे चांदणे
श्रेष्ठ गायक पं. शरद साठे यांच्याविषयी
मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.



डी.के. दातार
द व्हायोलिन सिंग्ज
मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.

SCAN & PAY

घरपोच हवी असल्यास प्रत्येकी ४० रु. पाठणावळ खर्च वेगळा.
ऑनलाइन पेमेंट केल्यास स्क्रीन शॉट व पत्ता पाठवावा.
**संपर्क : ९२२३४६६८६०**



विजयालक्ष्मी मणेरीकर

# बहुचर्चित नाटक 'गालिब'

हैं और भी दुनिया में सुख़न-वर बहुत अच्छे... मगर गालिब तो गालिब है.

'मिर्झा असदुल्लाखान गालिब, प्रसिद्ध फारसी आणि उर्दू कवी होते आणि त्याच्या नावाचे शीर्षक असलेले 'गालिब' हे नाटक सध्या चर्चेत आहे ते त्या नाटकातील संकल्पना, भाषा आणि नेपथ्याबद्दल. या नाटकात उर्दू, मराठी आणि हिंदी अशी संमिश्र भाषा वापरलेली आहे.

मिर्झा गालिब सुधारक वृत्तीचे, सर्व धर्मांना समान मानणारे, कर्मठ नसलेले, नमाज न पढणारे, रोजा न ठेवणारे, कलेचे आसक्त, रसिक व्यक्ती होते. त्यांच्या शायरीचा पगडा अजुनही चारशे वर्षांनंतर भारतीयांच्या मनावर आहे. मिर्झा गालिब समजणे, त्यांच्या शायरीचा अभ्यास करणे, त्यांचे शेर मुखोद्गत असणे हे कलासक्त रसिक असण्याचे लक्षण मानले जाते. माणसे त्यांच्या शायरीच्या ध्यासाने वेडी झाल्याचीही उदाहरणे आहेत. त्या अनुषंगाने हे नाटक लिहिलेले आहे.

नाटकाची सुरुवात त्यांच्या एका शेराने होते...

क़ैद-ए-हयात ओ बंद-ए-ग़म अस्ल में दोनों एक है
मौत से पहले आदमी ग़म से नजात पाए क्यूँ

एक बार गालिब जब किसी की ज़िंदगी में घूस जाता है तो उसे बाहर निकालना मुश्कील ही नहीं नामुमकीन है....

उसकी शेर ओ शायरी समझे या न समझे माहोल ही कुछ ऐसा बना है की गालिब ना समझे तो क्या समझे?

ह्या गालिबमुळे माझी भाषाभेसळ झालीय... सोच हिंदी में आती है, अल्फाज उर्दू में इशारे करते है, और लिखती मराठी में हूं... दिमाग में हिंदी मराठी-उर्दू का केमिकल लोचा हुआ है. मेरी भाषा ने संतुलन खो दिया है. गालिबची शायरी समजायला गेले की उर्दू मानगुटीवर बसते अन् लिखाणाची मिसळ तयार होते.

काल असेच एक हिब्रूतले नाटक पाहिले. अं हं गैरसमज नको.... नाटक मराठीतच होते; पण अशीच, माझ्यासारखी भाषेची सरमिसळ झालेल्या लोकांबद्दलचे!


चिन्मय मांडलेकर

चिन्मय मांडलेकर लिखित दिग्दर्शित नाटक 'गालिब.'

केवळ शीर्षक वाचून मी नाटक पाहायला गेले आणि गालिब का दर्द माझ्यात जागवून आले. नाही केवळ गालिबचा दर्द नव्हता तो... खरे तर गालिबचा नव्हताच... गालिबच्या प्रियकराचा होता. गालिबवर प्रेम करणारे सगळेच त्याचे प्रियकर. नाही का? गालिबवर प्रेम केल्यावर जिंदगीभर गालिब कसा छळतो त्याचा आरसा होता.

गालिब शायरीके बगीचे का ऐसा फूल है
जो हर किसी के गिरफ्त में नहीं आता है

लेकीन एकबार किसी के हात में 'दिवान-ए-गालिब' आया तो छुटना मुश्कील है.. और गालिब अपने सुखे दर्द को गीले करने की रुह बन जाता है. जिंदगी में दर्द की अपनी अलग 'पेशवाई' होती है इसका एक अलग अहसास छेडता है...

खुद मिर्झा गालिब कहते है...

हैं और भी दुनिया में सुख़न-वर बहुत अच्छे
कहते हैं कि 'गालिब' का अंदाज़-ए-बयाँ और हैं

नाटक सुरू होते. आपण त्यात गुंतत जातो. कधी गालिबशी, कधी नाटकातल्या प्राध्यापक मानवशी आपले काही जुळवत जातो. लेखक! कसा असतो लेखक? लेखकाच्या मनाची तगमग, एखाद्या गोष्टीने किंवा कल्पनेने भारावून गेलेला, रात्रंदिवस कुठल्यातरी अज्ञात कल्पनेत स्वतःच होरपळणारा, लेखणीची रात्रंदिवस साधना करणारा, रात्र वा दिवस असले निसर्गाचेही नियम न पाळणारा, ध्यास की वेडेपणा, हट्टी की छळवादी, स्वच्छंदी की स्वमग्न? अध्यात ना मध्यात.

तरीही लोकांच्या चेष्टेचा, कुचेष्टेचा, चर्चेचा, हास्याचा विषय बनलेला... लेखक... तगमग, तडफड, त्रागा, वेदना, प्रसूतीच्या कळा, अधीरता याचीच नशा करणारा लेखक... ध्येयवेडा असतो की वेडा असतो... लेखक!



**'गालिब'मधील एक दृश्य – विराजस कुलकर्णी आणि गौतमी देशपांडे**

'गालिब' हे थोड्या वेगळ्या पठडीतले नाटक आहे. यातील पात्रे स्वभावाच्या विविध पैलूंचा गारवा रंगमंचावर आणि सभागृहात पसरवत जातात. हे नाटक लेखकाने लेखकाबद्दल लिहिलेले आत्मशोधपर वास्तविक विचारमंथन आहे. यातील तीन महत्त्वाची पात्रे एकाच व्यवसायातील, क्षेत्रातील असून प्रचंड तफावत त्यांच्या विचारांत आहे. नाटकातील भाषाशैली म्हणजे तर्रीदार मिसळच! उर्दूतील शेर, उच्च मराठी कुसुमाग्रज शैलीतील काव्यपंक्तीचा तडका आणि विक्षिप्तपणाचे आचार म्हणजे शिव्यांचा भडिमार... त्यामुळे मध्यमवर्गीय सुसंस्कृत वर्गास कितपत रुचेल याविषयी जरा शंकाच येते... अभिनय सगळ्यांचाच उत्तम असला तरी नाटकाचा लेखक-दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर आपल्या मनावरील स्वतःची पकड एक क्षणभरही सोडत नाही... असे का? हे लेखकाचेच नाटक आहे असे सातत्याने जाणवत राहते. यातील विराजस कुलकर्णी आणि गौतमी देशपांडे मात्र आपापले स्वतंत्र अस्तित्व दाखवून खिळवून ठेवतात.

नेपथ्याबद्दल विशेष टिप्पणी द्यायलाच हवी. नाटकाचा रंगमंच बघितल्यावर कित्येक लेखक जसे की वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, कानेटकर, रणजित देसाई, विश्वास पाटील, मनात डोकावून गेले आणि वाटून गेले श्रेष्ठ नाटककार लेखकांची घरे आणि स्टडी रूम अशीच असावी. जुनाट, एकांती, एकटी. म्हणूनच ते कालातीत साहित्यनिर्मिती करू शकले.

हिंडूनफिरून परत नाटक 'गालिब' या रूपकावर येते. हे नाटक म्हणजे 'गालिब' नावाच्या फुलांचा हार! लेखक म्हणजे प्राध्यापक मानव नावाच्या सुईत टोचून, अनुभवाच्या दोरीत खोचून गालिबच्या वलयाचा सुगंध पसरवत मध्ये ओवलेली ईला, अंगद, रेवा ही हिरवी पाने बहर आणतात. कधी ओला कधी कोरडा... (बहर नेहमी ओलाच असतो असा गैरसमज आहे.)

दर्जेदार कालातीत लिहिण्याच्या नादात शब्दांचे अशक्य कोष्टकी खेळ मांडण्याच्या वेडापायी स्वतःच सतत शब्दांचे कडवे डोस पितो तो लेखक. हे नाटक तीन लेखकांची कथा आहे. पहिला ज्येष्ठ, दर्जेदार, नामवंत लोकप्रिय लेखक; दुसरा, तरुण यशस्वी पण सुमार लिहिणारा सेलेब्रिटी लेखक; तिसरी जन्मजात देणगी घेऊन आलेली परंतु कस्तुरीमृगासारखी स्वतःच्याच सुवासास अनभिज्ञ असलेली प्रतिभावंत अप्रकाशित लेखिका.. आणि या तिघांच्याही आयुष्यातील 'गालिब.'

प्रा. मानव गालिबच्या विश्वात वेडा झालेला, अंगद, गालिब समजून घेण्यासाठी जिवाचा आटापिटा करणारा आणि तिसरी म्हणजे इला, गालिब कोळून प्यायलेली...

हे नाटक आपल्याला नुसते खिळवून ठेवत नाही तर दिलखुलास हसवते आणि हमसून हमसून रडवते!

लेखकाचे जग हे मध्यरात्रीनंतर सुरू होते. दिवसाच्या रहाटगाडग्यात ते भांबावलेल्या, गढूळलेल्या अवस्थेत असते. मध्यरात्रीनंतर ते संथ होते, निवळते, नितळते, निखळते, निथळते, स्थिरावते अन् मग अस्वस्थता चाळवते अन् लेखणी सरसावते, खेळ खेळते. 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल' खऱ्या अर्थाने साध्य होते.

गालिब किती जणांना जाणवतो? कळतो? पण तरी गालिब आपल्या जीवनाचा भाग असतो.

शायरी में डुबे रहने की हो चाह...
दिलसे कभी कभी बहने दो आह
दर्द का भी अपना एक नशा है
शायरी भी जिने की एक राह है
– लक्ष्मीमंगेश

नाटकात एक सीन आहे, ज्येष्ठ वेडावलेल्या लेखकाला स्वतःच्या मुलीचे नावही लक्षात राहत नाही. तो तिला विविध नावांनी हाका मारतो. ती सांगते, बाबा, ही सगळी तुमच्या

नाटकातील पात्रे आहेत. मला उगीचच संदर्भ आठवतात... 'आहे मनोहर तरी', 'नाच गं घुमा' अन् 'नाथ हा माझा'... प्रतिभावंताच्या पत्नीस लेखिका होऊन व्यक्त का व्हावेसे वाटले असेल? (याचा गालिब नाटकाशी अजिबात संबंध नाही.)

संपूर्ण नाटकभर एक गोष्ट सातत्याने जाणवत राहते ते म्हणजे... 'गहिरे प्रेम विक्षिप्त असते' आपण सगळेच आपल्या प्रेमाच्या व्यक्तीवर सतत रागावलेले असतो. भांडतो, शिव्या देतो, अबोला धरतो, दरडावतो, नको नको ते सारे करतो आणि मग प्रेम करतो... ही प्रेमाची वलये लपेटलेली पात्रे आपल्याला इथे भेटतात.

गालिब लिहितो...

न था कुछ तो ख़ुदा था, कुछ न होता तो ख़ुदा होता
डुबोया मुझको होने ने, न होता मैं तो क्या होता

हुई मुद्दत कि 'गालिब' मर गया, पर याद आता है
वो हर इक बात पर कहना, कि यूँ होता तो क्या होता!

एक विलक्षण थीम आहे या नाटकाची. सतत तिला दृष्टांत देणारे मृत बाबा यात दिसतात. शास्त्रीय भाषेत यास 'हॅल्युसिनेशन' म्हणतात. यावरून मला लतादीदींचे एका मुलाखतीतील संवाद आठवले. त्यांना अनेकदा त्यांचे बाबा दिसायचे, मार्गदर्शन करायचे. रात्री दर्शन द्यायचे. समजायला गूढ वाटते.

नाटकाचे उत्कृष्ट आणि आवश्यक पार्श्वसंगीत आणखी गूढता निर्माण करते. नाटकात अनेकदा निःशब्दता असल्यामुळे त्यातले संगीत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व घेऊन येते आणि परिणाम साधते. आवश्यक तिथेच संगीत असल्यामुळे संगीताचे अस्तित्व आवश्यक आणि महत्त्वाचे वाटते.

यातील प्राध्यापक मानव यांनी दररोज साधनेसारखे लिहून पूर्ण केलेल्या तीनशे साठ वह्यांचा संदर्भ वारंवार येतो. त्यातील असंबद्ध लिखाण. त्याबद्दल त्यांचा डायलॉग 'सुचायचं संपलं नाही पण सुचणं आणि कागदावर उतरणं यातली संगती तुटली,' ही आगतिकता दर्शवते. लेखकाचं अस्तित्व संपण्याची सुरुवात तिथेच झालेली असते. नाटक गंभीर आहे. समाजास लेखक वा साहित्यिक जातकुळीची ओळख करून देणारे आहे. समाजाने ते समजून घ्यावे आणि लेखकाला त्याच्या सृजनशीलतेला मानसिकतेप्रमाणे बहरू द्यावे याची जाणीव करून देणारे आहे.

नाटकाचा नायक सांगतो... गालिब अजून सुटला नाही. तो सुखात जगू द्यायचा नाही. मरूही द्यायचा नाही. हे वेडही त्यानेच तर दिले नाही?

अभी मसरुफ हूं काफी
कभी फुर्सत में सोचूंगा
की तुझे याद करके
मैं क्या क्या भुल जाता हूं

हज़ारों ख़्वाहिशें ऐसी
कि हर ख़्वाहिश पे दम निकले
बहुत निकले मेरे अरमान
लेकिन फिर भी कम निकले
मिर्ज़ा गालिब

नाटक पाहिल्यानंतर एक जाणवले, प्रतिभावंताच्या घरात संपूर्ण कुटुंबात एक तरी 'इला' असावी....

हॅट्स ऑफ टू चिन्मय मांडलेकर...

नाटक : गालिब
लेखक/दिग्दर्शक : चिन्मय मांडलेकर
संगीत : राहुल रानडे
अभिनय : गौतमी देशपांडे, विराजस कुलकर्णी, अश्विनी जोशी, गुरुराज अवधानी.

**– विजयालक्ष्मी मणेरीकर**
(लक्ष्मीमंगेश...)
manerikarvs@gmail.com

**अभिनंदन**



मराठी भाषा गौरवदिनाच्या निमित्त २७ फेब्रुवारी २०२४ रोजी न्यूजपेपर गंगाधर मराठी साहित्य परिषद, कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित संमेलनात, ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते 'राज्यस्तरीय साहित्यभूषण २०२४ पुरस्कार' (वैचारिक श्रेणी) स्वीकारताना 'ग्रंथाली' प्रकाशित 'जागतिक सत्ताकारण : एक दृष्टिक्षेप' या पुस्तकाच्या लेखिका अमोल केरकर.



डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी

# सोसावे टाकीचे घाव : अभ्यासक्रम आणि मूल्यमापन

मस्तकी सहावे ठांकीयासी जाण ।
तेव्हा देवपण भोगावे गा ।। (तुकाराम गाथा ४२१४).

देवाला देवपण मिळण्याआधी टाकीचे घाव सोसून परीक्षा द्यावी लागते हे तुकाराम महाराजांनी सांगितले आहेच. साधारणपणे दगडातून देवाची प्रतिमा कोरताना, दगडाला देवत्व प्राप्त होताना छिन्नीहातोड्याचे घाव सोसावे लागतात हे माहीत होते. त्या छिन्नीहातोड्याच्या माऱ्याला तोंड देत अभंग राहणारा दगडच देवपणापर्यंत पोहोचू शकतो. मात्र नुकतेच एका वेगळ्या संदर्भात वाचायला मिळाले, की बस्तरमधील आदिवासींच्या देवांची परीक्षा घेऊन, त्यांनी त्यांची नेमलेली कामे केली नसतील तर त्यांचे मूल्यमापन होऊन त्यांना नापासही केले जाते. छत्तीसगढमध्ये केशकाल गावात दरवर्षी भाद्रपद महिन्यातल्या एका शनिवारी भंगाराम देवीची यात्रा भरते, ज्यामध्ये भंगारामदेवीसमोर आदिवासींच्या देवदेवतांना-'आंगा' देवांना, त्यांच्या वर्षभरातील कार्याचा आढावा द्यावा लागतो, देवी त्यांचा न्यायनिवडा करते आणि जे परीक्षेत नापास होतात त्या देवांना शिक्षा केली जाते, त्यांचे देवपण काढून घेण्यात येते. मूल्यमापन करून उद्दिष्ट गाठले असे सिद्ध झाले तरच देवाचेसुद्धा देवपण टिकते. अन्यथा...

मार्च-एप्रिल महिना म्हटला की वेगवेगळ्या महत्त्वाच्या परीक्षांची लगबग सुरू होते जी अगदी जून महिन्यापर्यंत सुरु राहते. कोरोनानंतर सगळीच वेळापत्रके गडबडल्याने तर हा परीक्षांचा कालावधी वर्षभरच सुरू असल्याचे चित्र आहे. याचसाठी केला होता अट्टहास, परीक्षा आणि निकालाचा दिन गोड व्हावा, असाच भाव सर्वांच्या मनी असतो. मग ते दहावी-बारावीग्रस्त पालक असो, पाल्य असो, की अगदी शिक्षक. शिक्षणाचा मूळ हेतू शिकणे हा आहे, सकारात्मक वर्तनबदल आहे, कलाकौशल्ये संपादन करणे आहे, ज्ञान व माहिती मिळवून तिचा योग्य वापर करण्याचा सराव करणे आहे, हे सगळे माहीत असून, मान्य करूनही परीक्षेतल्या कागदी गुणांना अवास्तव महत्त्व दिले गेलेले आहे हे सगळ्यांनाच मान्य असते. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांनी विद्यार्थ्यांच्या मधले नेमके कोणते गुण, कलाकौशल्ये, माहिती, ज्ञान तपासले जाईल याची कायम धागधुग असते आणि म्हणूनच परीक्षेचा ताण, भीती, पुरेशी तयारी झालेली नाही म्हणून वाटणारी धास्ती याने अनेक विद्यार्थ्यांची मने ग्रासलेली असतात. त्यातच अत्यंत चुरशीच्या स्पर्धापरीक्षांच्या वाटेला जाणारी मुले या बिकट वाटेवरून चालताना त्यांची दमछाक होते, आत्मविश्वास गमावून ती आयुष्यभराचे नुकसान करून घेतात.

परीक्षा घेण्याचा मुख्य हेतू हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या मूल्यमापनाचा असतो. मूल्यमापनाची सुरुवात ही खरे तर शैक्षणिक वर्षाच्या आरंभी जो अभ्यासक्रम दिला जातो तिथूनच होत असते. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला एकूण त्या वर्षी वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यासातून ज्या गोष्टी, कौशल्ये विद्यार्थ्यांनी शिकायची आहेत त्यांचा स्थूलमानाने समावेश अभ्यासक्रमात केला जातो. त्याचबरोबर प्रत्येक विषयामध्ये काय काय समाविष्ट करायचे याची सर्व सूक्ष्म माहिती, विषयनिहाय पाठ्यक्रमामध्ये दिलेली असते. कोणत्याही विषयाच्या अभ्यासक्रम आणि पाठ्यक्रम या दोन्हींमधे त्या वर्षीच्या अभ्यासाचे टप्पे, मार्ग, शैक्षणिक अनुभव, आणि त्यानंतर त्या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तनबदल, कौशल्यनिर्मिती, याचे सुस्पष्ट वर्णन केलेले असावे, अशी अपेक्षा आहे. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे स्पष्टपणे मांडलेली असली पाहिजेत कारण या उद्दिष्टांची पूर्ती झाली आहे की नाही, किती टक्के झाली आहे याची तपासणी म्हणजे परीक्षा घेणे किंवा मूल्यमापन करणे. मग ते सहामाही किंवा वार्षिक परीक्षांच्या द्वारे करण्यात येते अथवा, छोट्या छोट्या टप्प्यांत घटकचाचण्या घेऊन निरंतर मूल्यमापन केले जाते. यात छोट्या टप्प्यांत, पंधरा दिवसांनी अथवा महिन्याने केलेले मूल्यमापन जास्त उपयोगी ठरते, कारण अपेक्षेपेक्षा कमी प्रगती

दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चटकन उपाय करता येतात. त्यामुळे परीक्षा क्रमाने शेवटी येत असतील तरी त्यांची तयारीही अभ्याक्रम सुरू करतानाच झालेली असते. त्यामुळे अभ्यासक्रमाकडे अत्यंत गंभीरपणे बघण्याची आवश्यकता आहे. जंतुनाशकाच्या जाहिरातीत तो छोटा मुलगा आईला सतत विचारत असतो, की याने काय होईल? आईचे उत्तर ठरलेले असते, याने काही नाही होणार. मुलगा वैतागून विचारतो, याने काही नाही होणार तर मग हे आपण का वापरतोय, त्यावर आई म्हणते, काही होऊ नये यासाठीच हे वापरतोय. आपण जसे एखादे औषध घेताना विचारतो, की हे घेतल्याने काय होईल, तसेच एखादा अभ्यासक्रम शिकताना हा शिकल्याने काय होईल, कोणते बदल घडणे अपेक्षित आहे, आवश्यक आहे याची माहिती घेतली पाहिजे, अभ्यासक्रमाने ती दिली पाहिजे. भविष्यात काहीही चुकीचे होऊ नये, विद्यार्थी कुठे कमी पडू नये, म्हणून अभ्यासक्रम निवडताना पुरेशी काळजी घ्यायला हवी. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात हे स्पष्टपणे मांडण्यात आले आहे की प्रोग्राम आऊटकम (परिणाम) आणि कोर्स आऊटकम सूस्पष्टपणे अभ्यासक्रमासोबतच दिले पाहिजेत, ज्यामुळे त्यांचेच मूल्यमापन करणे आवश्यक असेल. परदेशी विद्यापीठांत प्रवेश घेताना विद्यार्थ्याकडून ट्रान्सस्क्रिप्ट मागवण्यामागेही त्या विद्यार्थ्याची अभ्यासाची पूर्वतयारी बघितली जाते व अर्ज केलेल्या कोर्ससाठी अर्हता तपासली जाते. ती पुरेशी नसेल तर काही अधिकचे, पूरक अभ्यासक्रम शिकावे असे सुचवले जाते, ज्यायोगे विद्यार्थी निवडलेल्या अभ्यासक्रमासाठी पात्र बनेल.

एखाद्या पदवीचा अभ्यासक्रम, अथवा एखाद्या कोर्सचा पाठ्यक्रम आपण बघतो त्यावेळी हे लक्षात घेतले पाहिजे, की

१) अभ्यासक्रम एखाद्या करारनाम्यासारखा असतो. त्यामध्ये नमूद केलेल्या बाबी या विद्यार्थ्यांना देण्यात येतील अशी हमी असते. ज्या बाबींचा समावेश या करारात असतो त्या म्हणजे शिकवायचे मुद्दे, शिकवताना वापरण्यात येणाऱ्या पद्धती-खडू-फळा, चर्चात्मक पद्धत, अभ्यासदौरे, समूह अभ्यास, त्याचे वेळापत्रक, उपस्थिती, हजेरीचे नियम, महत्त्वाच्या तारखा उदाहरणार्थ, गृहपाठाचे नियम, तारखा, परीक्षेचे स्वरूप, गृहपाठ वेळेत न दिल्यास काय होईल याबद्दल धोरण याचाही समवेश केलेला असतो. मूल्यमापनाचे निकष, अभ्याक्रमाच्या शेवटी मिळणारे प्रगतिपुस्तक किंवा डिग्री, डिप्लोमा याच्या निकालपत्रात नमूद होणारे तपशील गुण, ग्रेड- त्याची ठरवायची पद्धत या बाबींची कल्पनाही अभ्याक्रमाने दिली पाहिजे. विद्यार्थ्यांची वर्गातील अपेक्षित वागणूक, त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षांचा, शैक्षणिक तयारीचा तपशीलही यात दिला जातो.

२) अभ्यासक्रम हा एक कायमस्वरूपी रेकॉर्ड, दस्तऐवज असतो कारण त्यामध्ये, अभ्यासक्रमाची सर्व माहिती- कोर्सचा नंबर, शीर्षक, वर्ष अथवा सेमेस्टर, कालावधी, शिकवण्याची पद्धत-ऑफलाइन, ऑनलाइन, ब्लेंडेड इत्यादी लिहिलेले असते. त्याचबरोबर अभ्याक्रमात समाविष्ट सामग्री, अभ्यासक्रमाची ध्येये आणि उद्दिष्टे, अभ्यासक्रमासाठी लागणारी पाठ्यपुस्तके, सॉफ्टवेर, हार्डवेर आणि अभ्यासक्रम प्रवेशाच्या अटी, नियम, पात्रतानिकष नमूद केले जातात.

३) अभ्यासक्रम हा शैक्षणिक प्रगतीचा नकाशा असतो. त्यामध्ये अभ्यासक्रमाची निष्पत्ती स्पष्टपणे नमूद केलेली असल्याने विद्यार्थ्याला योग्य अभ्यासक्रम निवडीची संधी आणि शाश्वती मिळते. अभ्यासक्रम प्रवेशाच्या अटी, नियम, पात्रता निकष यानुसार प्रवेश दिला जात असल्याने त्या विशिष्ट अभ्यासक्रमामध्ये पात्र असलेला आणि रस असलेला विद्यार्थीच प्रवेश घेत असल्याने प्रवेशसंख्येवर मर्यादा राहते. मूल्यमापनाचे निकष दिले असल्याने विद्यार्थ्याला निश्चित कल्पना असते की कोणत्या स्वरूपाच्या परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे- निबंध, प्रोजेक्ट, सेमिनार, लेखी वा तोंडी परीक्षा, वेळापत्रक समाविष्ट असल्याने अभ्यासक्रमाचे टप्पे लक्षात येतात.

४) अभ्याक्रम हे विद्यार्थी आणि शिक्षक यामधले एक संप्रेषणाचे साधन आहे. सुस्पष्टपणे तयार केलेल्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात कोणताही गोंधळ राहात नाही. अभ्यासक्रमामध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या भूमिका स्पष्टपणे निर्दिष्ट केलेल्या असतात. योग्य रितीने शब्दबद्ध केलेला आणि चांगल्या प्रकारे डिझाईन केलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिक्षणप्रक्रियेच्या सर्व पैलूंची माहिती मिळवण्यास मदत करतो.

५) अभ्यासक्रम हे शिक्षणाला साहाय्यक ठरणारे साधन आहे. तो तयार करताना वापरण्यात आलेली तर्कसंगत किंवा संकल्पनात्मक रचना- उदाहरणार्थ, अभ्यासक्रम या ठरावीक पद्धतीनेच का तयार केला आहे किंवा मूल्यमापनासाठी विशिष्ट धोरणे व साधने का वापरली आहेत याचा बोध होतो. अभ्यासक्रमात वापरलेले घटक, शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धती यामागचे तत्त्वज्ञान व कारणमीमांसा याचा समावेश केलेला असतो. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमाची प्रासंगिकता आणि महत्त्व, तसेच अभ्यास कसा करावा, नोट कशा घ्याव्या, चाचण्या, परीक्षा याबद्दल सूचना व माहिती त्यामध्ये नमूद केलेली असते. अभ्यासक्रमासोबत दिलेली वाचनसूची, विद्यार्थ्यांना विषयाचे अधिक अन्वेषण करण्यास मदत करते.

त्यामुळे कोणत्याही विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये पुढील घटक असले पाहिजेत-

१) अभ्यासक्रमाचे वर्णन

२) अभ्यासक्रमाची ध्येये आणि उद्दिष्टे
३) अभ्यासक्रम शिकवण्याची पद्धती
४) अभ्यासक्रमाचे नाव, कोड नंबर,
५) अभ्यासक्रम सामग्री आणि अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोन
६) अतिरिक्त अभ्यासासाठी वाचनसूची
७) मूल्यमापनाचे निकष व ग्रेडगणना
८) अभ्यासक्रमाचे धोरण, विद्यार्थ्यांच्या जबाबदाऱ्या, उपस्थितीचे नियम इत्यादी.

परीक्षा कशाची घेण्यात येणार आहे हे अभ्यासक्रमाच्या सुरुवातीलाच स्पष्ट केलेले असल्याने प्रत्यक्ष परीक्षा घेताना तयार करायचे प्रश्न, त्यांचा आशय, त्यांचा रोख, विद्यार्थ्याने कोणते ज्ञान अथवा कौशल्य आत्मसात केले आहे त्याची अभिव्यक्ती हे सर्व काही सुरुवातीलाच ठरलेले असते. किंवा ठरलेले असायला हवे. प्रत्यक्षात तसे होताना दिसत नसल्याने परीक्षा ही विद्यार्थ्याला काय समजले आहे याचा तपास न करता त्याला काय येत नाही याचा धांडोळा घेण्यासाठी होताना दिसते. त्यामुळेच परीक्षेचा बागुलबुवा निर्माण होऊन विद्यार्थी भीतिग्रस्त होताना दिसतात. यावर परीक्षाच न घेणे हा उपाय नसून परीक्षेसाठी त्यांना योग्य पद्धतीने अभ्याक्रमाच्या माध्यमातून तयार करणे हा आहे.

आपल्या बोलण्यात नेहमी असे येते, की शिक्षकाने विद्यार्थ्याला इतके इतके मार्क दिले, किंवा विद्यार्थ्याला इतके गुण पडले, विद्यार्थ्यांनी मार्क मिळवले असे सहसा म्हटले जात नाही. म्हणजे यात विद्यार्थी काही करत नसून शिक्षक मार्क देतात असेच अभिप्रेत होते. आपण आपला परीक्षासंबंधी दृष्टिकोन बदलून विद्यार्थ्यांना सांगितले की या पेपरचे १०० गुण तुझेच आहेत, ते तू आता सुरक्षित राखून दाखव तर विद्यार्थी निश्चितपणे जबाबदारीने एका एका गुणासाठी सजगतेने लढतील. मागच्या महिन्यातली गोष्ट. आमच्या संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त अनेक प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येतात त्यात एक महाविद्यालयाच्या वार्षिक अंकालाही दिला जातो. त्याला तीस गुणांचे निकष ठरवले आहेत. मागच्या वर्षी ज्या महाविद्यालयाला बक्षीस मिळाले असेल त्याला पुढील दोन वर्षं विचारात घेतले जात नाही. तसा नियम आहे. आमची समिती वेगवेगळे वार्षिक अंक बघून, ठरलेले निकष लावून मूल्यमापन करत असताना गेल्या वर्षीच्या पारितोषिक विजेत्या महाविद्यालयातील एक जण म्हणाले, यंदा आम्हाला बक्षीस मिळणार नाही हे माहीत आहे. पण समजा आम्ही स्पर्धेत असतो तर तुम्ही आम्हाला किती गुण दिले असते ते सांगा ना. मी त्यांना म्हटले तुम्हीच बेरीज-वजाबाकी करा- म्हणजे बघा, दहा निकष, प्रत्येकी तीन गुण. म्हणजे तुमच्याकडे तीस गुण आहेत, ते कसे राखून ठेवायचे ते तुम्ही बघा- पहिला निकष आहे त्रि-भाषा सूत्र-किमान तीन भाषांमधून साहित्य असले पाहिजे. तुमच्याकडे दोनच भाषा दिसताहेत म्हणजे तुमचा एक गुण मी काढून घेणार, उरले एकोणतीस. दुसरा निकष आहे संपादकीय मंडळात विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व. तुमच्या संपादकीय मंडळात विद्यार्थ्यांचा उल्लेख नाही, त्याचे तीन गुण जातील, उरले सव्वीस गुण. तिसरा निकष, मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ कसे असावे त्याचे तीन गुण... अशा पद्धतीने तुम्ही तुमच्या मासिकाचे मुल्यांकन करू शकाल. मी गुण देण्यापेक्षा तुम्ही ते मिळवले असे म्हणायला हवे. असेच स्वतःचे मूल्यांकन विद्यार्थ्याला करता आले पाहिजे. म्हणजेच त्याने त्याचेच असलेले मार्क राखायला शिकले पाहिजे. शिक्षक त्याला गुण देणारा कोण?

एकदा वर्गात शिकवताना विद्यार्थ्यांना मी म्हटले, अरे परीक्षेच्या वेळी पर्यवेक्षक नेमतात ते तुम्हाला पटतं का? सगळेच काही कॉपी करणारे, चिठ्या घेऊन येणारे, परीक्षा देताना एकमेकांशी बोलणारे असे नसतात की नाही? तरी सुपरव्हायजर सगळ्यांकडे संशयाने बघत असतात. तुम्हाला राग नाही का येत या गोष्टीचा? अपमान नाही वाटत? आपण असे करू या की मी शिकवते त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या वेळी सुपरव्हायजर फक्त पेपर वाटतील आणि एकदम पेपर गोळा करायलाच येतील. संपूर्ण वर्ग आनंदाने चीत्कारला. पुढे म्हटले, पण एक अट आहे, सगळ्यांनी प्रामाणिकपणे पेपर लिहायचा, कोणीही कॉपी करणार नाही असा मला शब्द द्या आणि तो पाळा. त्यावर वर्ग एकदम शांत झाला. कारण विचारल्यावर त्यातला एक धीट मुलगा उठून म्हणाला, मी माझी खातरी देऊ शकेन; पण इतरांची खातरी कशी देता येईल? मी म्हटले, प्रत्येकाने स्वतःचीच खातरी द्यायची आहे. दुसऱ्याची नाही. वर्गातल्या बहुतेकांना स्वतःची खातरी देणेपण शक्य नसावे. कोणीतरी आपल्यावर नजर ठेवून आहे म्हटल्यावर आपण प्रामाणिक वागतो ही वस्तुस्थिती आहे. शेवटी आमच्याही वर्गात पर्यवेक्षकाच्या कडक निगराणीतच परीक्षा पार पडली.

मोठे मोठे हत्ती जिथे केवळ दोरी बांधल्याचे नाटक करून जेरबंद करून ठेवता येतात तिथे परीक्षेतल्या पर्यवेक्षकाचे महत्त्व असणारच. परीक्षेचा बागुलबुवा काबूत आणायचा असेल तर मूल्यमापनाच्या योग्य पद्धतींचा अंगीकार केला पाहिजे. अभ्यासक्रमाचा तो एक फार महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे परीक्षांची भीती जी बस्तरच्या देवांनाही आहे, कशी घालवायची याबद्दल पुढे लिहायचेच आहे.

**- डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com




शरद काळे

# राख, रिठा, शिकेकाई, साबण आणि पर्यावरण

प्राचीन काळी लोक आपली त्वचा स्वच्छ करण्यासाठी चिकणमाती, औषधी वनस्पती आणि राख यांसारख्या नैसर्गिक साहित्याचा वापर करत. ते ही सामग्री पाण्यात मिसळून त्यांच्या त्वचेवर लावायचे. मध्ययुगात, लोक अंघोळीसाठी पाणी आणि औषधी वनस्पतींचे मिश्रण वापरत. त्यांचा असा विश्वास होता की केवळ पाणी शरीर शुद्ध करू शकत नाही. जंतुनाशक गुणधर्म असलेल्या औषधी वनस्पती पाण्यात मिसळून त्या वापरल्या जात असत. आधुनिक काळात, अंघोळीसाठी साबण हा एक पर्याय बनला आहे. आज ज्याला आपण साबण म्हणून ओळखतो, तो प्रथम एकोणिसाव्या शतकात तयार झाला. तेव्हापासून तो वैयक्तिक स्वच्छतेचा मुख्य घटक झाला आहे. आता तर बाजारात इतक्या विविध प्रकारचे साबण उपलब्ध आहेत, की त्यातून नेमका कोणता साबण आपण निवडावा, हे ठरवणे अवघड होऊन बसते. वेगवेगळ्या त्वचेच्या प्रकारांना आणि आवडीनिवडींना पूर्ण करणारे साबण जाहिरातींमध्ये असतात, पण प्रत्यक्षात तसे असतात का, हे फक्त त्या कंपन्यांना माहीत असते!

नैसर्गिक घटकांचा वापर करून हाताने तयार केलेला साबण लहान तुकड्यांमध्ये तयार केला जातो, ज्यामुळे संवेदनशील त्वचा असलेल्यांसाठी तो लोकप्रिय पर्याय बनतो. हाताने बनवलेल्या साबणामध्ये तीव्र रसायने आणि संरक्षक नसल्यामुळे त्वचेची जळजळ आणि कोरडेपणा टाळता येतो. शिवाय, हाताने बनवलेल्या साबणातील नैसर्गिक तेले आणि सुगंधांचे अनोखे मिश्रण आरामदायी आणि सुखदायक अंघोळीचा अनुभव देऊ शकते. काही लघुउद्योजक असे साबण तयार करतात. व्यावसायिक साबण मात्र कृत्रिम घटक आणि रसायने वापरून मोठ्या प्रमाणात उत्पादित केले जातात. त्यातील काही घटक त्वचेतील नैसर्गिक तेलांना काढून टाकू शकतात. व्यावसायिक साबण अनेकदा हाताने बनवलेल्या साबणापेक्षा स्वस्त असतात, या साबणांमुळे त्वचेची जळजळ, ॲलर्जीमुळे त्वचेला कोरडेपणा येऊ शकतो. जगभरातील घरगुती आणि उद्योगांमध्ये सर्वव्यापी असलेले डिटर्जंट, स्वच्छता आणि स्वच्छता राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तथापि, त्यांच्या व्यापक वापरामुळे त्यांच्या पर्यावरणीय परिणामाबद्दल चिंता निर्माण झाली आहे.


सॅपोनिफिकेशन हे आम्ल आणि अल्कली यांच्यातील रासायनिक अभिक्रियाचे नाव आहे. त्यातून साबण नावाचे मीठ तयार केले जाते. सोडियम हायड्रॉक्साइड ही अल्कली आणि विविध फॅटी आम्ले आणि तेल ह्यापासून साबण बनतो.




चित्र क्रमांक १ मध्ये ग्लिसरॉलचा रेणू दाखवला आहे. हा रेणू प्रत्येक चरबीच्या (ट्रायग्लिसराइड) रेणूमध्ये असतो. ग्लिसरॉल रेणूमधील प्रत्येक O ऑक्सिजन अणूचे प्रतिनिधित्व करतो. हे तीन ऑक्सिजन अणू प्रत्येकी एका फॅटी आम्लांशी संलग्न आहेत (उजवीकडे झिगझॅग रेषा). चित्रात ग्लिसरॉलला जोडलेले तीन भिन्न दिसणारी फॅटी आम्ले दाखवली आहेत. चरबी आणि तेलांना ट्रायग्लिसराइड्स म्हणतात कारण ग्लिसरीनच्या रेणूमध्ये तीन फॅटी आम्लाचे रेणू जोडलेले असतात. ग्लिसरॉलचा रेणू झाडाच्या खोडासारखा आणि फॅटी आम्ल त्याच्या तीन शाखा आहेत अशी कल्पना करा. प्रत्येक फॅटी आम्ल एका विशिष्ट रासायनिक रचनेने बनलेले असते, आणि तेच या साबणामध्ये विविध गुणधर्म निर्माण करतात. फॅटी आम्लाचे दोन मुख्य प्रकार


आहेत, संतृप्त आणि असंतृप्त. कदाचित वाचकांना याविषयी आहारसापेक्ष माहिती असेल यात शंका नाही, आणि साबणाच्या बारचे गुण निश्चित करण्यासाठीदेखील ते अत्यंत महत्त्वाचे कार्य बजावतात.

संतृप्त फॅटी ॲसिडच्या रेखांकनामध्ये, कार्बनमधील अणू (C) डॅश – रेषा एकच बंध दर्शवतात. ही कार्बनची साखळी सरळ असते आणि कार्बन अणूंमध्ये फक्त एकच बंध असतो. हायड्रोकार्बन साखळीतील शेजारच्या कार्बनमध्ये फक्त एकच बंध असल्यास, फॅटी आम्लाला संतृप्त किंवा सॅच्युरेटेड म्हटले





जाते (चित्र क्रमांक २). सॅच्युरेटेड फॅट सामान्य तपमानावर घन असतात. जास्त प्रमाणात सॅच्युरेटेड फॅट असलेले चरबी आणि तेले साबणाच्या बारमध्ये कडकपणा हा गुणधर्म निर्माण करतात. साबण बनवणाऱ्या तेलांमध्ये आढळणारी चार सर्वात सामान्य सॅच्युरेटेड फॅटी आम्ले म्हणजे मिरीस्टिक, लॉरिक, स्टियरिक आणि पामिटिक ही आहेत.

असंतृप्त (अनसॅच्युरेटेड) फॅटी आम्लामध्ये कार्बनसाखळी सरळ नसते आणि काही कार्बन अणूंमध्ये दुहेरी डॅश रेषा '='




आहेत (चित्र क्रमांक ३). या दुहेरी डॅश रेषा (ज्या समान चिन्हांसारख्या दिसतात) यांना डबल बाँड म्हणतात. फॅटी आम्लामधील हायड्रोकार्बनसाखळीमध्ये किमान एक दुहेरी बंध असतो तेव्हा फॅटी आम्ल यापुढे संतृप्त होत नाही कारण त्यात कमी हायड्रोजन अणू असतात. कॅनोला तेल आणि ऑलिव्ह ऑइल यांसारख्या एकल दुहेरी बंध असलेल्या चरबींना मोनो अनसॅच्युरेटेड म्हणतात. एकाहून अधिक दुहेरी बंध असलेल्या स्निग्धांना पॉली अनसॅच्युरेटेड म्हणतात, यात करडईचे तेल आणि सूर्यफूल तेल यांचा समावेश आहे. असंतृप्त चरबी सामान्यत: वनस्पतींच्या स्रोतांमधून येतात आणि त्यांचे रेणू व्यवस्थित कॉम्पॅक्ट होत नसल्यामुळे ते सामान्य तापमानाला द्रवस्थितीत असतात. हे फॅटी आम्ल साबणामध्ये मलई आणि कंडिशनिंग गुणधर्म निर्माण करतात. साबण बनवण्याच्या तेलांमध्ये आढळणारी चार सर्वात सामान्य असंतृप्त फॅटी आम्ल म्हणजे ओलेइक, लिनोलेइक, लिनोलेनिक आणि रिसिनोलिक ही आहेत.

सॅपोनिफिकेशन हा शब्द दोन लॅटिन शब्द 'सॅपो' म्हणजे साबण आणि 'फेसरे' म्हणजे बनवणे या दोन शब्दांपासून आला आहे. सॅपोनिफिकेशन प्रक्रियेत (चित्र क्रमांक ४)



एक ट्रायग्लिसराइड (चरबी) रेणू दिसतो. तो रेणू तीन फॅटी आम्लरेणूंपासून बनलेला असतो ('R' द्वारे दर्शवलेले). प्रत्येक फॅटी आम्ल रेणूला त्याच्या स्वतःच्या सोडियम हायड्रॉक्साईड (NaOH) रेणूसह क्रिया करणे आवश्यक असल्याने, प्रत्येक ट्रायग्लिसराइडसाठी NaOH चे ३ रेणू आवश्यक असतात. द्रव साबण बनवताना NaOH ऐवजी पोटॅशियम हायड्रॉक्साइड (KOH) नावाची अल्कली वापरली जाऊ शकते. सोडियम किंवा पोटॅशियम हायड्रॉक्साइड लहान गोलाकार स्फटिकांमध्ये उपलब्ध असते आणि सॅपोनिफिकेशन क्रिया होण्यासाठी ते पाण्यात विरघळलेले असावे लागते. काही साबणांमध्ये पाण्याऐवजी दूध किंवा वनस्पतीरसात विरघळलेली अल्कली वापरतात. साबण तयार होतांना यातील बऱ्याचशा पाण्याचे बाष्पीभवन होते. प्रत्येक साबण बनवण्याच्या कृतीत, सर्व अल्कली रेणूंचा वापर साबणामध्ये रूपांतर होताना झाला आहे याची खात्री करण्यासाठी चरबी योग्य प्रमाणात (तेल आणि बटर) आवश्यक असते. जास्त प्रमाणात सोडियम हायड्रॉक्साइड (किंवा पुरेसे तेल नाही) घेतले तर NaOH सह क्रिया करण्यासाठी पुरेसे फॅटी आम्ल उपलब्ध नसेल. परिणाम म्हणजे साबणाच्या बारमध्ये मुक्त NaOH असलेला साबण तयार होईल, त्याचा आरोग्यावर घातक परिणाम नक्की होतो. पुरेसे सोडियम हायड्रॉक्साइड वापरले नाही तर साबण क्रिया झाल्यावर शेवटी खूप तेल शिल्लक राहील! साबण सुरक्षिततेसाठी सुपरफॅटिंग म्हणजे फॅटी आम्लाचा अधिक प्रमाणात वापर करतात. अतिरिक्त चरबी (वनस्पती तेल आणि बटर) वापरली तर सर्व NaOH सॅपोनिफाय होईल. म्हणजेच सुपरफॅटिंगमुळे सर्व NaOH वापरण्यात आले आहे याची खात्री केली जाते आणि उत्कृष्ट मॉइश्चरायझिंग आणि इमोलियंट गुणांसह सौम्य साबण तयार होतो.


चरबी किंवा तेलांमधील ट्रायग्लिसराइड्स NaOH शी (पाण्यात विरघळतात) क्रिया करतात, तेव्हा ते साबण आणि ग्लिसरीन तयार होतात. अनेकदा ग्लिसरॉल किंवा ग्लिसरीन

हे शब्द एकमेकांच्या बदल्यात वापरलेले जातात. त्यांच्यात रासायनिक फरक नाही. ग्लिसरॉलचे सामान्य नाव ग्लिसरीन आहे. ग्लिसरीन ह्युमेक्टंट आणि मॉइश्चरायझर असते. सर्वोत्तम साबण तयार करण्यासाठी वेगवेगळ्या फॅटी आम्लयुक्त तेलांचे मिश्रण आवश्यक असते. तीनशेपेक्षा जास्त भिन्न फॅटी आम्ले ज्ञात असताना, साबण बनवण्यासाठी आपल्याला फक्त आठ (चार संतृप्त फॅटी आम्ले आणि चार असंतृप्त फॅटी आम्ले) आम्लांचे गुणधर्म समजून घेणे आवश्यक आहे.

चार सॅच्युरेटेड फॅटी आम्ले बहुतेक सामान्य तापमानाला घन असलेल्या तेलांमधून येतात. खोबरेल तेल आणि पाम बियांच्या तेलामध्ये असलेले मिरीस्टिक आम्ल, कडकपणा, स्वछता आणि फेस तयार करण्यात योगदान देते. शिया (शिकेकाई), आंबा, कोको यांच्या चरबीत आढळणारे स्टीरिक आम्ल हे पाम तेल आणि गाईच्या चरबीतदेखील (टॅलोमध्ये असते. हे आम्ल स्थिर आणि तीव्र साबण बार तयार करण्यास मदत करते. चार अनसॅच्युरेटेड फॅटी आम्ले वनस्पती तेलांमधून येतात. सामान्य तापमानाला द्रवस्थितीत असलेल्या या आम्लांमध्ये ऑलिक आम्ल हे ऑलिव्ह ऑइलपासून मिळते व साबण तयार करण्यासाठी सर्वोत्कृष्ट म्हणून ओळखले जाते. कॅनोलासारख्या इतर तेलांमध्येदेखील ते असते, साबणामध्ये मॉइश्चरायझिंग आणि कंडिशनिंग गुणधर्म या आम्लांमुळे येतात. सूर्यफूल आणि करडईच्या तेलांमध्ये आढळणाऱ्या लिनोलिक आम्लात मॉइश्चरायझिंग आणि कंडिशनिंग गुणधर्म असतात. लिनोलेनिक ॲसिड डाळिंब, रोझशिप आणि हेम्पसीड तेलांमध्ये आढळते आणि त्यातही मॉइश्चरायझिंग आणि कंडिशनिंग गुणधर्म असतात. रिसिनोलिक आम्ल हे फक्त एरंडेलतेलात आढळते, त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण फॅटी आम्ल रचनेमुळे खरोखरच यासारखे दुसरे तेल नाही.

साबणाच्या रेणूमध्ये दीर्घ-साखळीतील कार्बोक्झिलिक आम्लांचे सोडियम किंवा पोटॅशियम लवण असतात. साबणांच्या बाबतीत, कार्बन चेन तेलात विरघळते आणि आयनिक टोक पाण्यात विरघळते. अशा प्रकारे साबणाचे रेणू मायसेल्स (micelles) नावाची रचना तयार करतात. मायसेल्समध्ये, एक टोक तेलाच्या थेंबाकडे असते आणि दुसरे टोक जे बाहेरील आयनिक बाजू असते, म्हणून ते पाण्यामध्ये इमल्शन बनवते आणि आपण आपले कपडे धुतो तेव्हा घाण विरघळण्यास मदत होते.

**डिटर्जंटची रचना :** अमोनियम किंवा अल्काइल बेंझिन सल्फोनेट कार्बोक्झिलिक आम्लाच्या लांब साखळीचे क्षार हे डिटर्जंट म्हणून वापरले जातात (चित्र क्रमांक ५). संयुगांचे हे एक कुटुंब असून त्यात पाण्यात विरघळलेले रासायनिक घटक असतात. साबणापेक्षा वेगळी असलेली डिटर्जंट ही




रासायनिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण संयुगे असून पृष्ठभागावरील घाण आणि वंगण काढण्यासाठी मुद्दाम तयार केलेले असतात. बहुतेक घाण तेलकट असते आणि तेल पाण्यात विरघळत नाही.

पारंपरिक डिटर्जंटमध्ये सर्फेक्टंट, बिल्डर, ब्लीच आणि इतर डिटीव्ह असतात. सर्फॅक्टंट हे प्राथमिक सक्रिय घटक असून ते पाण्याच्या पृष्ठभागावरील ताण कमी करतात, ज्यामुळे ते खोलवर प्रवेश करू शकतात आणि काजळी दूर करतात. फॉस्फेट किंवा जिओलाइट हे घटक पाण्याला मृदू करून आणि साफ केलेल्या पृष्ठभागावर माती पुन्हा जमा होण्यापासून रोखून स्वच्छतेची कार्यक्षमता वाढवतात. हे घटक प्रभावी असले तरी ते पर्यावरणाला मोठा धोका निर्माण करतात.

**डिटर्जंटचे विविध प्रकार**

डिटर्जंट्स हे जगभरातील घरे, उद्योग आणि संस्थांमध्ये वापरले जाणारे आवश्यक घटक आहेत. ते विविध रचनांमध्ये येतात, प्रत्येक विशिष्ट स्वच्छतेच्या गरजा आणि प्राधान्यांनुसार तयार केले जातात.

**१. द्रव डिटर्जंट**

द्रवस्थितीतील डिटर्जंट अष्टपैलू आहेत आणि मोठ्या प्रमाणावर कपडे धुणे, डिश धुणे आणि सामान्य स्वच्छतेसाठी वापरले जातात. ते द्रव किंवा पातळ स्वरूपात येतात आणि विशेषत: पंप किंवा बाटल्या वापरून वितरीत केले जातात. लिक्विड डिटर्जंट फॅब्रिक्स आणि पृष्ठभागावरील डाग आणि घाण काढून टाकण्यासाठी प्रभावी असतात.

**२. पावडर डिटर्जंट**

पावडर केलेले डिटर्जंट दाणेदार स्वरूपात असतात आणि ते पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये किंवा प्लास्टिकच्या पिशव्यामध्ये पॅक केले जातात. ते कपडे धुण्यासाठी आणि डिश धुण्यासाठी योग्य आहेत आणि त्यांच्या दीर्घ शेल्फ लाइफ आणि किफायतशीरतेसाठी ओळखले जातात. चूर्ण केलेले डिटर्जंट गरम पाण्यात प्रभावी असतात आणि पक्के डाग आणि तेलकटपणा काढून टाकण्यास मदत करतात.

**३. डिशवॉशर डिटर्जंट**

विशेषत: स्वयंचलित डिशवॉशरमध्ये वापरण्यासाठी तयार

केलेले, डिशवॉशर डिटर्जंट पावडर, जेल आणि टॅब्लेटसह विविध स्वरूपांत येतात. त्यात एन्झाइम आणि सर्फेक्टंट वापरतात. अन्नाचे कण आणि ग्रीस काढून टाकण्यास त्यांची मदत होते. भांडी स्वच्छ आणि डागमुक्त होतात. डिशवॉशर डिटर्जंटमध्ये पाण्यातील क्षारांचे डाग पडू नयेत म्हणून आणि कोरडेपणा सुधारण्यासाठी गुणधर्म असू शकतात.

**४. लाँड्री डिटर्जंट**

लॉन्ड्री डिटर्जंट कपडे आणि कापड धुण्यासाठी डिझाइन केलेले आहेत आणि ते द्रव, पावडर आणि पॉड स्वरूपात येतात. कपड्यांमधून घाण, तेलकटपणा आणि वास काढून टाकण्यासाठी त्यात सर्फेक्टंट, एन्झाइम आणि इतर पदार्थ वापरले जातात. विविध फॅब्रिक प्रकार, रंग आणि वॉशिंग मशिन प्रकारांसाठी (उदा. उच्च-कार्यक्षमता मशीन) विशेष लॉन्ड्री डिटर्जंट उपलब्ध आहेत.

**५. पर्यावरणास अनुकूल डिटर्जंट**

पर्यावरणाच्या वाढत्या चिंतेमुळे, पर्यावरणास अनुकूल डिटर्जंटना लोकप्रियता मिळाली आहे. हे डिटर्जंट पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यासाठी बायोडिग्रेडेबल सर्फेक्टंट आणि वनस्पती-आधारित घटक वापरून तयार केले जातात. पर्यावरणास अनुकूल डिटर्जंट द्रव, पावडर आणि शेंगा यासह विविध स्वरूपात येतात आणि घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी योग्य आहेत.

**६. हेवी-ड्यूटी डिटर्जंट**

हेवी-ड्युटी डिटर्जंट औद्योगिक आणि व्यावसायिक स्वच्छतेच्या अनुप्रयोगांसाठी तयार केले जातात, इमारतींच्या भिंती आणि उपकरणे साफ करण्यासाठी यांचा वापर होतो. ते अत्यंत केंद्रित असतात आणि कडक डाग, वंगण आणि काजळी हाताळण्यासाठी शक्तिशाली सर्फेक्टंट आणि सॉल्व्हेंट त्यात वापरलेले असतात. हेवी-ड्युटी डिटर्जंट वापरण्यापूर्वी सौम्य करणे आवश्यक असू शकते आणि त्यांच्या मजबूत स्वच्छतेच्या गुणधर्मांमुळे सावधगिरीने हाताळले पाहिजे.

**७. विशेष डिटर्जंट**

विशेष डिटर्जंट विशिष्ट साफसफाईच्या गरजा पूर्ण करतात, जसे की पाळीव प्राण्यांचे डाग रिमूव्हर्स, कार्पेट क्लीनर आणि फॅब्रिक सॉफ्टनर. या डिटर्जंटमध्ये अनेकदा विशिष्ट घटक आणि त्यांच्या हेतूनुसार तयार केलेले सुगंध वापरलेले असतात. स्पेशॅलिटी डिटर्जंट विविध पृष्ठभाग आणि सामग्रीसाठी लक्ष्यित साफसफाईचे उपाय विकसित करतात, ज्यामुळे स्वच्छतेची कार्यक्षमता वाढते.

**डिटर्जंटचा पर्यावरणीय प्रभाव :** साबणाचा उपयोग गेल्या शतकात मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. त्यात वाढच होत राहिली आहे. विशेषतः कोविड-१९च्या जागतिक साथीनंतर साबण आणि डिटर्जंट वापरात लक्षणीय वाढ झाली आहे. बाहेरून आल्यावर प्रत्येक वेळी साबणाने हात धुवावेत या परवलीच्या वाक्यामुळे घराघरातून साबणाचा उपयोग दुपटीने वाढला. याचे पर्यावरणीय परिणाम आता आणखी तीव्रतेने जाणवू लागले आहेत.

**१. जलप्रदूषण**

- सर्फेक्टंट आणि इतर डिटर्जंट घटक वापरल्यानंतर पाण्याच्या साठ्यांमध्ये टिकून राहू शकतात, त्यामुळे अर्थातच प्रदूषण होते.
- सर्फेक्टंट पाण्याच्या पृष्ठभागावरील ताणामध्ये व्यत्यय आणू शकतात, ज्यामुळे जलीय जीवांची श्वास घेण्याची आणि त्यांच्या शरीराचे तापमान नियंत्रित करण्याची क्षमता प्रभावित होते.
- फॉस्फेट, सामान्यत: डिटर्जंटमध्ये आढळतात, त्यामुळे युट्रोफिकेशन होऊ शकते, त्यात अॅझोलासारख्या एकपेशीय वनस्पती फुलतात आणि पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो, त्यामुळे अर्थातच जलचरांना हानी पोहोचते.
- डिटर्जंटचे अवशेष गाळांमध्ये जमा होऊ शकतात, ज्यामुळे जलीय परिसंस्थेवर त्यांचे दीर्घकालीन परिणाम होतात.

**२. माती दूषित होणे**

- डिटर्जंटचे अंश असलेले पाणी मातीत शिरून ते हानिकारक रसायनांनी दूषित करू शकते.
- फॉस्फेट मातीचे पीएच बदलू शकतात, त्यामुळे वनस्पती आणि मातीच्या सूक्ष्मजीवांसाठी पोषकतत्त्वांच्या उपलब्धतेवर परिणाम होतो.
- माती दूषित झाल्यामुळे सुपीकता कमी होऊ शकते, ज्यामुळे कृषीउत्पादकता आणि पर्यावरणीय आरोग्यावर परिणाम होतो.

**३. वायू प्रदूषण**

- काही डिटर्जंटमध्ये असलेले वाष्पशील सेंद्रिय संयुगे (VOCs) हवेत बाष्पीभवन करू शकतात, ज्यामुळे वायुप्रदूषणास हातभार लागतो.
- डिटर्जंटच्या वापरातून VOC उत्सर्जन इतर वायुप्रदूषकांवर प्रतिक्रिया देऊ शकते, ज्यामुळे धुके तयार होतात आणि मानव आणि प्राण्यांमध्ये श्वसनाच्या समस्या निर्माण होतात.

**४. जैवसंचय आणि विषारीपणा**

- ब्लीच आणि सुगंधयुक्त डिटर्जंट हे जलीय जीवांसाठी विषारी असतातच.
- सर्फेक्टंट जलीय जीवांच्या उतींमध्ये जैवसंचय करू शकतात, त्यांचे प्रमाण अन्नसाखळीत वाढवतात. मानवावर त्याचे अनिष्ट परिणाम होणे अनिवार्य आहे.

- डिटर्जंटच्या अंशांचे विषारी परिणाम जलीय परिसंस्थेमध्ये व्यत्यय आणू शकतात, ज्यामुळे जलचरसृष्टीवर अनिष्ट परिणाम होऊन त्यांची संख्या घटते आणि पर्यावरणात असंतुलन निर्माण होते.
- ग्राहकांच्या सवयींमुळे डिटर्जंटच्या पर्यावरणीय प्रभावावर लक्षणीय परिणाम होतो. डिटर्जंटचा अतिवापर, अयोग्य विल्हेवाट लावण्याच्या पद्धती आणि प्रभावी व जहाल उत्पादनांना प्राधान्य दिल्याने पर्यावरणाची हानी वाढते. शिवाय, पर्यावरणपूरक पर्याय आणि शाश्वत वापर पद्धतींबद्दल जागरूकता नसल्यामुळे पर्यावरणाच्या ऱ्हासाचे चक्र कायम आहे.

**शाश्वत उपाययोजना**

१. **जैव विघटनशील डिटर्जंटची निर्मिती**

डिटर्जंटचे पर्यावरणीय आयुष्य कमी करण्यासाठी उत्पादक जैव विघटनशील सर्फेक्टंट आणि डिटीव्हसह डिटर्जंट विकसित करू लागले आहेत. लिंबोणीयुक्त डिटर्जंट आता उपलब्ध झाली आहेत. जैव विघटनशील डिटर्जंटचा परिसंस्थेवरील प्रभाव कमी असतो.

२. **फॉस्फेटमुक्त उत्पादने**

- फॉस्फेटमुक्त डिटर्जंट युट्रोफिकेशन आणि मातीचे प्रदूषण रोखतात.
- नियामक संस्था डिटर्जंटमध्ये फॉस्फेटचा वापर प्रतिबंधित करू शकतात, पर्यावरणास अनुकूल पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करतात.

३. **जल-कार्यक्षम तंत्रज्ञान**

- डिटर्जंट फॉर्म्युलेशन आणि वॉशिंग मशिनमधील नवकल्पना पाण्याच्या कार्यक्षमतेला प्रोत्साहन देऊ शकतात, डिटर्जंटचे अंश असलेल्या सांडपाण्याचे प्रमाण कमी करू शकतात.
- उच्च-कार्यक्षमतेची वॉशिंग मशीन आणि कोल्ड-वॉटर डिटर्जंट पाणी आणि ऊर्जेचा वापर कमी करतात, पर्यावरणावरील प्रभाव कमी करतात.

४. **ग्राहक शिक्षण**

- जनजागृती मोहीम आणि शैक्षणिक उपक्रम ग्राहकांना डिटर्जंट वापराच्या पर्यावरणीय परिणामांबद्दल माहिती देऊ शकतात.
- इको-फ्रेंडली डिटर्जंट वापरणे, पूर्ण भार धुणे आणि अतिवापर टाळणे यासारख्या टिकाऊ लॉन्ड्री पद्धतींचा प्रचार करणे, व्यक्तींना पर्यावरणाच्या दृष्टीने जागरूक निवडी करण्यास सक्षम करते.

**नियामक आराखडा**


डिटर्जंटचा पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यासाठी सरकारी नियम आणि उद्योग मानके महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. नियामक उपायांमध्ये फॉस्फेटवरील मर्यादा, VOC उत्सर्जन आणि पर्यावरणास अनुकूल उत्पादनांसाठी ग्राहकांना मार्गदर्शन करण्यासाठी इको-लेबलिंगचा प्रचार समाविष्ट असू शकतो. याव्यतिरिक्त, सरकार, उद्योग भागधारक आणि पर्यावरण संस्था यांच्यातील भागीदारी शाश्वत पद्धतींचा विकास आणि अवलंब करण्यास सुलभ करू शकतात.

बाजारात विविध प्रकारचे डिटर्जंट ग्राहकांना स्वच्छतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भरपूर पर्याय उपलब्ध करून देतात. कपडे धुणे, डिशवॉशिंग किंवा विशेष साफसफाईची कामे असोत, योग्य प्रकारचे डिटर्जंट निवडल्याने पर्यावरणावरील प्रभाव कमी करून आणि टिकाऊपणाला प्रोत्साहन देताना प्रभावी साफसफाईचे परिणाम मिळू शकतात.

विविध ग्राहक प्राधान्ये, सामाजिक-आर्थिक घटक आणि पर्यावरणीय विचारांना परावर्तित करून डिटर्जंटच्या वापराच्या पद्धती संपूर्ण भारत आणि जगभरात लक्षणीय बदलतात. भारत पारंपरिक आणि आधुनिक डिटर्जंट वापराचे मिश्रण अनुभवत आहे, प्रादेशिक असमानता आणि विकसनशील ग्राहक वैशिष्ट्य, जागतिक ट्रेंड शाश्वतता, नावीन्य आणि जबाबदार वापराच्या महत्त्वावर जोर देतात. या वापरपद्धती समजून घेऊन आणि त्यांच्याशी जुळवून घेऊन, भागधारक ग्राहकांच्या गरजा पूर्ण करू शकतात, पर्यावरणीय कारभाराला प्रोत्साहन देऊ शकतात आणि स्वच्छ, अधिक टिकाऊ भविष्यासाठी योगदान देऊ शकतात.

डिटर्जंट स्वच्छता राखण्यासाठी आवश्यक असताना, पर्यावरणीय आव्हाने आहेत. जलप्रदूषण आणि मातीदूषित होण्यापासून ते हवेतील उत्सर्जन आणि विषारीपणापर्यंत, त्यांचा प्रभाव संपूर्ण परिसंस्थांवर पसरतो. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एक बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये शाश्वत उत्पादन नवकल्पना, ग्राहक शिक्षण आणि मजबूत नियामक उपाय अंतर्भूत आहेत. पर्यावरण अनुकूल पर्यायांचा अवलंब करून आणि जबाबदार वापरपद्धती लागू करून, समाज डिटर्जंटच्या पर्यावरणीय पाऊलखुणा कमी करू शकतो आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आपली पृथ्वी निरोगी राहील याची दक्षता घेण्यास प्रोत्साहन देऊ शकतो.

**- शरद काळे**
sharadkale@gmail.com



**नंदन जोशी**


# जादुनगरी व्हेनिस

व्हेनिस ही एक जादूनगरी आहे हे या शहरात शिरताच जाणवायला लागते. शहरात कुठल्याही मार्गे शिरले तरी हे शहर आणि बाहेरचे जग यातील सीमा प्रकर्षाने जाणवते. सध्याच्या गर्दीने ओसंडलेल्या युगातही ही किमया हे शहर साधते. अशा शहरात आश्चर्यजनक अशी पुस्तकांची दुकाने सापडतात. फार पूर्वी आणि या वर्षी अशा माझ्या या शहराला दोन भेटी झाल्या. फार अपेक्षा नसतानाही मला अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या पुस्तकांची दुकाने सापडली. मुद्दामहून न ठरवताही येता जाता अनेक वाटेत भेटली. प्रत्येक शहराचा एक बाहेरील देखावा असतो जो सतत आपल्या समोर येत असतो. त्यापलीकडचा शहराचा आत्मा सापडणे सहजासहजी शक्य होत नाही. विशेषतः थोड्या अवधीत. एक मार्ग म्हणजे तिथल्या पुस्तकगृहांना किंवा वस्तुसंग्रहालयांना भेट देणे. प्रवाशांच्या गर्दीपासून दूर जाऊन वेगळे काहीतरी पाहणे, अनुभवणे. तर असा हा प्रयास चालू असतो; कधी कधी सहज (एखाद्या वाऱ्याच्या झुळुकेसारखा) अनुभव हाती लागतो ज्यामुळे मुखवट्यापलीकडचं शहर काहीसं नजरेस पडते.

अनेक युरोपीय देशांसारखाच इटलीलादेखील अनेक शतकांचा वैचारिक वारसा आहे. ग्रीक आणि रोमन विचारधारेवर उभी राहिलेली युरोपीय संस्कृती. वास्तुकला, चित्रकला, शिल्पकला, संगीत, साहित्य, नाटक, नृत्य यात तिचे ठसे दिसतात. पुस्तकांची दुकाने या सर्व कलांचे एक दर्पण असतात. कलांखेरीज तत्त्वज्ञान, इतिहास, राजकारण, वैचारिक लिखाण याचे आलेख नजरेस येतात. व्हेनिस शहराला City States प्रबळ असण्याच्या काळात फार महत्त्व होते. इथे अनेक संस्कृतींचा मिलाप झालाय. ग्रेको रोमन तसेच मूरिश संस्कृतीचे ठसे आहेत. शिवाय पाण्यावर रचलेल्या या शहरात अनेक भव्य, सुंदर चर्च, कलासंग्रहालये, आणि स्टिल्टवरची घरे आणि तिथे पोचवणारे कॅनॉल. यामधून वाट काढता काढता मला सहजगत्या २५ ते ३० पुस्तकांची दुकाने आढळली. अर्थात प्रत्येक दुकानात



शिरणे जमले नाही. काहींना भेट देता आली नाही. याचे कारण असे की रात्री फिरताना सापडलेली दुकाने बंद झाली होती. तरी तिथल्या दिव्यांमुळे खिडकीत लावलेली पुस्तके नजरेस पडली.




एका रात्री Calle Ponte De La Guerra वर एक दुकान आढळले. दुकान जुने, वर नावाची पाटी नव्हती. पण खिडकीत काही वेगवेगळ्या विषयांवरची पण व्हेनिसशी संबंधित अशी पुस्तके दिसली. मी तो पत्ता नोंदवून पुढच्या दिवशी दिवसा हजर झालो. त्यावेळी तिथला वयस्कर दुकानदार आणि त्याचा सहकारी व मित्र हजर होते. मी आत शिरताच त्यांची अशी समजूत झाली की मी चुकून शिरलोय किंवा कुठल्यातरी जागेचा पत्ता विचारण्यास आलो आहे. माझे इटालियन बेताचेच आणि त्यांचे इंग्रजीही विशेष नसल्याने संभाषण फार पुढे जाऊ शकले नाही. शिरल्याबरोबर उभे राहण्याची जागा फक्त आणि टेबल, खुर्च्या एवढेच, पण बाकी सगळीकडे पुस्तकांच्या थप्प्या. सहज नजर फिरवताच लक्षात आले की nautical history विषयी बरीच पुस्तके आहेत. आधीच्या रात्री दिसलेली पुस्तके ही तिथल्या इतिहासावरची तर काही कला, तिथल्या चर्चविषयीची. व्हेनिसच्या अभ्यासकांना पुस्तके पुरवणारे पुस्तकगृह असू शकेल. एवढीच ओळख शक्य होती, माझे इटालियन लक्षात घेता.

व्हेनिस हे पुस्तकालयांनी इतके समृद्ध शहर हे आधी म ाहीत असते तर मी माहिती काढून नीट काही जागांना भेट दिली असती. यातील राहून गेले Libreria Aqua Alta पुस्तकगृह. जुन्या आणि नवीन पुस्तकांचे दुकान. जगातील अद्वितीय पुस्तकगुहांमधील एक असे मानले जाणारे. Aqua Alta मध्ये पायऱ्या ही पुस्तकांच्या केल्या आहेत. दुकानात पुस्तकांच्या थप्प्या लागलेल्या असतात. ग्लोबल वॉर्मिंगमुळे व्हेनिसच्या इम ारती हळूहळू बुडताहेत. या पुस्तकगृहाचे नावही (high water) हा पुराचा धोका अधोरेखित करते. दुकान कॅनॉललगत आहे. त्यामुळे तिथे सहसा पाणी येत असते. पण सरकत्या काळाचा आणि पाण्याचा धाक न धरता, मालकाने इथेच दुकान उघडले आणि चालवले आहे.

कॅनॉलपासून थोडे आत चालायला लागले की व्हेनिसच्या अरुंद रस्त्यांची गंमत. वेगवेगळ्या मालाची दुकाने, कॉफी शॉप, रेस्टॉरंट, लेखनसामग्रीची दुकाने, इत्यादी. त्यात एक छोटेसेच Polo Urban Bookshop. चित्रकला, प्रवासवर्णन, छायाचित्रे याखेरीज व्हेनिसवरचे एकच पुस्तक वेगवेगळ्या भाषांत. विल्यम टर्नर ने काढलेली व्हेनिसची रंगचित्रे आणि ग्रँड टूरवरचा ग्रंथ एकमेकांशेजारी. १७ ते १९ व्या शतकात ग्रँड टूर प्रचलित होती. युरोपमधील देशांची, विशेषतः इटलीतील ठिकाणांची भेट हे या टूरचे मुख्य आकर्षण होते. त्यात व्हेनिसची भेट तर अपरिहार्यच. ग्रँड टूरसाठी इथे नामांकित लेखक हेन्री जेम्स, चार्ल्स डिकन्स, थॉमस मानही आले होते. ह्यांनी अतिशय समर्थ अशी प्रवासवर्णने लिहिली जी आजही समीक्षक अभ्यासतात. Polo Urban Bookshop मध्ये इटलीतील विचारवंतांवर पुस्तकेदेखील आढळतात. त्यात एक कॅसानोवावरचे. त्याच्या आयुष्यातील तऱ्हतऱ्हेचे किस्से; त्यात अर्थात विविध स्त्रियांबरोबरची चित्रविचित्र संभाषणे आणि वागणूक. कॅसानोवाचे जीवन असामान्य असले तरी एकंदरीत या प्रदेशातील संस्कृतीचे भान येते. आधीच्या काही दुकानांत थप्प्या, तर इथे सुबक कोनाड्यांत प्रत्येक पुस्तकाला स्वतःची जागा. येणाऱ्या-जाणाऱ्याला आकर्षून घेईल अशी खिडकीतील पुस्तकांची रचना.

एक दिवस असेच चालत चालत दोन पुस्तकांची दुकाने, जी एकमेकांजवळ होती, अनपेक्षितपणे सापडली. त्या भागात व्हेनिसमधील एक विद्यापीठ होते. त्याशी संलग्न अशी ही पुस्तकाची दुकाने. Libreria Ca' Foscarina आणि त्याजवळच Libreria Editrice Cafoscarina. या पुस्तकालयांची खासियत अशी की येथे अभ्यासाच्या पुस्तकांव्यतिरिक्त कादंबरीही आढळते. त्यांच्या पुस्तकांच्या निवडीत त्या संग्राहकाची निवड आणि तेथे वाचल्या जाणाऱ्या पुस्तकांचा एक क्रॉस-सेक्शन दिसतो. फिक्शनमध्ये क्लासिक्स; उदाहरणार्थ बल्गाकोवची मास्टर अँड मार्गारिटा, इसाक डाइनसेनचे Out of Africa, जेन ऑस्टिन आणि ब्रॉन्टे भगिनींच्या कादंबऱ्या आणि इतर. समकालीन इटालियन लेखक-लेखिकांची पुस्तके. उदाहरणार्थ

बिट्रिस साल्व्हिओनी या तरुण इटालियन लेखिकेची La Malnate ही कादंबरी Fascist Italy मधील दोन मैत्रिणींवर आधारित आहे. भाषांतरित साहित्यही पुष्कळ; खिडकीत मांडलेले. समकालीन अमेरिकन लेखिका ओटेसा मॉसफेची Lapvona कादंबरी, नोबेलविजेत्या पिटर हॅन्डकेचे Dialogue हे नाटक, आइसलँडवासी रॅग्नर जोनासनचे चित्तथरारक Island किंवा थॉमस बर्नहार्डची In Alto जी मी इंग्रजीत भाषांतरित झालेली पहिली नाहीये. शेजारीच बुकरविजेत्या रोडी डॉयलचा कथासंग्रह Life Without Children, डॉन विनस्लोच्या थरार मालिकेतील City Of Dreams, इयान मॅकइवानची नवीन Lessons आणि ख्रिस्तोफर इशरवूडची The World in the Evening. पॅट्रिक फर्मर हा प्रवास वर्णनासाठी प्रसिद्ध लेखक आहे; त्याची एकच कादंबरी The Violins Of St Jacques हीदेखील आहे.

व्हेनिसला कलेचा मोठा वारसा आहे. गॅलेरियामध्ये अनेक शतकांतून काम करत गेलेल्या कलाकारांचं सर्वसमावेशक दर्शन घडतं. बेलिनी (Bellini), टिनटोरेटो (Tintoretto), कार्पाचिओ (Carpaccio), टायपोलो (Tiepolo) हे या शहरातले मोठे कलाकार. पुस्तकांच्या दुकानात व्हेनिसशी संबंधित अनेक कलेवरची पुस्तके आढळतात. Ca' Foscarina याला अपवाद नाही. कार्पाचिओची तैलचित्रे आणि रेखाचित्रे यावर पुस्तक सापडेलच, पण व्हेनिसचा इतिहास तैलचित्रातून दाखवणारे पुस्तकदेखील. पूर्वेकडे वळून ऐवजी आशिया खंडाविषयीचे हिरोशिग, होकुसाई, ऊटामारोच्या पेंटिंगचे पुस्तक तसेच किमोनोवरचे किंवा बायकांचे जपान अशीही पुस्तके. पाककलेविषयीदेखील समुद्रातील खाद्यपदार्थ इटालियन पद्धतीने व जपानी खाद्यसंस्कृतीवर एक खंड.



हे सगळे झाले खिडकीतले प्रदर्शन. हिमनगाचा १० टक्के अंश. अंतर्गत भागात मग बाकीचे सगळे. त्यात नाटके, तत्त्वज्ञान, टीका-मीमांसा, इतिहास, राजकारण, क्लासिक्स आलेच. ग्रीक आणि लॅटिनचं प्राध्यान्य. लोएब क्लासिक्सची मालिका आहे हिरव्या छोट्या आकारातील पुस्तके; पाचशेहून अधिक. यात अर्थात झेनोफोनपासून ॲरिस्टॉटल आणि इतर ग्रीक व इटालियन तत्त्ववेत्ते, इतिहासकार. लाओ त्सू व चाणक्य सापडणे मुश्किल. त्यातले काही भाग पुस्तकगृहात आणि बाकी असंख्य अभ्यासकांसाठीचे.

पुस्तकांखेरीज लेखनसामग्रीची पुस्तकगृहे असंख्य. माझ्यासारखेच या 'साहित्याचे' वेड असलेली माझी मुलगी, तनिमा, सोबत असल्याने तिथे जाऊन लेखण्या वापरून पाहणे, चामड्याची कव्हरवली पुस्तके हाताळणे हेही संशोधन करायला भरपूर वाव. या दुकानात नकाशे, जुनी पुस्तके (antiquarian), व्हेनिसची जुनी रेखाटने आणि इतर मजेदार गोष्टी.

व्हेनिसमध्ये नेहमीच्यापेक्षा वेगळी अशीही काही पुस्तकांची दुकाने सापडतात. या पुस्तकगृहांची प्रेरणा समजण्यासाठी थोडासा व्हेनिसमधील इतर कलाप्रवाहांचा आणि तिथल्या सामाजिक संस्कृतीचा विचार करायला हवा. दर दोन वर्षांनी Venice Biennale हे नवीन कलाकारांच्या वेगवेगळ्या शैलींचे प्रदर्शन भरते. एकंदरीत व्हेनिसला कला-साहित्य यांच्या मुख्य प्रवाहाबाहेरच्या इतर कृतींचा आविष्कार स्वागतार्ह आहे. ही जी वेगळ्या प्रकारची पुस्तकाची दुकाने आहेत तीही विषयामध्ये, मांडणीमध्ये वेगवेगळे ओघ आणि दिशा दाखवत असतात. Bruno With Motto या दुकानात वास्तुकला, डिझाइन, ग्राफिक डिझाइन या विषयांवर इतर ठिकाणी न मिळणारी पुस्तके आणि मासिके सापडतात. याशिवाय समाजशास्त्र, अध्यापनशास्त्र, प्रकाशन आणि सद्य:स्थितीवरचे ग्रंथ. या पुस्तकांची छपाईदेखील आधुनिक शैलीतील आणि वेगळी असते.

पुस्तकांनी डोके भरल्यावर व्हेनिसच्या कॅनालवर विसावा घ्यायला आलो. शुक्रवार संध्याकाळ होती. युवकयुवती Aperol Spritz आणि तळलेल्या squid वर ताव मारत होते. हाती अद्ययावत मोबाइल घेऊन जगातील कानाकोपऱ्यातील मित्रमंडळी आणि परिवारासोबत टेक्स्ट आणि फोटोद्वारे संभाषण चालू होते. या वेळी पुस्तकांची दुकाने बंद झाली होती. शटर आणि खिडक्यांमागे दोन हजार वर्षांचे ज्ञान कुलूपबंद झाले होते.

**- नंदन जोशी** (सॅनफ्रान्सिस्को)
nandanpjoshi@gmail.com



किरण येले

# कवितेच्या कॉलसाठी थांबलेला कवी : आदित्य दवणे

आदित्य दवणे हे नाव मराठी साहित्याला अपरिचित नाही. वरिष्ठ महाविद्यालयात व्यवस्थापन या विषयाचे अध्यापन आदित्य करत असतानाच सध्या तो कविता, ललित गद्य आणि गीते याची मुशाफिरी करत आहे. त्याचे हे लेखन शालेय काळापासून सुरू आहे. आदित्याच्या 'सारे संगीतकार' या गीताला पंडित यशवंत देव, अशोक पत्की, श्रीधर फडके, सुरेश वाडकर, अजित कडकडे, वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, नीलेश मोहरीर याचा स्वरसाज लाभला आहे. अनेक महाविद्यालये आणि शाळांमधून आदित्य दवणे 'फक्त लढ म्हणा' हे तरुणांसाठी प्रेरणादायी व्याख्यान देत असतो. समग्र शिवचरित्र हिंदी भाषेतून कथन करण्याचे प्रयोग प्रयोग यूट्यूब चॅनेलवर यशस्वी झाले आहेत. सन २०१६ मध्ये महाराष्ट्र टाइम्सच्या नाशिक आवृत्तीत तरुणांसाठी 'युवाबोध' हे दासबोधाचे निरुपण करणारे सदर आदित्य दवणे याने वर्षभर लिहिले तर सन २०१९मध्ये पुण्यनगरी वृत्तपत्रात 'प्रिय प्रिय' हे सदर त्याने वर्षभर लिहिल. तर लोकसत्ता वृत्तपत्राच्या व्हिवा आणि रविवार वृतांत या पुरवण्यांसाठी त्याने लेखन केलेले आहे. मौज, हंस, किस्त्रीम आणि अनेक अंकांतून त्याच्या कविता आणि लेख प्रसिद्ध झाले आहेत. सुप्रसिद्ध अभिनेत्री स्पृहा जोशी, प्रथमेश पाठक आणि संकेत म्हात्रे यांच्या सोबत 'नवं कोरं' हा या चार जणांच्या कवितांचा कार्यक्रम तो करत असतो आणि रोहन प्रकाशनच्या संकेतस्थळावर 'एकला सोलो रे' हे सोलो प्रवासाचे वेगळे अनुभवकथन सदर तो लिहीत असतो. आदित्य दवणे गेली अनेक वर्षे असे विविधांगी कविता, ललित, प्रवासवर्णने लिहीत असताना त्याने अजूनही आपले पुस्तक प्रकाशित करण्याचा विचार केला नाही याचे आश्चर्य वाटते. त्याचे वडील कवी प्रवीण दवणे मराठी साहित्यातील एक मोठे नाव असल्यामुळे आदित्य दवणे याला प्रकाशक मिळणे ही त्याच्यासाठी कठीण बाब नाही. पण तरीही त्याचे अजून एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही याचे कारण विचारता आदित्य म्हणतो मला अजून कवितेचा कॉल आला नाही. हे वाक्य नवोदित कवींसाठी महत्त्वाचे आणि सूचक आहे असे वाटते.



आदित्य दवणे

आदित्यने आजवर शंभरहून अधिक कविता लिहिलेल्या असून त्या प्रकाशकाची वाट पाहत आहेत. आदित्य याच्या कविता वाचताना जाणवते की त्या एकसुरी नाहीत. त्यात वैविध्य आहे. त्यात बालकविता आहेत, स्त्रीजाणिवांच्या कविता आहेत, पुरोगामी विचारांच्या कविता आहेत, सामाजिक कविता आहेत आणि या सगळ्या कवितामध्ये एक प्रगल्भता आहे. या कवितांमध्ये नवोदित कवींच्या कवितामध्ये विषय सुचल्यावर दिसणारी अनावश्यक आगंतुकता दिसत नाही. त्याची कविता उतावीळ नाही. काही कवितांमध्ये चिंतन तरीही बहुतांश कवितांमध्ये एक ठाम विचार आणि त्यामागे झालेले मंथन जाणवते. त्याच्या कविता प्रतिक्रियवादी नाहीत. अनेक नव्या कवींच्या कविता घटना,

विचार वा कृतीला प्रतिक्रिया म्हणून आलेल्या जाणवतात. त्यामागे काळाच्या रगाड्यात झालेली घुसळण नसते आणि त्यामुळे ती वरवर विधान करणारी कविता होते. कविता तीच, जी तुमच्या आत विचार जागवते, विचार करण्यास उद्युक्त करते आणि त्यातून एक नवाच विचार तुम्हाला देऊन जाते. तुमच्या आत नवी जाणीव वा जुनीच जाणीव नव्याने रुजवून जाते. तसे झाले नाही तर कविता विधनात्मक होते. त्यातून विचार मिळत नाही फक्त वाक्य मिळते. अशा अनेक यादीवजा कविता अपाण मॉडर्न कवितेच्या नावाखाली वाचत असतोच. त्यातून आपल्याला फक्त यादी मिळत जाते, ती घटनांची, बाजारीकरणाची, मनुष्याच्या क्षुद्रत्वाची, इत्यादी अनेक.

आदित्यच्या कविता कमी वा अधिक पण मंथनातून आलेल्या कविता आहेत हे निश्चित. या सगळ्या कवितांची भाषा अलंकृत नाहीच पण ती अभिनिवेशीही नाही. त्याच्या कवितेच्या भाषेला वेगळेपणाचा सोस नाही. ती रोजच्या जगण्याची भाषा आहे. जगण्याची भाषा अवलंबल्यामुळे मग साहजिकच आदित्यच्या कवितेत जगण्याचा अनुभव येतो. किंवा असेही म्हणता येईल की जगण्याचा अस्सल अनुभव सांगण्यासाठी त्याची कविता जगण्याची भाषा घेऊन येते. त्याच्या कवितेला आत्मानुभवाचा ध्यास आहे. तो अनुभव झाल्याशिवाय त्याची कविता येत नसावी. आणि हे अनुभव काही वेळा अलवार आहेत तर काही वेळा वाचकाच्या पुढ्यात झणझणीत पेटते वास्तव ठेवणारे आहेत.

'राऊ' या कवितेचा स्वर हळवा आहे त्यातील निवेदक स्त्री आहे आणि ती गतकाळ आठवताना म्हणते मी इथेच बसुनी आहे निश्चिंत मनाच्या काठी, या इथेच घडुनी गेल्या तनभार सावळ्या गाठी. या रचनेत पारंपरिक लय तर आहेच, या रचनेत येणारे तनभर सावळ्या गाठी, कालांत पाहुणा राऊ, सणसावित्रिची रात्र, भरदार बहाणे या वेगळ्या शब्दप्रतिमा लक्षवेधक ठरतात आणि कवितेच्या लयीसोबत येताना अर्थाचे वेगळे आयाम सूचित करतात. पुढे दिलेल्या 'देह' कवितेतही काजवा भीतीचा, बंड हाडांचा सापळा, अनाथ कावळा या प्रतिमा वाचकाचे लक्ष वेधून घेतात. 'देह' कवितेत शेवटची दोन चरणे कवितेची दिशा बदलून तोपर्यंत विरहकविता वा प्रेमकविता वाटणाऱ्या कविता रूप बदलतात आणि कवी लिहितो... जात पुसतात कोणी आणि हसतात दु:खी, सांगायला सावलीला काही उरतेना बाकी आणि देह अशांत गंभीर जळजळ करपला, गावकुसाच्या पल्याड सावकाश सरकला. हळुवारपणे जातव्यवस्थेचे वास्तव माणसाला कसे गावाबाहेर करते हे वास्तव लयीत सांगणारी आदित्यची कविता मात्र धार्मिक द्वेषावर भाष्य करताना मुक्तछंदात येते आणि तिची शब्दकळा थेट होते. वृत्तपत्रातून असलेल्या बातम्या वाचताना त्या बातम्यातील एक समान धागा जुळून त्या जोडलेल्या अनेक तुकड्यांतून एक भयाण वास्तव मांडणारी कविता जन्म घेते आणि ती वाचल्यावर निवेदक कवीला ते सत्यही भयंकर वाटते. भयंकर या अर्थाने की सध्या वास्तवाचे बाजारीकरण करण्याचा जो काळ चालू आहे आणि प्रत्येक माणसात समाजमाध्यमातून जाहिरात करण्याचा जो कल चालू आहे, तो कल लक्षात घेता कवितागत निवेदकाला वाटते, की आपण या दु:खाचे आपल्या प्रसिद्धीसाठी बाजारीकरण करतो आहे का? आणि त्यामुळे तो कष्टी होतो. दुखावतो. शेवटच्या पाच ओळींआधी ही कविता फक्त एक एक प्रसंग दाखवावा तसे चित्रण करत जाते आणि त्या सगळ्या प्रसंगांचा एक निष्कर्ष शेवटच्या पाच ओळींत वाचताना वाचकाला संध्याकाळचे चटका लावणारे वास्तव उद्विग्न करून जाते. आज जगभर अनके देशांत युद्धजन्य परिस्थिती दिसत आहे. अनेक देशांत गरिबीचा चटका लावणारी परिस्थिती नागरिक सहन करत आहेत आणि तरीही अनेक देशांचा युद्धास्त्रांवरचा खर्च वाढतच चालला आहे. पुढील काळात येणाऱ्या युद्धसंकटाचे सूतोवाच त्यात आहे. आता कवीने आपल्या कवितेतून युद्धाचे भविष्यातील परिणाम दाखवणे गरजेचे आहे. आदित्यने काही कविता युद्ध आणि युद्धजन्य स्थिती व मानसिकता यावर लिहिल्या आहेत ज्या वाचताना साहिर लुधियानवींच्या कवितेच्या काही ओळी आठवतात–

*बम घरों पर गिरें के सरहद पर*
*रूह–ए–तामीर जख्म खाती है*
*खेत अपने जलें के औरों के*
*जीस्त फाकों से तिलमिलाती है*
*टैंक आगे बढें की पिछे हटें*
*कोख धरती की बांझ होती है*
*फतेह का जश्न हो या हार का सोग*
*जिंदगी मय्यतों पे रोती है*

*जंग तो खुद ही एक मसअला है*
*जंग क्या मसअलों का हल देगी*
*आग और खून आज बख्शेगी*
*भूख और एहतियाज कल देगी*

*इसलीये ऐ शरीफ इंसानो*
*जंग टलती रहे तो बेहतर है*
*आप और हम सभी के आंगन में*
*शमा जलती रहे तो बेहतर है*

आदित्य दवणे याच्या कविता आणि इतर लेखनाचा प्रवास असाच पुढे जात राहो आणि त्यांचे पुस्तक लवकर येवो ही शुभेच्छा.

**राऊ**

मी इथेच बसूनी आहे
निश्चिंत मनाच्या काठी
या इथेच घडुनी गेल्या
तनभार सावळ्या गाठी

मी कशी उठू इतक्यात
मी कशी दुरावा देऊ
या इथेच आहे माझा
कालांत पाहुणा राऊ

का असल्या कातरवेळी
मी असले क्षण वेचावे
या इथेच मजला आता
मरणाचे स्वप्न पडावे

परतावे पुष्कळ केले
सत्याच्या अवकाशात
या इथेच बहुधा झाली
सणसावित्रीची रात

भरदार बहाणे केले
पण सुटला नाही पेच
या इथेच लागून गेली
कवितेला ओली ठेच

**देह**

देह निःशंक मातीचा
त्यात अंधाराची ओल
बसलेला डोहापाशी
रात उतरली खोल

पाण्यातून उमटला
पण हुंकार मातीचा
मासोळीत लपलेला
जणू काजवा भीतीचा

चांदण्यात पडलेली
गंगाआकाश सावली
साथ लुकलुक करी
घारी डोळ्यात बाहुली

संथ चाललेला मागे
बंड हाडांचा सापळा
बसलेला समशानी
गात अनाथ कावळा

जात पुसतात कोणी
आणि हसतात दुःखी
सांगायला सावलीला
काही उरतेना बाकी

देह अशांत गंभीर
जळ-जळ करपला
गावकुसाच्या पल्याड
सावकाश सरकला.

**अनुवाद**

अकबर
आज पिटीचा तास म्हणून
खुशीत बसमध्ये चढला होता,
हादिर
परीक्षेचा अभ्यास न झाल्यामुळे
परेशान होता.
हल्ल्यापूर्वी ओसामाने
हा व्हिडीओ रेकॉर्ड केला,
बसमध्ये मुले गाणी म्हणत होती.
तो आणि त्याचा लहान भाऊ
दोघेही स्फोटात मारले गेले!

शाळेतले रिकामे वर्ग
कसलीशी कैफियत मांडतात,
शिक्षक शिकवताना सुन्न होतात
आणि हजेरीच्या वेळी
अनुपस्थित शेरा देताना
खोल आतून गलबलतात.
देशात शिक्षणाला वाव नसल्यामुळे
एकही मुलगी दगावली नाही.

हल्ल्यातून जिवंत वाचल्या,
अपंग झाल्या मुलांनी
परिधान केल्या वस्त्रातून
काहींच्या जखमा दिसतात,
काहींच्या दिसत नाहीत.
महंमद इब्राहिम वाचला,
'आयुष्य तसं उरलं नाही
आणि भविष्यही बेचिराख झालं'
हे म्हणताना तो
जराही चाचरला नाही.

जिथे मुले खेळायची
ती बाग,
त्यांचीच दफनभूमी झालीये
आणि शेजारीच
उद्ध्वस्त बसचा सांगडाही आहे.

मृत मुलांना ओळखताना
पालकांना कष्ट पडले.
जवळजवळ
विद्रूप होऊन
अस्पष्ट झाल्या चेहऱ्यांमुळे
'प्रत्येक पोर आपलेच'
त्यांना भासू लागले.
इंझमाम अल हुरागी
यांनी दहा वर्षांचा मुलगा गमावला,
त्याची ओळख दातांवरून पटली;
तर काहींची ओळख पटेपर्यंत
खणून ठेवलेल्या काही जागा
तशाच ठेवण्यात येणार आहेत.

अस्वस्थ होऊन
मी पेपर मिटला, टिपणे काढली.

केवळ बातमीचा अनुवाद केल्यानंतर
तिची कविता होते;
हे खरेच किती भयंकर आहे...

हे खरेच किती भयंकर आहे!

**- किरण येले**
kiran.yele@gmail.com


**आदित्य दवणे**
davane.aditya@gmail.com

# ग्रंथपरिचय



**डॉ. निर्मोही फडके**
९९२०१ ४६७११

**टाटा : एक विश्वास**
**माधव जोशी**




हुमाता, हुखाता, हवाराष्ट म्हणजे चांगले विचार, चांगले शब्द, चांगले कार्य. हा संदेश आहे पारशी धर्माचा. पारशी म्हटलं, की आपल्या डोळ्यांसमोर एक अतिशय शांत, निरुपद्रवी आणि गोड वाणी असलेला लोकसमूह उभा राहतो. भारतात कायमचं स्थिरावलेल्या ह्या समूहातील एक जगविख्यात कुटुंब म्हणजे 'टाटा' कुटुंब. आपल्या पूर्वजांनी चालू केलेली चांगुलपणाची गाथा निरंतर चालू ठेवणाऱ्या, भारताचा मानबिंदू असलेल्या ह्या कुटुंबाबद्दल आणि 'टाटा' औद्योगिक समूहाबद्दल समस्त भारतीयांना जितका आदर आहे, विश्वास आहे, तितकंच कुतूहलही. मोरया प्रकाशनानं प्रकाशित केलेलं, माधव जोशी लिखित 'टाटा : एक विश्वास' हे पुस्तक वाचकांचं ह्या विषयासंबंधी असलेलं कुतूहल शमवू शकेल.

मनोगतामध्ये लेखकांनी लिहिल्याप्रमाणे, 'संपत्ती निर्माण करणे हा स्वतंत्र प्रज्ञेचाच विषय आहे', हे पूर्णपणे पटतं, जेव्हा आपण टाटा उद्योगसमूहाचा अवाढव्य इतिहास, टाटा कुटुंबीय, टाटा उद्योगसमूहाचे हजारो कामगार, अधिकारी आणि त्यांनी राष्ट्राच्या उभारणीसाठी दिलेलं योगदान, दीड शतकाच्या वाटचालीत घडलेल्या घटना ह्या सगळ्यांचा लेखकांनी घेतलेला मागोवा वाचत जातो.

भारतीय उद्योगांचे जनक जमशेटजी नसरवानजी टाटा ह्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात औद्योगिक क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली. उद्योगजगतातल्या एका लहान बीजाचं रूपांतर आज आपण एका वटवृक्षात झालेलं पाहत आहोत. अनुभवतही आहोत. ह्या पुस्तकात टाटा समूहाची, त्यांच्या कारखान्यांची, उत्पादनांची माहिती नाही, तर ह्या घराण्यातल्या कर्तृत्ववान पुरुषांच्या आणि स्त्रियांच्याही लहानलहान कथा आहेत. आज एकविसाव्या शतकात कितीतरी वेगळ्या वाटणाऱ्या, कदाचित विचित्रही वाटणाऱ्या दीड-पावणेदोन शतकभरापूर्वीच्या घटना वाचून आपण अचंबित होतो. उदाहरणादाखल, '१८५७ च्या भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला दोन वर्षे उलटून गेली होती तेव्हा विशीतले जमशेटजी त्यांचे वडील, व्यापारी आणि बँकर चालवत असलेल्या, छोट्या कंपनीत सामील झाले होते.'

'१९१२ मध्ये पहिल्या पोलादाचे उत्पादन झाले.... खूप पुढे १९३९ साली दुसऱ्या महायुद्धामध्ये, सैन्याच्या चिलखती गाड्यांना टाटा स्टीलने तयार केलेल्या बुलेटप्रूफ प्लेट आणि रिव्हेट बसवण्यात आले होते. त्या गाड्यांना 'टाटानगर' असे संबोधले जायचे. अभिमानास्पद गोष्ट अशी, की अनेकदा 'टाटानगर'च्या एका बाजूला ७५ मिमीचा शेल फुटला तरी धातूच्या पट्ट्यांना मात्र कुठेही छेद गेला नव्हता आणि त्यात बसलेले सर्व जण सुरक्षित होते.'

'पोलाद कारखान्यासाठी जमशेदपूर हे स्थान स्वामी विवेकानंद यांनी भारताच्या नकाशावर बोट ठेवून सुचवले होते.'

'कारखाना व उद्योग यांतील तफावत टाटा जाणत होते आणि म्हणून मुळगावकर यांना हा एक आदर्श उद्योग उभा करता आला. सर्व व्यवस्थापकांनी रोज कारखान्यात फेरी मारलीच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. जेआरडी आणि रतन टाटासुद्धा गोल्फ कार्टमधून फेरी मारायचे.'


टाटा समूहाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचं वास्तववादी चित्रण ह्या कथनाच्या अनुषंगानं वाचायला मिळतं. ह्यामध्ये अनेक ऐतिहासिक आणि वर्तमानकाळातल्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरच्या व्यक्तींचा अंतर्भाव आहे. उदाहरणादाखल, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी, दादाभाई नौरोजी, पं. नेहरू, इंदिरा गांधी, रुसी मोदी, नानी पालखीवाला, सुधा मूर्ती, सुमंत मुळगावकर, अजित केरकर, दरबारी सेठ, सायरस मिस्त्री, नटराजन चंद्रसेकरन इत्यादी.

जमशेटजी टाटा, दोराबजी टाटा, आर.डी. टाटा, जेआरडी, नवल टाटा, रतन टाटा ह्या टाटा घराण्यातल्या मुख्य कर्तृत्ववान पुरुषांचं अफाट कार्यकर्तृत्व त्यांच्या काही गुणदोषांसह आपल्याला वाचायला मिळतं. तसंच ह्या अतिभव्य उद्योगसमूहात घडलेल्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी, राष्ट्र-उभारणीसाठी ह्या समूहानं दिलेलं योगदान ह्या गोष्टी वास्तवातल्या असूनही लेखकांनी केलेल्या मांडणीमुळे रोचक वाटतात. ह्याचं मुख्य कारण म्हणजे स्वतः लेखकांनी दोन दशकांहून अधिक काळ टाटा उद्योगसमूहात काम केलं आहे. इतकंच नव्हे, तर रतन टाटा, सायरस मिस्त्री इत्यादींच्या सहवासात ते सतत राहिले आहेत. त्यांच्या गुणवत्तेमुळे त्यांच्यावर पडलेल्या जबाबदाऱ्या पार पाडताना, त्यांच्या सोबतीचे क्षण जवळून अनुभवताना केलेली निरीक्षणं, नोंदी, अभ्यास इत्यादींचा सुरेख मेळ ह्या पुस्तकात जमून आला आहे.

प्रसिद्धीपराङ्मुखता हे ह्या पारशी कुटुंबाचं वैशिष्ट्य आहे. सचोटी, जबाबदारी, उत्कृष्टता, आद्यप्रवर्तक, ऐक्य ही टाटा समूहाची मुख्य मूल्यं आहेत. ह्या मूल्यांवर आधारित केवळ टाटा उद्योगच नव्हे, तर १८९२पासून वेगवेगळ्या वर्षी स्थापन झालेल्या टाटा ट्रस्टचं अजस्र समाजकार्य अव्याहत चालू आहे. अतिशय वेगळ्या पातळ्यांवरची आव्हानं पेलत नव्या युगाला सामोरं जात आहे. मानवतेची बूज राखत भारताची प्रतिमा उजळ करत आहे. केवळ एक सजग वाचक म्हणून नव्हे, तर एक प्रामाणिक नागरिक ह्या नात्यानंही 'टाटां'चा हा विश्वासार्ह, अवाढव्य आणि प्रेरणादायी प्रवास वाचायला हवा.

**टाटा : एक विश्वास**
लेखक : माधव जोशी
मोरया प्रकाशन
मूल्य - ₹ ३००/-

## गीत नवे गातो मी...




अटलबिहारी वाजपेयी यांच्या
'मेरी इक्यावन कविताएँ'
या कवितांचा भावानुवाद–
प्रवीण दवणे

कवितासंग्रह

मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये

## स्पार्टाकसी मरण आले तरी


प्रमोद नारायणे




कवितासंग्रह

मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये

## अवधची बेगम




संजीवनी खेर

चरित्रकहाणी

मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये

## सोऽहं गीता : तू तोच मी


शिवरामप्रसाद
त्रिंबक
पंडित




आत्मप्रवास

मूल्य ३५० रुपये । सवलतीत २०० रुपये

## पातंजलयोगदर्शन
**निरंतर साधना**





डॉ. धनश्री धनंजय साने

योगविषयक ग्रंथ

मूल्य ५०० रुपये । सवलतीत ३०० रुपये

## काव्य-लीला

पांडुरंग बापूजी दिघे




कवितासंग्रह

मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये

# ‘कॉर्पोरेट गप्पा’मध्ये नाट्यप्रेमी मुकुंद मराठे यांच्याशी बातचीत




**सतीश जोशी यांनी मुकुंद मराठे यांच्याशी साधलेला संवाद**

ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित ‘कॉर्पोरेट गप्पा’ या उपक्रमात अमेरिकेतील कॅलिफोर्नियास्थित ‘कला (CalAA)’ या संस्थेचे एक संस्थापक व अध्यक्ष मुकुंद मराठे यांच्या मुलाखतीच्या कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, ६ मार्च २०२४ रोजी वांद्रे येथील प्रतिभांगण येथे करण्यात आले होते. अभिनेते सतीश जोशी यांनी त्यांच्याशी एक ‘कला’प्रवास या विषयावर संवाद साधला. कला ही सॅनफ्रॅन्सिस्को बे एरिया येथे २००२ मध्ये तिथल्या नाटकवेड्या मंडळींनी स्थापन केलेली संस्था आहे. कलेमधून कलेसाठी कलारत राहायचे, हे कलाचे ब्रीदवाक्य आहे. कला संस्थेच्या स्थापनेपासून ते आजतायागायत या संस्थेने राबवलेल्या उपक्रमांचा, या प्रवासातील अनेक आठवणींचा ऊहापोह या मुलाखतीतून झाला.

मुकुंद मराठे मुलाखतीत म्हणाले, की शाळेत असताना ज्ञानेश्वरांवरील एकांकिकेत विठ्ठलपंतांची भूमिका केली होती, तिथपासून त्यांचा नाट्यक्षेत्रातला प्रवास सुरू झाला. नोकरीसाठी ते सॅनफ्रॅन्सिस्को येथे गेले, तेव्हा त्यांची भेट नाट्यप्रेमी मंडळींशी झाली. तिथे त्यांनी कवी शंकर वैद्य यांनी निवेदन लिहिलेला ‘खेळ मांडियेला’ हा कार्यक्रम १०० कलाकारांना घेऊन बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात सादर केला होता. तसेच, २००० साली पु.ल. देशपांडे यांच्या निधनानंतर त्यांना आदरांजली वाहणारा ‘नॉन स्टॉप पुल’ हा दहा तासांचा कार्यक्रम ६० कलाकारांना घेऊन सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये करण्यात आला होता. कार्यक्रमांच्या निमित्ताने भेटणाऱ्या कलाकारांना एकत्र बांधून ठेवणाऱ्या संस्थेची आवश्यकता भासू लागली आणि त्यातूनच ‘कला’चा जन्म झाला.

मुकुंद मराठे यांनी आपल्या मुलाखतीतून ‘कला’तर्फे राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. दरवर्षी ‘कला’तर्फे तेथील कलाकारांना घेऊन दोन नाटके, समीप रंगमंच उपक्रमात चार एकांकिका, सॅन्डबॉक्स उपक्रमात दर महिन्याला एक नाट्यवाचन, कलाऑडिओस्कोप उपक्रमात उत्तमोत्तम साहित्याचे रेकॉर्डिंग असे उपक्रम राबवले जातात. तसेच, या कार्यक्रमांमधून निर्माण होणारा निधी भारतातील चांगल्या कलाकृती डिजिटल स्वरूपात कायमच्या जतन करण्यासाठी वापरला जातो. या उपक्रमात आतापर्यंत ‘सूर्य पाहिलेला माणूस’, ‘आनंद ओवरी’ ही नाटके; तसेच, विजय तेंडुलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार, भालचंद्र नेमाडे यांच्यावरील डॉक्युमेंट्रींची निर्मिती करण्यात आली आहे. भारतातून तिथे नाटके घेऊन येणाऱ्या कलाकारांच्या, दिग्दर्शकांच्या कार्यशाळांचे आयोजनही ‘कला’ करत असते.

आपली नोकरी करत मुकुंद मराठे यांनी एक ध्यास घेऊन एक व्रत म्हणून ‘कला’ या संस्थेचे काम केले, अशा शब्दांत अभिनेते व मराठे यांचे जवळचे स्नेही सतीश जोशी यांनी कलाच्या प्रवासाला दाद दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी भोईर यांनी केले. शशिकांत शानबाग व लेखक प्रल्हाद जाधव यांनी स्वागत केले.

**– अश्विनी भोईर**

**‘ग्रंथाली’ कार्यालयासाठी दादर भागात राहणाऱ्या निवृत्त व्यक्तीची कार्यालय व्यवस्था बघण्यासाठी सकाळी ११.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत आवश्यकता आहे. इच्छुकांनी दुपारी २ ते ५ या वेळेत येऊन भेटावे.**
**संपर्क : सुदेश हिंगलासपूरकर (९८६९३९८९३४)**

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**कवितेच्या वाटेवर**
**अशोक नायगावकर**




**काट्यांनाही फुले म्हणणारी कविता**

'न्यायधीशांकडे गेलो असताना
कोर्टात पोटुश्या ऊर्फ गर्भारशी बायकांची
गर्दी जमलेली बघून
काही अन्याय इत्यादी प्रकार झाला की काय
असा उपप्रश्न केल्यावर
आपल्या भावी लेकरांसाठी
साऱ्या जणी अटकपूर्व जामीन घ्यायला आल्याचे समजले
म्हणजे परिस्थिती फारच कठीण झाल्यासारखी वाटली'

अंधार करा उजेड फारच झाला. किती आशेने सागर इथवर येतो एकटाच परतून जातो मग उरते ते खारटपण अन् व्यस्त क्षणांची वाळू. अधूनमधून मला अभिमानही वाटतो आणि सतत लाज वाटते अभिमान वाटण्याची. विवेकवाद अॅडमिट आहे इस्पितळात व्हेंटिलेटरवर कोमात. सरस्वतीवर तर वॉरंटच आहे, ती भूमिगत केव्हापासून वाहते म्हणतात. उजवा डाव्याला म्हणाला निदान नमस्कार करताना, टाळ्या वाजवताना आम्ही तुला बरोबर घेतो. खडी फोडते बहिणाबाई ओवीला बघ रक्त चिकटले. रिताच हंडा वणवण फिरतो, फक्त खालची माय बदलली. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर ऐकून आदराने तिला नॉनस्टिक तवा भेट दिला आणि येथेही पुन्हा ती भाकरीलाच चिकटली. आभाळाच्या पांढऱ्या ढगांच्या वाती वळतो तो प्रार्थनेच्या ग्रामीण मिणमिणत्या दिव्यात आणि अंगावरच्या अडत्यांची मंद सुखासीन सुरवंटे फुलपाखरे होऊन उडताना दिसतात. काचेपल्याड तिची टकटक आशेने बघते आणि माझ्या हातातील आइसक्रीमचा कोन विरघळतोय कोपरापर्यंत. इथे मरणाची शेवटची पार्टी झाली अडीच हजार वर्षांपूर्वी, मस्त पॉयझन ब्रँड! पाणी न ओतता मरण डायल्युट नाही केलं! ती सोलरची पॅनेल बसलीत अभ्यासाला उन्हात. पृथ्वी कशी क्वार्टर मारून कललीय एका बाजूला तर्रर्रर्र... फिरते स्वतःभोवती तसं हे गाव फिरतंय झोकांड्या खातंय दिवसा ढवळ्या. पोलीस नुसतेच बघतायेत संत्र्यामोसंबीकेळ्यांची सालं उतरवली जातायत दिवसाढवळ्या, मक्याच्या कणसाला दिलं विस्तवाच्या तोंडी आणि वर तिखटमीठ चोळलं जातंय जखमांवर, हे काय चाललंय युगानुयुगे शाकाहारी! ...आणि बरंच काही – इति अशोक नायगावकर!

अशोक नायगावकर यांचा 'वाटेवरच्या कविता' हा पहिला संग्रह प्रकाशित झाला तो १९९२ साली. त्यानंतर आता २०२२ मध्ये त्यांचा दुसरा कवितासंग्रह आला आहे त्याचे नाव आहे 'कवितेच्या वाटेवर'. हा संग्रह वाचत असताना लक्षात येते, की या कविता आपण यापूर्वी वाचलेल्या आहेत; परंतु एकसंघपणे संग्रहाच्या स्वरूपात आपण कविता वाचायला सुरुवात करतो तेव्हा लक्षात येते, की या कवीने रसिक वाचकांवर अन्याय केलेला आहे. 'कवितेच्या वाटेवर' हा कवितासंग्रह खूप अगोदरच प्रकाशित व्हायला हवा होता. आणि त्यानंतर त्यांच्या संग्रहात असलेल्या सगळ्या कवितांचे अनेक संग्रहदेखील प्रकाशित व्हायला हवे होते. निदान आता तरी त्यांनी ते मनावर घ्यावे अशी एक वाचक म्हणून त्यांना विनंती आहे.

अशोक नायगावकर म्हटले की मैफिल, मिश्किली, गप्पा, विनोद आणि मग कविता, असे एक समीकरण होऊन बसले आहे. जगभर त्यांच्या कवितेचे चाहते आहेत. आजही नुसते नायगावकर हे नाव काढले तरीसुद्धा रसिकांची गर्दी होते. हा त्यांच्या कवितेचा महिमा आहे. तुम्ही त्यांची एक एक कविता वाचायला घेता तेव्हा लक्षात येते, की अशोक नायगावकर हे एक खूप संवेदनशील, भावनाप्रधान आणि समाजात नजर उघडी ठेवून टीपकागदाप्रमाणे विरोधाभास टिपणारे प्रतिभा संपन्न कवी आहेत. आपण त्यांच्या कवितेमागील व्यापक सामाजिक आणि वैश्विक भान लक्षात घेतले तर त्यांची कविता आपल्या नजरेवरील निबर संवेदनाहीन दाटलेला पडदा आपल्या तीव्र नखांनी ओरबाडून स्वच्छ नितळ तळाशी घेऊन वास्तवतेचे दर्शन घडविते. आज सर्वत्र पसरलेला स्वार्थ, ढोंगीपणा, क्रूरता, फसवेगिरी, दांभिकपणा केवळ जागतिक स्तरावर नाहीतर थेट स्वयंपाकघरापर्यंत पोहोचलेला आहे याचे दर्शन ही कविता घडवते.

या संग्रहात समाविष्ट झालेल्या सर्वच कविता मुक्तछंदातील आणि मुक्त पद्धतीने लिहिलेल्या आहेत. त्यांच्यात घेतलेले सूत्र अनेक संदर्भांनी गुंफलेले आहे. यात इतिहास, भूगोल, निसर्ग, शेतकरी, बापू, सॉक्रेटिस, बहिणाबाई आई, कवी, शिक्षक आणि शिक्षणव्यवस्था, राजकारण यांचे संदर्भ आहेत, जे परिचयाचे असूनही त्यातले अपरिचित्व या कवितेतून दिसून येते. वरवर वाटणारी साधी, सोपी, सरळ कविता वर्मावर बोट ठेवणारी आहे. तिला अलंकार, उपमा, उत्प्रेक्षा रूपक अशा व्याकरणीय व्याख्येत बसवता येत नाही. असे असले तरी तिचे स्वतःचे एक स्वतंत्र व्याकरण आहे. तिला स्वतःची एक लय आहे आणि गतीदेखील. ती तुकड्यातुकड्यांनी समोर येते तर कधी सलग दीर्घ स्वरूपात. मात्र जे त्यातून सांगायचे आहे, सुचवायचे आहे ते तिच्या अंतरंगात पूर्णपणे भिनलेले असते. त्यामुळे कविता वाचून झाली तरीदेखील बराच वेळ ती मनाला सुन्न करून सोडते, अंतर्मुख करते आणि सतत सोबत करत राहते.

वाण मराठीचा हा अस्सल!

अरुण म्हात्रे यांनी लिहिलेले हे ब्लर्ब अशोक नायगावकर यांच्या व्यक्ती आणि कवीवृत्तीवर सुंदर भाष्य करते,

'वक्रोक्तीचा व्यंगोक्तीचा तुरा लेउनि शिरी
कवितेलाही पुरून उरते अशी ही नायगावकरी'

प्रभाकर वाईरकर यांनी या संग्रहाचे मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये    सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**शहामृग**

**डॉ. रवींद्र शोभणे**




**माणसाचा तळ शोधणाऱ्या कथा**

''तू समजतेस तसा मी हळवा नाहीच मालविका. मी पूर्णपणे विचारी आहे. राजकारणासारख्या क्षेत्रात मी कधीच अडकू शकत नाही. ती माझी प्रकृतीच नाही. या अशा पद्धतीने राजकारणात शिरून काय मिळतं? कुठली मूल्यात्मकता जोपासतो आपण? जी माणसं केवळ या स्वार्थाकरता एकमेकांच्या जिवावर उठतात, रक्ताचे नातेसंबंध विसरून असे एकमेकांशी खेळी खेळतात, त्यापेक्षा जनावरांचे कळप लाख पटीनं चांगले म्हणता येतील. जनावरं कळपात एकजुटीनं तरी राहतात. दुसऱ्या कळपातील जनावरांवर एक जात तुटून पडतात आणि आम्ही माणसं मात्र रक्ताच्या नात्यातल्या माणसांचा घोट घ्यायला...''

९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचा 'शहामृग' हा कथासंग्रह दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने पुन्हा वाचकांच्या भेटीला आलेला आहे. स्वागत करावा असाच हा कथासंग्रह आहे. कथासंग्रहात फक्त पाच कथा आहेत ज्या दीर्घ स्वरूपात आपल्यासमोर येतात. कथा दीर्घ असताना ती कादंबरीच्या जवळ जाणारी असू शकते; परंतु अनेकदा त्या कथेची मागणी आणि लेखक करत असलेली कथेची मांडणी यांचाही त्यात महत्त्वाचा सहभाग असतो. डॉ. शोभणे यांच्या आतापर्यंतच्या बहुतेक कथासंग्रहातील कथा दीर्घ स्वरूपातच आपल्याला भेटत राहिलेल्या आहेत. त्या केवळ दीर्घ लिहायच्या म्हणून लिहिलेल्या नाहीत तर त्यांच्यातला आशय हा महत्त्वाचा भाग आहे. त्यापेक्षा कथेतील व्यक्तिरेखा त्यांच्या मनोव्यापारांच्या तळापर्यंत थेट उतरून ढवळून पाहण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कथेत मोजकीच पात्रे असूनदेखील प्रत्येकाची ठळक वैशिष्ट्ये दृगोचर होत जातात. तसेच जे प्रसंग, घटना नमूद करतात त्यात संदर्भांची कुठलीही साखळी तुटणार नाही, बारीक बारीक तपशिलांसह सगळे सांधे व्यवस्थित जोडले जातील, आणि चलत्‌चित्ररूपाने ती कथा त्यातील व्यक्तिरेखा आपल्याला सांगत आहेत, इथपर्यंत त्यांची सखोल मांडणी झालेली असते. तसेच कथेच्या आरंभापासून शेवटपर्यंत कथा नितळ प्रवाहासारखी तिच्या नैसर्गिक वेगाने वाटचाल करत राहते. लेखकाची ही सामर्थ्यशैली कथेच्या पूर्णत्वाला आकार देते. त्यामुळेच प्रत्येक कथा स्वतंत्रपणे आपल्या मनात ठामपणे आपले अस्तित्व मान्य करायला भाग पाडते.

'महाप्रस्थान' या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा श्रीधर असून त्याचे निधन झालेले आहे. तरीदेखील तीच व्यक्तिरेखा सदानंद, नलिनी, श्रीधर यांच्या भोवती घट्ट बिलगून आहे. किंवा त्या उलटही म्हणता येईल, या व्यक्तिरेखा श्रीधरशी नाते सांगत त्याची व्यक्तिरेखा आपल्यासमोर उभी करतात. प्रत्यक्षात श्रीधर आपल्यासमोर संवाद साधत नाही तरीही तोच आपल्याला अधिक भावतो. 'शहामृग' या कथेत वेश्यापुनर्वसन असा मोठा आणि धाडसाचे धाडस पाहणारा विषय आहे. आनंदराव, कमलताई हे सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते वेश्याव्यवसायातून स्वतःची सुटका करून स्वतंत्रपणे आयुष्य जगू पाहणाऱ्या महिलांच्या पाठी उभे राहण्याचा प्रयत्न करतात. पुनर्वसन म्हणजे काय, तर त्यांना या दलदलीतून बाहेर काढणे आणि स्वतंत्र व्यवसाय किंवा नोकरीच्या निमित्ताने स्वतःच्या पायावर उभे करणे. असे करताना किती अडचणी येतात आणि समाज त्यांची मानसिकता बदलायला तयार आहे काय, हे प्रमुख विषय त्यातून पुढे येतात. किरण देशमुख नावाची मुलगी पुनर्वसनाच्या निमित्ताने वेश्यावस्तीतून बाहेर पडते. आनंदराव तिला तात्पुरता निवारा म्हणून स्वतःच्या घरी आणतात. त्यातून प्रश्न सुटतो का, की नवीन प्रश्न निर्माण होतात, हा विचार करायला लावणारा प्रश्न ही कथा आपल्या समोर उपस्थित करते. 'सती आणि महात्मा' या कथेत आदर्शवादी, परिवर्तनवादी आचार्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन उच्चशिक्षित कल्याणी अशिक्षित, मोलमजुरी करणाऱ्या भीमाशी लग्न करते ते समाजपरिवर्तन करण्याचा हेतू मनात ठेवून. यात कल्याणीने केलेला त्याग किती यशस्वी होतो, हा एक भाग आहेच. महत्त्वाचा भाग आहे तो आचार्यांच्या परिवर्तनवादी विचारांचा. आदर्शवादी परिवर्तन घडवणारे आचार्य कुणाचे परिवर्तन घडवतात आणि त्यातून नेमके काय साध्य होते? हा आचार्यांचा अहंकार आहे की कल्याणीसारख्या तरुणींचा बळी? पुन्हा आपल्याला ही कथा विचार करायला लावते. 'खेळीया' कथेत राजकीय कारकीर्द गाजवलेल्या नानासाहेबांच्या मृत्यूनंतर वारसाहक्काने येणाऱ्या राजकारणातील प्रवेशाचा एक अंक आपल्यासमोर सादर होतो. राजकारणात नात्यापेक्षा, रक्तसंबंधापेक्षा राजकीय स्वार्थ महत्त्वाचा असतो, हेच यातून अधोरेखित होते. 'केसाळ कातडीचं श्वापद' ही कथा थेट आपल्या अंगावर येते. तरुण शरीर भुकेचा कोंडमारा झाल्यास त्याची तृप्ती करण्यासाठी कसे कासावीस होते, एखादे तुंबलेले पाणी जशी वाट सापडेल तिकडे वाहत जाते तसे तृप्तीचे प्रवाह सापडत जातात. वेणू ही या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा, जी चाळिशीच्या आसपास आहे. तिच्याभोवती माधव, राजा , बहिणीचा नवरा, जोगी हे आहेतच; परंतु लेखक मृदुंग याचाही वापर एखाद्या व्यक्तिरेखेसारखा करतात. मृदुंगातून निघणारा ध्वनी आणि मनाच्या तळाशी असलेला ध्वनी यांचा नाद समन्वय साधू लागतो तेव्हा व्यक्ती व्यक्ती राहत नाही, भावनेच्या एकाच उसळणाऱ्या लाटेवर स्वार होतात.

डॉ. रवींद्र शोभणे यांच्या या कथा वाचत असताना अधिक जाणवते, की ते व्यक्तिरेखांच्या तळापर्यंत शोध घेण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नात ते स्वतःची लालित्यपूर्ण शैली हरवू देत नाहीत. तिला मानसशास्त्रीयतेची जोड देतात. तत्त्वज्ञानाच्या कसोटीवर पारखून घेतात आणि तर्कशास्त्राला केंद्रस्थानी ठेवतात. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर कथा वळण घेते तेव्हा ती प्रत्येक टप्प्याचे वेगळेपण सांगत जाते, आपला मूळ पीळ न सोडता. या सांगण्यात एक तरलपणा आहे. 'तिथं मुलायम गालिचा अंथरून ठेवावा तशी शांतता पसरली होती निर्विकारशी.'

मुळातच कादंबरीकार असल्याने लेखक कथेतील व्यक्तिरेखा आणि प्रसंग, घटना यांना पूर्णपणे न्याय देण्याचा प्रयत्न करतात कादंबरी सारखा, आणि म्हणूनच प्रत्येक कथा एक कादंबरी आहे असेच वाटत राहते. या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ३०० रुपये  सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**अनहद**

**डॉ. निर्मोही फडके**




**अव्याहत चालणारा चक्रध्वनी**

’हो... तेच... माझ्यातली ’मी’ हरवलीये. शोधूनही सापडत नाहीये. काळ तर वेगानं पुढे सरकतोय त्या सूर्यबिंबासारखा. बघ, म्हणता म्हणता ते बुडालंदेखील. मांजरझाक झालीय. किती कमी वेळात घडतंय सगळं. मला असा भ्रम झाला होता, की कशाकरता तरी जीव पाखडल्यावर मी मला गवसतेय, पण तसं घडत नाहीये. ‘खरी मी’ हरवलेय. तिचाच पळसाच्या पानांचा पुतळा करायचाय. त्याचे पलाशविधी करायचेत. ह्यात धर्माच्या बाता नाहीत. अवडंबर नाही. मला एक सत्याचा प्रयोग करायचाय.’

’अनहद’ हा लेखसंग्रह वाचून झाला आणि बराच वेळ असाच बसून राहिलो, सुन्न झाल्यासारखा. एखादे वाचन पूर्ण केल्यानंतर आपल्याला ते पूर्णपणे आकलन झालं आहे असा जो एक गोड गैरसमज मनात अनेक वर्षे होता तो इथे कोसळला किंवा असेही म्हणता येईल की तो धाडकन जमिनीवर आपटला. काय वाचले आपण, काय होतं त्यात, लेखिकेला यातून नेमके काय सांगायचे आहे, तिच्या सांगण्यात आणि आपल्या अकलनात काही फरक पडतो आहे का, की वेगळेच काहीतरी गुंगी आणणारे वाचले आहे, असे काही प्रश्न स्वतःशीच विचारण्याची वेळ आली. ’अनहद’ या शब्दाच्या अर्थापासून या प्रश्नांना सुरुवात झाली. मग प्रत्येक लेखामध्ये आलेल्या प्रश्नांची यादी नजरेसमोर फेर धरून नाचू लागली. हे प्रश्न लेखिकेचे आहेत ते एक लेखक म्हणून की एक व्यक्ती म्हणून? या प्रश्नांशी आपण गुंतले गेले आहोत ते वाचक म्हणून की केवळ एक त्रयस्थ व्यक्ती म्हणून? बराच वेळ उलगडा होऊ शकला नाही. मग मदतीला दोन थोर व्यक्ती आल्या. एक डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी आणि प्रा. डॉ. रणधीर शिंदे. या लेखांविषयी डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांनी त्यांच्या प्रस्तावनेत (खरे तर येथेसुद्धा अडखळण्यासारखाच प्रकार आहे. कुठल्याही पुस्तकाला अन्य साहित्यिकांकडून जी कौतुकाची थाप मिळते व त्या लेखनाला चिकित्सकपणे पाहिले आहे याची पोच दिली जाते तिला साधारणतः प्रस्तावना असे म्हणतात. परंतु येथे ’येणे सुखे रुचे एकांताचा वास...’ असे शीर्षक आहे, म्हणजे आणखी एक वेगळीच सौम्य ठेच.) उत्तम प्रकारे खुलासा केलेला आहे आणि वाचक म्हणून आपली सुटकादेखील केलेली आहे, ‘लेखिकेला जे आणि जसं दिसलं तसं ते दुसऱ्याला दिसेल असं नसतं. कारण हे केवळ वर्णन नाही तर त्या त्या वेळची तिची भावगर्भ मनोवस्था आहे. ‘अनहद’ हा मनातील निःशब्द शांततेला शब्दांत उतरवण्याचा वैशिष्ट्यपूर्ण ललितघाट. चिमुकल्या काळातील हा हृदयसंवाद आहे. ’तो’ आणि ’ती’ यांच्याबरोबरच ’स्व’शी तसेच सृष्टीविषयीची ही अनावर अशी संवादरूपे आहेत. या लेखनविश्वात प्रत्यक्षातल्या जगापेक्षा एका वेगळ्या जगाची खेच आहे. ते जग म्हणजे भूतकाळ, आदिमता आणि अमूर्ताचे जग. प्रत्यक्षातले जग हे मानवी अस्तित्व छाटणारे जग आहे.’ प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केलेल्या पाठराखणीमध्ये आपल्याला वाचक म्हणून सूर सापडतो. या लेखसंग्रहात, हो लेखसंग्रह, अर्थात आपल्याला हे स्पष्टपणे लक्षात घ्यायला हवे, की हे लेख लघुनिबंध-ललितनिबंध अशा स्वरूपाचे नसून ललितगद्य या साहित्यप्रकारात मोडणारे आहेत. यांचे स्वरूप अतिशय अल्पजीवी आहे. त्यामुळे सहज चटकन वाचून बाजूला टाकता येईल असे त्यांच्याकडे पाहून वाटणे स्वाभाविक आहे; परंतु प्रत्यक्षात वाचत असताना आपण एखादी कविता वाचत आहोत आणि तिच्यातील गूढ, रम्य, तरल, चिंतनशील असा एक भाव आपल्या भोवती कोश विणत आहे आणि आपण त्यात जखडले जात आहोत असे प्रत्येक लेख वाचत असताना जाणवत राहते. याचे स्पष्ट कारण लेखिकेची भाववस्था, मनोवस्था हे होय. या लेखांमध्ये निसर्ग आहे, व्यक्ती आहेत, प्रसंग आहेत, त्यांची विविध रूपे आहेत परंतु प्रत्येक वेळी लेखिकेला येणारा अनुभव, त्यातून उत्कटतेने व्यक्त होत जाणारा भाव थेट मनाच्या तळापर्यंत घेऊन जाणारा आहे हे पदोपदी जाणवत राहते. याशिवाय लेखिका या प्रत्येक घटकाकडे ज्या नजरेने पाहते ती नजर आपल्याला चकित करून जाणारी आहे हे मान्य करावे लागते. लेखिका केवळ त्या क्षणाचे, प्रहाराचे वर्णन करून आपले समाधान शोधत नाही तर त्यात भाषेचे सौंदर्यरंग अलगदपणे मिसळत जाते. त्यामुळे आपल्या नजरेसमोर जे चित्र उभे राहते त्यात अनेक छटांची रूपे एकमेकांचे हात हातात घेऊन आलेली दिसतात. अनेक नवीन शब्दही सोबत आलेले आहेत. त्यांच्या संदर्भातून हे स्पष्ट होते की लेखिकेकडे असलेले मनस्वी चिंतन, चौफेर वाचन आणि आपले अनुभव मांडण्याची उत्तम साहित्यिक जाण व शैली!

या संग्रहात एकूण चाळीस लेख आहेत. त्यांची दोन भागांत विभागणी केलेली आहे. या लेखांमध्ये संवाद आहे तो दोन व्यक्तींचा, एक झाड आणि दोन पक्षीचे स्मरण करून देणारा. जी मांडणी आहे ती संवादाला चित्ररूप देणारी आहे. तीदेखील नेमकी थेट आणि बंदिस्त. त्यामुळे एक उत्तम साहित्य अनुभवाच्या अंगाने आपण अनुभवतो आहोत हा आनंद मिळतो. खूप दिवसांनी एक चांगली साहित्यकृती वाचनास मिळाली हा आनंद नक्कीच मोठा आहे.

निर्मोही फडके या ‘अरिंदम’मुळे परिचित झालेल्या, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्यावर पीएचडी मिळवलेल्या एक उच्च विद्याभूषित विदुषी आहेत. दोन बालकथासंग्रह, दोन प्रायोगिक कथासंग्रह, एक कथासंग्रह असे त्यांचे साहित्य प्रकाशित आहे. त्यांच्या लेखनात जो समृद्ध दमदारपणा आहे तो निश्चितच भविष्यकाळात उच्च स्थानी घेऊन जाणारा आहे, याची ग्वाही देणारा ‘अनहद’ हा लेखसंग्रह होय. या संग्रहाचे मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांनी साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**नाट्यातून विज्ञानाकडे**
**भाग १**
**शरद पांडुरंग काळे**




**नाट्यमाध्यमातून विज्ञानजागृती**

स्वयंपाकघरापासून आकाशापर्यंत, शरीरापासून अणूपर्यंत, पंचमहाभूतांमध्येदेखील सामावलेले आहे ते विज्ञानच. शरीर, भौतिक, रसायन.... असे अनेक प्रकार विज्ञानामध्ये आहेत. तरी ते शेवटी विज्ञानच. त्याचा आवाका किती मोठा आहे याची आपल्याला कल्पना आहे. तो विषय अवघड तर आहेच परंतु त्याच्या अनेक शाखा असल्याने सर्वसामान्य बुद्धीला आकलनासाठी तो नेहमीच पलीकडे असतो. परंतु एखादा अवघड विषय सोपा करून सांगितला तर तो सहज समजू शकतो, त्याची क्लिष्ट सूत्रे वगळून साध्या साध्या प्रयोगातून त्याचे महत्त्व स्पष्ट केले तर आकलनाच्या दृष्टीने ते सोपे होते आणि कुठलाही विषय सोपा करून सांगितला तर त्याच्याविषयीची गोडी आपोआप निर्माण होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'नाट्यातून विज्ञानाकडे' हे पुस्तक होय.

गणित हा विषय विज्ञानाच्या जवळचाच. आपले शरीर हे गणिताच्या दृष्टीने समजावून घेतले तर कितीतरी गोष्टी सहज साध्य होऊ शकतात. आपल्या शरीरात २०६ ते २१३ इतकी हाडे असतात. शरीरात चार ते पाच लिटर रक्त असते. डोळ्यात कोन्स या पेशींची संख्या ४५ लाख आणि रॉड्स पेशींची संख्या साधारणपणे नऊ कोटींपेक्षा थोडी जास्त असते. शरीरामध्ये एक लाख कोटी एवढ्या पेशी आहेत. रक्तपेशींची संख्या साधारणपणे प्रत्येक क्युबिक मिलिमीटर किंवा एक मायक्रोमीटरमध्ये ३९ ते ५७ लाख एवढी असते. ही आकडेवारी प्रत्येकाला माहीत असायला हवी. 'अणू' हा प्रोटॉन, इलेक्ट्रॉन आणि न्यूट्रॉन या तीन मूलभूत कणांपासून तो बनलेला असतो. या तीनही मूलभूत कणांचे स्वतंत्र अस्तित्व असून ते कशाप्रकारे कार्य करते हे आपणास माहीत नसते. हवेत फक्त ऑक्सिजनच असतो असा आपला समज; परंतु हवेतील सर्वात मोठा घटक नायट्रोजन असून त्याचे प्रमाण हे ७९% असते, ऑक्सिजनचे प्रमाण २०.८% असते. आपण दिवसातून २१००० वेळा श्वास घेतो. म्हणजेच दिवसाला आपल्याला ३२०० ते ३५०० लिटर ऑक्सिजन लागतो. यासाठी प्रत्येक माणसाने स्वतःला लागणाऱ्या ऑक्सिजनसाठी एक मोठा वृक्ष लावणे गरजेचे आहे. आपण स्वयंपाकघरात कूकर वापरतो. त्याद्वारे उष्ण वाफ बाहेर सोडतो. ही वाफ हवेतील बाष्पाचे प्रमाण वाढवते आणि उष्णताही वाढवते. या उष्णतेला एन्ट्रोपी असे म्हणतात हे आपणास माहीत नसते. वाफेचा दाब कूकरमध्ये निर्माण झाल्यानंतर गॅसची ज्योत अर्धी केली तरी हवेचा दाब राखला जातो व पदार्थ लवकर शिजतो, हे आपणाला कोणी सांगितलेले नसते. फर्मेंटेशन किंवा किण्वनप्रक्रियेत कार्बन डायऑक्साइड वायू बाहेर पडतो म्हणून मिश्रण फसफसते. त्याचवेळी जिवाणू रायबोफ्लेविन, नायसिन यासारखी विटामिन तयार करतात व त्याच वेळी त्यात काही सुवासिक द्रव्ये निर्माण होतात. डाय सिल, सिटॉइन यासारखी सुगंधी द्रव्ये त्यात असतात व त्यांचाच स्वाद इडली व डोसे या पदार्थांना लागतो. यामुळे त्यांचा एक वेगळा सुगंध दरवळत असतो हे आपणास अनाकलनीय असते. प्लास्टिकचा वापर अतिप्रमाणात होत आहे आणि हे प्लास्टिकचे विघटन होत नसल्याने पर्यावरणाला बाधक ठरत आहे. पर्यावरणाचा योग्य तो समतोल राखण्याचे काम आपण प्लास्टिक वापरण्यावर निर्बंध ठेवून करू शकतो, याचे भान राखले जात नाही. आपल्या घरातला कचरा कचरागाडी टाकून घर शून्यकचरा होत नाही, तर आपल्या घरातला कचरा बाहेर दिला गेला नाही तर आपले घर शून्यकचरा होईल.

आहारात आपण गहू आणि तांदूळ या धान्यांना अधिक प्राधान्य देतो. वास्तविक ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळ, किनो ह्या मिलेट किंवा तृणधान्यांचा आहारात समावेश केला पाहिजे. कारण त्यांचा ग्लायसेमिक निर्देशांक कमी असतो. तसेच नायसीन ह्या विटामिनचे प्रमाण चांगले असते व हे विटामिन आपल्या कातडीसाठी आवश्यक असते. अँटिऑक्सिडंटचे प्रमाणही चांगले असते. रक्तदाब नियंत्रित करण्यात तृणधान्याची भूमिका महत्त्वाची असते. यातील प्रथिने ही मानवी शरीरासाठी परिपूर्ण असतात हे आपल्याला कोणी समजावून सांगितलेले नसते. प्रकाशवर्ष म्हणजे प्रकाशाने एका वर्षात चाललेले अंतर होय. असे अनेक विषय आहेत, ज्यांच्याविषयी आपणाला पुरेसी माहिती नसते आणि ते प्रश्नरूपाने उपस्थित झाल्याने त्यांच्यावर उत्तर आहे ते शोधायला हवे याचेही कष्ट आपण घेत नाही. 'नाट्यातून विज्ञानाकडे' या पुस्तकात असे २४ विषय आहेत. ज्यांच्याविषयी कुतूहल निर्माण करून त्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

विज्ञान हा विषय समजावून सांगायचा तर त्यासाठी त्या विषयाचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यासोबतच विषयाचे आकलन होऊ शकेल असे माध्यम आवश्यक ठरते. डॉ. शरद काळे यांनी यासाठी नाटक हे माध्यम निवडलेले आहे. नाटक हे प्रयोग आणि संवाद यावर आधारलेले असते. प्रयोग समजावून सांगताना संवादाची भाषा ही सहज सोपी आणि आपल्या दैनंदिन व्यवहारातील असायला हवी. नाट्यस्वरूपात जे दृश्यमान होते ते प्रेक्षकांवर प्रभाव पाडण्यास समर्थ ठरते, याचे कारण त्यातील संवादाची भाषा होय. त्याचप्रमाणे प्रयोगातील क्लिष्टता सोप्या पद्धतीने स्पष्ट करून सांगितले तर ती सहज आकलन होते. डॉ. शरद काळे यांनी अतिशय प्रभावीपणे या माध्यमाचा उपयोग केलेला आहे. प्रयोगासाठी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना निवडलेले आहे. तसेच जिज्ञासा, कुतूहल, प्रश्न-उत्तरे यांचा कल्पकपणे उपयोग केलेला आहे. त्यामुळे प्रत्येक विषय अतिशय उत्तमपणे स्पष्ट झालेला आहे. शालेय स्तरावर विज्ञान विषय शिकविताना अशा तऱ्हेच्या एकांकिका सादर करून विज्ञान विषय सोपा करून शिकविता येईलच; परंतु सार्वजनिक ठिकाणीसुद्धा अशा एकांकिकाचे आयोजन करून विज्ञानप्रसाराचे व समाजप्रबोधनाचे कार्य यातून सहज साध्य होऊ शकेल. असा प्रयोग डॉ. शरद काळे व ग्रंथालीने गावोगाव जाऊन यशस्वीपणे राबविलेला आहे.

डॉ. शरद काळे समाजात विज्ञान जागृती व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. विज्ञान, चिंतन आणि भगवद्गीता यावर आधारित त्यांची सात पुस्तके आतापर्यंत प्रकाशित झालेली आहेत. त्यांचा एकूण विज्ञानविषयक अभ्यास आणि चिंतनाची बैठक, भाषेवरील प्रभुत्व यांचा अनुभव या पुस्तकातून येतो. किशोर कुलकर्णी यांची सुंदर प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. कल्पक मुखपृष्ठ ग्रंथालीच्या संगणक विभागाने साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# प्रकाशन आणि मैफलीची क्षणचित्रे




























RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.